# धर्मपद

## समश्लोकी आणि बालबोधिनी

१९८५६

म. ग्रं. सं. ठाणें

विषय काव्य

क्र. १२५८

REFBK-0009100

REFBK-0009100

★

कुन्दर दिवाण

७५२५९ ई२
१८/३/७९ काव्य
१९५९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७५२५९ विः काव्य
क्रमांक १९५९ नोंद दि. १८/३/७

# धर्मपद

[ समश्लोकी आणि बालबोधिनी वृत्ति ]

★

कुन्दर बलवन्त दिवाण

एक धर्म-पद श्रेष्ठ
जें ऐकूनि निवे मनीं ।

REFBK-0009100
REFBK-0009100
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ....९१०० .....
शाखा (स्थळ प्रत)

ग्रामसेवा-मंडळ, नालवाडी, वर्धा

शके १८७९ ] किंमत १ रुपया [ सन १९५६

प्रकाशक :

मोहनलाल छाजेड

मंत्री, ग्रामसेवा-मंडळ, नालवाडी, वर्धा.

★

मुद्रक :

. गं. मा. सराफ, व्यवस्थापक, श्रीकृष्ण प्रि. वर्क्स, वर्धा

# अनुक्रमणिका


| विषय | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| प्रस्तावना : काकासाहेब कालेलकर | ... | ... | १ ते ४ |
| धम्मपद : एक अध्ययन — विनोबा | ... | ... | ५ ते ७ |
| निवेदन : | ... | ... | ८ ते १६ |
| : आवृत्ति दुसरी | ... | ... | १६ ते १८ |
| **धर्मपद : समश्लोकी** | ... | ... | १ ते ५० |
| १ यमक-वर्ग | ... | ... | १ |
| २ अप्रमाद-वर्ग | ... | ... | ४ |
| ३ चित्त-वर्ग | ... | ... | ५ |
| ४ पुष्प-वर्ग | ... | ... | ६ |
| ५ बाल-वर्ग | ... | ... | ८ |
| ६ पंडित-वर्ग | ... | ... | १० |
| ७ अर्हन्त-वर्ग | ... | ... | १२ |
| ८ सहस्र-वर्ग | ... | ... | १३ |
| ९ पाप-वर्ग | ... | ... | १५ |
| १० दण्ड-वर्ग | ... | ... | १७ |
| ११ जरा-वर्ग | ... | ... | १९ |
| १२ आत्म-वर्ग | ... | ... | २० |
| १३ लोक-वर्ग | ... | ... | २१ |
| १४ बुद्ध-वर्ग | ... | ... | २३ |
| १५ सुख-वर्ग | ... | ... | २५ |
| १६ प्रिय-वर्ग | ... | ... | २६ |
| १७ क्रोध-वर्ग | ... | ... | २७ |
| १८ मल-वर्ग | ... | ... | २९ |
| १९ धर्मस्थ-वर्ग | ... | ... | ३१ |
| २० मार्ग-वर्ग | ... | ... | ३३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१ | प्रकीर्ण-वर्ग | ... | ... | ३५ |
| २२ | निरय-वर्ग | ... | ... | ३७ |
| २३ | नाग-वर्ग | ... | .... | ३९ |
| २४ | तृष्णा-वर्ग | ... | ... | ४१ |
| २५ | भिक्षु-वर्ग | ... | ... | ४४ |
| २६ | ब्राह्मण-वर्ग | ... | ... | ४७ |

बालबोधिनी ... ... ५१ ते ८३

परिभाषा ... ... ८४ ते ८८

उपमा आणि दृष्टान्त ... ... ८९

| | | | | |
|---|---|---|---|---|
| परिशिष्ट १ : | त्रिपिटक ग्रंथ | ... | ... | ९० ते १०० |
| २ : | चार आर्यसत्यें आणि अष्टांगिक मार्ग | | | ९२ |
| ३ : | पंचस्कंध | ... | ... | ९७ |
| ४ : | अर्हत् पद | ... | ... | ९८ |
| ५ : | निर्वाण | ... | ... | ९९ |

# प्रस्तावना

१

जीवन जर असंस्कारी असेल तर मनुष्याला व्यक्तिगत सुख किंवा उन्नति प्राप्त करून घेतां येणार नाहीं आणि समाजाचें हि कल्याण करतां येणार नाहीं. जीवनाचा सर्व बाजूंनीं विचार करून त्याला अनुरूप अशी सर्वोच्च संस्कारिता सिद्ध करण्याची जी साधना, तिला च धर्म असें म्हणतात. या साधनेचीं जीं प्रधान अंगें धम्मपदांत येऊन गेलीं आहेत, त्यांचा येथें आपण थोडक्यांत विचार करूं.

सर्वांत प्रथम साधना, ती अवैराची. जीवित क्षणभंगुर आहे. येथें सर्व कांहीं जावयाचें आहे. अशा स्थितींत आपण काय म्हणून कोणाशीं वैर बाळगावें ? वैरानें वैर च वाढतें. मनांत जर कुढत बसलों, तर कधीं हि शांति मिळत नाहीं. ह्यासाठीं दुसऱ्यानें केलेला अपकार देखील विसरून जावें. कोणावर हि विजय मिळविण्याची हांव बाळगूं नये. सर्वांचें कल्याण च चितावें. अशा प्रकारची निर्वैर वृत्ति व्यक्तीनें, समाजानें आणि राष्ट्रानें बाळगली, तर च शांति प्राप्त होईल. ही धम्मपदाची प्रधान शिकवणूक आहे.

ज्यांच्या मनामधून लोभ गेला नाहीं ते वैराचा त्याग कसा करणार ? यासाठीं संयम शिकणें आवश्यक आहे. काम, क्रोध आणि लोभ या तिन्ही वृत्तींचा संयम केल्यावांचून सामाजिक स्वास्थ्य लाभणार नाहीं. आणि काम, क्रोध आणि लोभ हीं हिंसेचीं च, वैराचीं च रूपें आहेत, हें लक्षांत घेतलें पाहिजे.

हा संयम साधण्यासाठीं साधकानें अखंड जागरूक राहिलें पाहिजे. या जागरूकतेला च अप्रमाद असें म्हणतात. अप्रमादाच्या योगानें समाज अमर होतो. प्रमादानें, गफलतीनें मोठमोठ्या राष्ट्रांचा हि नाश होतो. पण अप्रमाद हा नञात्मक सद्‌गुण झाला. त्याचें च भरीव स्वरूप म्हणजे ध्यान

होय. प्रेमपूर्वक एखाद्या-वस्तूंचें ध्यान घडूं लागलें म्हणजे एकाग्रता आपोआप येते. एखाद्या राष्ट्राला जेव्हां स्वतःचें एखादें मनुष्य-हिताचें मिशन सांपडतें तेव्हां च तें राष्ट्र ज्ञात आणि अज्ञात अशा अनेक शक्तींचा विकास करून दाखवतें आणि उत्कर्ष साधतें.

त्या ध्यानाला नेहमीं एकाग्रता आवश्यक असतें. चित्तरक्षेमुळें च ती साधते. चित्तरक्षा ही च व्यक्तीची आणि समाजाची मोठ्यांतली मोठी साधना आहे--

'चित्तरक्षा-व्रतं मुक्त्वा बहुभिः किं मम व्रतैः ।'

धम्मपदामध्यें साधूनें कसें वागावें ह्याविषयीं पदोपदीं सूचना दिलेल्या आहेत. त्यांपैकीं व्यक्तीला आणि समाजाला अतिशय महत्त्वाची सूचना आहे अद्रोहाची. समाजांत अशा रीतीनें वागा कीं तुमचें कोणावर हि ओझें पडणार नाहीं. ज्याप्रमाणें भ्रमर फुलाचा वर्ण किंवा गंध ह्यांचें नुकसान केल्यावांचून आपल्याला हवा असलेला रस मिळवतो, त्याचप्रमाणें सामाजिक वृत्तीच्या कल्याणपरायण मनुष्यानें लोकसमाजांत रहावें (४९) ही Non-exploitation ची, अद्रोहाची, वृत्ति ज्यांना पटली असेल, ते च पुरुष समाजकल्याणकारी होऊं शकतात.

आजच्या महायुद्धाच्या दिवसांत आपल्याला पावलोपावलीं असें दिसून येतें, कीं एकानें अत्याचाराला सुरवात केली म्हणजे दुसऱ्याला त्याचें च अनुकरण केल्यावांचून गत्यंतर नाहीं, असें वाटूं लागतें; आणि मग समाजांत हीनपणाची चढाओढ सुरू होते. अशा वेळीं धम्मपदाची एक उक्ति सर्व जगानें ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. फुलाचा सुगंध वारा जसा वाहील त्याप्रमाणें च वहात असतो. वाऱ्याच्या उलट चंदनाचा किंवा फुलाचा वास जाऊं शकत नाहीं. परंतु शीलाची गोष्ट तशी नाहीं. व्यक्तीचें असो वा समाजाचें असो, सदाचरण आपला प्रभाव दाखविल्या-वांचून रहात नाहीं. सदाचरणाचा सुगंध वाऱ्याच्या उलटचा दिशेनें हि वहात असतो, सर्व च दिशांनीं वहात असतो आणि त्यायोगें अधोगतीला जाणाऱ्या जगाला थोपवून धरतो.

अत्याचारानें उन्मत्त होणाऱ्या जगाला याहून श्रेष्ठ असा उपदेश कोणता असणार ?

जर आपण धम्मपदांतील प्रत्येक वचन व्यक्तीबरोबर समाजाच्या आणि राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें घेऊं लागलों, तर ह्या धर्मपुस्तकाचा उपदेश किती भव्य आहे, आणि आजच्या जगाला तो कसा नेमका लागू पडतो, ह्याची खरी कल्पना येईल.

नित्यपारायण करून आपण पुष्कळ वेळां चांगल्या चांगल्या ग्रंथांचा देखील चुथडा करून टाकतों. मनुष्याला जेव्हां आत्मोन्नतीची आणि सामाजिक कल्याणाची विवंचना लागली असेल तेव्हां च विवंचनेचें खाद्य म्हणून त्यानें हें पुस्तक वाचावें, आणि जर हें तोंड-पाठ असलें तर त्याचें चिंतन करावें; जीवनांत इष्ट असें परिवर्तन घडून आल्यावांचून राहणार नाहीं.

२

प्रस्तावना लिहावयाची म्हणजे भाषांतराविषयीं देखील दोन शब्द लिहिले पाहिजेत.

मराठीमध्यें धम्मपदाचीं एकदोन भाषांतर झालीं आहेत. तीं बऱ्यापैकीं आहेत. प्रस्तुत भाषांतराचा विशेष हा आहे कीं मूळ गाथे-इतक्या च मोजक्या आणि गोड शब्दांत हें पद्यमय भाषांतर आहे. या भाषांतराचा दुसरा विशेष म्हणजे श्री. कुंदर दिवाण यांनीं धम्मपदाचा मननपूर्वक अभ्यास केला आहे. श्री. कुंदर दिवाण हे विनोबांचे शिष्य आहेत एवढें सांगितलें म्हणजे त्यांच्या अध्ययनशीलतेविषयीं आणि मननाविषयीं विशेष लिहिण्याची आवश्यकता नाहीं. ज्यांना या गोष्टीची प्रत्यक्ष प्रतीति हवी असेल, अथवा ज्यांना मूळ धम्मपदांतील खुबी समजून घ्यावयाची असेल, त्यांनीं पुस्तकाच्या शेवटीं बालबोधिनी या सदराखालीं दिलेल्या टिपा ध्यानपूर्वक वाचाव्या.

श्री. दिवाण यांनीं जेथें जेथें रूढ अर्थाहून निराळा अर्थ केला आहे तेथें तेथें धम्मपदाच्या अध्ययमकर्त्यांनि त्यांची दृष्टि आदरानें समजून घ्यावी

लागेल. मुळाशीं ज्यांना ताडून पाहण्याचा उत्साह नाहीं अशा लोकांना एवढी खात्री देतां येईल कीं श्री. दिक्षीत यांनीं धम्मपदाचा शब्दार्थ आणि भावार्थ आपल्या मराठी श्लोकांत उत्तम रीतीनें आणला आहे. यामुळें त्यांचें हें छंदोबद्ध भाषांतर धार्मिक वृत्तीनें आणि स्वतंत्रपणें अभ्यासण्याच्या योग्यतेचें झालें आहे.

आमचा विश्वास आहे, प्रस्तुत पुस्तकांतील किती तरी ओळी मराठी साहित्यांत सुभाषित म्हणून लवकर च नांदू लागतील.

काकावाडी, वर्धा<br>
ता. ८-२-१९४१

काका कालेलकर

# धम्मपद : एक अध्ययन

## [ विनोबा ]

धम्मपद लहानसें पुस्तक. माझ्या बेताचें आणि विचारांनी भरलेलें, सोपें आणि सरळ. तोंडांत टाकलें कीं विरघळून जायचें. फक्त चारशें तेवीस श्लोक सव्वीस अध्यायांत वांटलेले. गीतेहूनहि लहान. तीस वर्षांपूर्वी मी धम्मपद घोळून घोळून वाचलें होतें. संस्कृत आणि पाली यांत तसा कांहीं मोठासा फरक नाहीं. तथापि पाली भाषेचें व्याकरणहि त्या निमित्तानें मी पाहून घेतलें होतें. मध्यंतरींच्या कालांतहि माझें धम्मपदाचें अवलोकन मधून मधून झालेलें आहे. तेंच आतां भेटींत मिळालें. त्यामुळें त्याचें अधिक खोल अध्ययन मीं चालवलें. गौतमबुद्धाच्या विहार-भूमींतच माझाहि संचार चाललेला आहे. अशा वेळीं हा सांगाती फार सुखाचा आणि गोड झाला आहे. बुद्धाचें धर्मचक्र-प्रवर्तनच, त्याच्या पावलावर पावलें टाकीत, पुढें चालवण्याची माझी नम्र आकांक्षा. त्यामुळें धम्मपदाच्या अर्थाच्या खोलींत मी चांगलाच उतरलों.

धम्मपदाच्या पहिल्या अध्यायाला यमक-वर्ग असें नांव दिलें आहे यमक म्हणजे श्लोकांच्या जोडया असा भावार्थ आहे. याला संस्कृतांत नेहमीचा शब्द युग्मक. पण अशीं युग्मकें धम्मपदाच्या केवळ पहिल्या अध्यायांत नसून सबंध पुस्तकभर ठिकठिकाणीं आहेत. गीतेंत युग्मकें थोडीं आढळतात. तीन श्लोकांचीं त्रिकें अधिक आहेत. तत्त्वविवेचनाला त्रिकें अनुकूल पडतात. (१) माणूस मरणारा आहे. (२) विनोबा माणूस आहे. (३) तस्मात् विनोबा मरणार आहे. हें त्रिकाचें उदाहरण झालें. ही असली तस्मात्-पद्धति जिरवून गीता गोड झाली आहे.

धम्मपदांत तस्मात्-बिस्मात् कांहीं नाहीं. त्यांत मुख्यतः नीति-विवेचन आहे. नीति-विवेचनांत सार-असार, बरें-वाईट, सत्य-असत्य, असल्या जोडया उभ्या होतात. त्यामुळें युग्मकें नीति-विचाराला मानवतात. युग्मकांत कधीं कधीं एक वाक्य सांगितलें कीं दुसरें जोडीदार

वाक्य, जें पुरवणीसाठीं सांगितलें जातें, सांगण्याची गरजहि राहत नाहीं. उदाहरणादाखल धम्मपदाच्या पहिल्या अध्यायांतलें एक युग्मक पाहूं.

"तो माझ्यावर रागावला, त्यानें मला मारलें, त्यानें माझा पराजय केला, अशा गोष्टी जो आठवतो, त्याचें वैर शमत नाहीं."
इतकें म्हटलें कीं—

"तो माझ्यावर रागावला, त्यानें मला मारलें, त्यानें माझा पराजय केला, अशा गोष्टी जो विसरतो, त्याचें वैर शमतें."

हें न सांगूनहि सांगितलें जाईल. पण धर्मग्रंथकारांना पुनरुक्तीचा कंटाळा नसतो. तेव्हां पुरवणी पुरी केल्याशिवाय ते रहायचेच नाहींत. धम्मपदांतील अशीं पूरक वाक्यें सोडून दिलीं, तर धम्मपद आणिकच चिमुकलें होईल.

वर मी 'विवेचना'चें नांव घेतलें. पण धम्मपद हें विवेचन नाहीं. ती बुद्धाची विखुरलेली वाणी आहे. त्यांतील एकेक गाथा, अथवा कधीं दोन-चार गाथा, वेगवेगळ्या प्रसंगीं वेगवेगळ्या माणसांना सांगितलेल्या आहेत. आणि बुद्धाच्या निर्वाणानंतर पुढें त्याच्या शिष्य-मंडळींनीं प्रसंग बाजूस सारून विचार-संगतीला धरून त्या मोकळ्या गाथांचें ग्रथन केलें आहे. हें ग्रथन याहून वेगळ्या रीतीनेंहि करतां येईल. आणि आजच्यापेक्षां अधिक चांगलें ग्रथन करणेंहि शक्य आहे, जरी हेंहि ग्रथन चांगलेंच आहे.

गौतम बुद्ध हिंदु धर्मांत जन्मास आले, हिंदु धर्मांत वाढले, आणि त्यांतच मुरले. त्यांना आपला सवता सुभा काढायचा नव्हता. धर्म-विचाराची शुद्धि करावयाची होती, ती त्यांनीं केली. आणि हिंदूंनीं त्यांच्या नेहमींच्या रीतीनुसार, आढेवेढे घेऊन आणि थोडेंफार भांडून-झगडून, शेवटीं ती मान्य-हि केली. सबंध धम्मपदांत असें एकहि वाक्य आढळलें नाहीं कीं जें मला हिंदु या नात्यानें मानवणार नाहीं. कबीर आदि संतांच्या वचनांशीं ज्याचा परिचय आहे त्याला, थोड्या वेगळ्या परिभाषेशिवाय, अपरिचित असें धम्मपदांत कांहीच आढळणार नाहीं.

प्राचीन भारतांत कांहीं काळ वैदिकांची ब्राह्मण-संस्कृति, जैनांची श्रमण-संस्कृति आणि बौद्धांची भिक्षु-संस्कृति अशा जणूं तीन वेगवेगळ्या

संस्कृति चालल्या. त्यांच्यांत संघर्षहि दीर्घ काळपर्यंत चालला होता. पण धम्मपदांत त्या संघर्षाचा मागमूस नाहीं. सगळीकडे निर्मळ समभाव दिसून पडतो. गाथा १४२ काय म्हणते पहा––

जो कोणाहि जीवाला दंड देत नाहीं, तो ब्राह्मण आहे, तो श्रमण आहे, तो भिक्षु आहे.

" सो ब्राह्मणो सो समणो स भिक्खू "

" तो भिक्षू तो जैन नि तो चि ब्राह्मण– "

गीतेंतील "स संन्यासी च योगी च" हें वचन कोणालाहि या ठिकाणीं आठवल्याशिवाय रहायचें नाहीं. आज आम्ही संन्यासी आणि योगी यांचा नाहक वाद माजवीत असतों, आणि आम्ही स्वतः संन्यासी आणि योगी यांपैकीं कांहींच नसतों. गीता दोहोंकडे समत्व-बुद्धीनें पाहते, दोघांना एकरूप समजते. अशी थोरांची थोरवी आहे.

गीतेंत स्थितप्रज्ञ, योगी, जीवन्मुक्त, योगारूढ, भक्त, गुणातीत इत्यादि अनेक नांवांनीं आदर्श पुरुषांचीं वर्णनें ठिकठिकाणीं आलीं आहेत. धम्मपदांतहि तसेंच केलें आहे. सहावा अध्याय पंडित-लक्षण, सातवा अर्हत्-लक्षण, चौदा बुद्ध-लक्षण, एकोणीस धार्मिक-लक्षण, पंचवीस भिक्षु-लक्षण आणि सव्विसावा शेवटचा अध्याय ब्राह्मण-लक्षण अशीं सहा ठिकाणीं आदर्श पुरुषांचीं लक्षणें मांडलीं आहेत. लक्षणें सगळीं मिळून एकच आहेत. यांतील अर्हत् हें जैन नांव आहे. ब्राह्मण वैदिक आहे. दोन्ही नांवांचा गौतमबुद्धांनीं आदर केला आहे. धम्मपदाचा अभ्यासी सर्वधर्म-समभावच राखू शकतो. तो संकुचित वृत्तीचा होऊंच शकत नाहीं.

शेवटचा अध्याय ब्राह्मण-लक्षणाचा करून "ब्राह्मण" शब्दाविषयीं अत्यंत गौरव दर्शविला आहे. एकूण सव्वीस अध्ययांत चारशें तेवीस श्लोक, म्हणजे सरासरी सतरा श्लोकांचा अध्याय. लहानांतला लहान अध्याय दहा श्लोकांचा आहे. आणि मोठ्यांतला मोठा हा शेवटचा ब्राह्मण-लक्षणांचा एकेचाळीस श्लोकांचा आहे. "जन्मानें आणि गोत्रानें कोणी ब्राह्मण होत नाहीं. ज्याच्या ठाईं सत्य आणि धर्म निवास करतात तो ब्राह्मण" असेंहि एक विवरण सादर केलें आहे. कोणींहि तें आपल्या अंगीं बाणवून घ्यावें आणि ब्राह्मण-पदवीस पात्र व्हावें.

वाक्य, जें पुरवणीसाठीं सांगितलें जातें, सांगण्याची गरजहि राहत नाहीं. उदाहरणादाखल धम्मपदाच्या पहिल्या अध्यायांतलें एक युग्मक पाहूं.

"तो माझ्यावर रागावला, त्यानें मला मारलें, त्यानें माझा पराजय केला, अशा गोष्टी जो आठवतो, त्याचें वैर शमत नाहीं."

इतकें म्हटलें कीं—

"तो माझ्यावर रागावला, त्यानें मला मारलें, त्यानें माझा पराजय केला, अशा गोष्टी जो विसरतो, त्याचें वैर शमतें."

हें न सांगूनहि सांगितलें जाईल. पण धर्मग्रंथकारांना पुनरुक्तीचा कंटाळा नसतो. तेव्हां पुरवणी पुरी केल्याशिवाय ते रहायचेच नाहींत. धम्मपदांतील अशीं पूरक वाक्यें सोडून दिलीं, तर धम्मपद आणिकच चिमुकलें होईल.

वर मी 'विवेचना'चें नांव घेतलें. पण धम्मपद हें विवेचन नाहीं. ती बुद्धाची विखुरलेली वाणी आहे. त्यांतील एकेक गाथा, अथवा कधीं दोन-चार गाथा, वेगवेगळ्या प्रसंगीं वेगवेगळ्या माणसांना सांगितलेल्या आहेत. आणि बुद्धाच्या निर्वाणानंतर पुढें त्याच्या शिष्य-मंडळींनीं प्रसंग बाजूस सारून विचार-संगतीला धरून त्या मोकळ्या गाथांचें ग्रथन केलें आहे. हें ग्रथन याहून वेगळ्या रीतीनेंहि करतां येईल. आणि आजच्यापेक्षां अधिक चांगलें ग्रथन करणेंहि शक्य आहे, जरी हेंहि ग्रथन चांगलेंच आहे.

गौतम बुद्ध हिंदु धर्मांत जन्मास आले, हिंदु धर्मांत वाढले, आणि त्यांतच मुरले. त्यांना आपला सवता सुभा काढायचा नव्हता. धर्म-विचाराची शुद्धि करावयाची होती, ती त्यांनीं केली. आणि हिंदूंनीं त्यांच्या नेहमींच्या रीतीनुसार, आढेवेढे घेऊन आणि थोडेंफार भांडून-झगडून, शेवटीं ती मान्य-हि केली. सबंध धम्मपदांत असें एकहि वाक्य आढळलें नाहीं कीं जें मला हिंदु या नात्यानें मानवणार नाहीं. कबीर आदि संतांच्या वचनांशीं ज्याचा परिचय आहे त्याला, थोड्या वेगळ्या परिभाषेशिवाय, अपरिचित असें धम्मपदांत कांहींच आढळणार नाहीं.

प्राचीन भारतांत कांहीं काळ वैदिकांची ब्राह्मण-संस्कृति, जैनांची श्रमण-संस्कृति आणि बौद्धांची भिक्षु-संस्कृति अशा जणूं तीन वेगवेगळ्या

संस्कृति चालल्या. त्यांच्यांत संघर्षहि दीर्घ काळपर्यंत चालला होता. पण धम्मपदांत त्या संघर्षाचा मागमूस नाहीं. सगळीकडे निर्मळ समभाव दिसून पडतो. गाथा १४२ काय म्हणते पहा--

जो कोणाहि जीवाला दंड देत नाहीं, तो ब्राह्मण आहे, तो श्रमण आहे, तो भिक्षु आहे.

"सो ब्राह्मणो सो समणो स भिक्खू"

"तो भिक्षू तो जैन नि तो चि ब्राह्मण-"

गीतेंतील "स संन्यासी च योगी च" हें वचन कोणालाहि या ठिकाणीं आठवल्याशिवाय रहायचें नाहीं. आज आम्ही संन्यासी आणि योगी यांचा नाहक वाद माजवीत असतों, आणि आम्ही स्वत: संन्यासी आणि योगी यांपैकीं कांहींच नसतों. गीता दोहोंकडे समत्व-बुद्धीनें पाहते, दोघांना एकरूप समजते. अशी थोरांची थोरवी आहे.

गीतेंत स्थितप्रज्ञ, योगी, जीवन्मुक्त, योगारूढ, भक्त, गुणातीत इत्यादि अनेक नांवांनीं आदर्श पुरुषांचीं वर्णनें ठिकठिकाणीं आलीं आहेत. धम्मपदांतहि तसेंच केलें आहे. सहावा अध्याय पंडित-लक्षण, सातवा अर्हत्-लक्षण, चौदा बुद्ध-लक्षण, एकोणीस धार्मिक-लक्षण, पंचवीस भिक्षु-लक्षण आणि सव्विसावा शेवटचा अध्याय ब्राह्मण-लक्षण अशीं सहा ठिकाणीं आदर्श पुरुषांचीं लक्षणें मांडलीं आहेत. लक्षणें सगळीं मिळून एकच आहेत. यांतील अर्हत् हें जैन नांव आहे. ब्राह्मण वैदिक आहे. दोन्ही नांवांचा गौतमबुद्धांनीं आदर केला आहे. धम्मपदाचा अभ्यासी सर्वधर्म-समभावच राखूं शकतो. तो संकुचित वृत्तीचा होऊंच शकत नाहीं.

शेवटचा अध्याय ब्राह्मण-लक्षणाचा करून "ब्राह्मण" शब्दाविषयीं अत्यंत गौरव दर्शविला आहे. एकूण सव्वीस अध्ययांत चारशें तेवीस श्लोक, म्हणजे सरासरी सतरा श्लोकांचा अध्याय. लहानांतला लहान अध्याय दहा श्लोकांचा आहे. आणि मोठ्यांतला मोठा हा शेवटचा ब्राह्मण-लक्षणांचा एकेचाळीस श्लोकांचा आहे. "जन्मानें आणि गोत्रानें कोणी ब्राह्मण होत नाहीं. ज्याच्या ठाईं सत्य आणि धर्म निवास करतात तो ब्राह्मण" असेंहि एक विवरण सादर केलें आहे. कोणींहि तें आपल्या अंगीं बाणवून घ्यावें आणि ब्राह्मण-पदवीस पात्र व्हावें.

---

# निवेदन

१

धम्मपद हा एक प्राचीन बौद्ध ग्रंथ आहे. बुद्धाच्या निर्वाणानंतर तीनचार शतकांच्या अवधींत केव्हां तरी याचा संग्रह झाला असावा. तेव्हांपासून आतांपर्यंत क्वचित् कांहीं काल विस्मृतीच्या अभ्रपटलांनीं दृष्टीआड झाला तरी आर्यजनांना तो ध्रुवनक्षत्राप्रमाणें मार्गदर्शन करीत आला आहे. जगाच्या वाङ्मयांत, नव्हे सारस्वतांत, जे कांहीं कोटिकोटींच्या लोकगंगेला आपल्यामागें नेणारे भगीरथ होऊन गेले आहेत, त्यांत धम्म-पदाची गणना होते. आज जगाच्या पाठीवर असा क्वचित च पुढारलेला देश असेल कीं जेथील संस्कारी लोकांच्या प्रौढ भाषेंत धम्मपदाचें भाषांतर किंबहुना भाषांतरें झालीं नसतील. सर्व जग ज्याला महान् धर्मप्रवर्तक समजतें, आणि अर्धे अधिक जग – ह्यांत च माझ्या मतें हिंदुस्थानचा हि समावेश होतो – ज्याला गुरुत्वानें वरतें, त्या परमकारुणिक भगवान् बुद्ध-देवाच्या उपदेशाचें हें सार आहे. मग त्याचा प्रभाव आणि प्रसार चिरंतन आणि सार्वत्रिक झाल्यास त्यांत नवल कसलें !

इ. स. पूर्व ५४४ मध्यें भगवान् बुद्ध निर्वाण पावले. त्यानंतर त्यांच्या वचनांचा भिक्षुसंघानें संग्रह, विभाग आणि विस्तार आरंभिला. हा उद्योग कित्येक शतकें झाला. आरंभीं पांचशें वर्षें तो श्रुतिरूप होता. मागाहून सिंहल द्वीपांत जाऊन तो इसवी सनाच्या पहिल्या शतकांत लिपिरूप पावला. ह्या सर्व वाङ्मयाचा जणूं तीन पेटाऱ्यांत लहानमोठ्या गांठोड्या बांधून संग्रह आणि विभाग केला असल्यामुळें ह्याला त्रिपिटक अशी संज्ञा आहे. सुत्त, विनय आणि अभिधम्म हे ते तीन पेटारे. सुत्त-( सूत्र ) पिटकांत बुद्धाचा आणि त्याच्या प्रमुख शिष्यांचा उपदेश व धर्मपर संवाद, विनय-पिटकांत भिक्षुसंघाच्या आचारविचारांचा आणि तद्विषयक कथांचा प्रपंच, आणि अभिधम्म-पिटकांत बौद्ध दर्शनाची तात्त्विक मीमांसा संगृहीत झाली आहे. अशा प्रकारें ही संपूर्ण पिटकत्रयी बौद्धांचें धर्ममूल होय. तथापि

अभिधम्म-पिटकांत प्रत्यक्ष बुद्धवचनें मुळीं च नाहींत म्हटलें तरी चालेल. सुत्त आणि विनय या दोन पिटकांत मात्र बुद्ध आणि त्याचे निकटचे प्रमुख शिष्य यांचे उपदेश आणि आदेश असल्यामुळें त्यांना बुद्धवचन म्हणून मान्यता मिळाली आहे. त्यांत हि मुख्यतः सुत्तपिटक हें च मौलिक बुद्धधर्माचा प्रामाणिक परिचय देणारें अत्यंत प्राचीन आणि सरस वाङ्मय असल्यामुळें विशेष महत्त्वाचें ठरतें. या पिटकाचे दीघ, मज्झिम, संयुत्त, अंगुत्तर आणि खुद्दक असे पांच विभाग आहेत. त्यांतील शेवटच्या विभागांतील पंधरा ग्रंथांपैकीं धम्मपद हा एक लघुग्रंथ आहे. पण तो ह्या सर्वांचें जणू सार च आहे. सार हें लघु च असावयाचें. समुद्रमंथन करून देवांनीं जसें कळशीभर अमृत काढलें तसें बौद्धवाङ्मयोदधींतून सारज्ञांनीं काढलेलें हें ४२३ श्लोकांचें अमृत होय.

धम्मपद हा बौद्ध ग्रंथ असला तरी तो इतर धर्मानुयायांना हि तितका च पूज्य आणि पाठ्य होय. कारण सर्व धर्मांचा दृढभाजक जें ब्रह्मचर्य तें त्याचें स्वरूप आहे. इतर सर्व आचारविचारांच्या आणि मतमतांतरांच्या ग्राह्याग्राह्यतेची ही कसोटी आहे. ब्रह्मचर्याला, विशुद्ध जीवनाला, उपकारक म्हणून च त्यांचा स्वीकार अथवा अनुपकारक म्हणून च त्यांचा त्याग येथें उपदिष्ट आहे. ह्यामुळें त्याचा जाति-धर्म-वाद-निरपेक्ष उपदेश विश्वजनीन होय.

धम्मपदांतील आणि इतर पाली वाङ्मयांतील कित्येक श्लोक महाभारत, मनुसंहिता, पंचतंत्र, हितोपदेश इत्यादि हिंदुग्रंथांत त्याच-प्रमाणें 'उत्तराध्ययन' आणि 'दशवैकालिक सूत्रें' इत्यादि जैन ग्रंथांत हि भाषांतरानें आणि रचनांतरानें आढळतात. हें प्राचीन काळच्या विविध पंथांचें पारस्परिक दळणवळण, आदानप्रदान आणि सहानुभूति यांचें द्योतक आहे. पुष्कळशी विचारांची आणि वाक्प्रचारांची संपत्ति हिंदुस्थानांत प्राचीनकाळीं पैतृक म्हणून अनेक पंथांना समान च लाभली आहे. हें हि त्याचें एक कारण आहे. त्यामुळें कोणी कोणापासून घेतलें हें शोधण्यांत विशेष स्वारस्य नाहीं. तेव्हां यावरून हें उघड होतें कीं धम्मपद हा ग्रंथ जरी बौद्धांचा असला, आणि ते त्याला साक्षात् बुद्धाच्या मुखकमलांतून

निघालेला मानीत असले, तरी तो कोणा एकाचा किंवा एका पंथाचा हि नव्हे. तो भारतीय आहे.

परंतु असें म्हणण्यांत बौद्धांचें त्यावरील स्वामित्व मुळीं च नाकारलें जात नाहीं. कारण पालिवाङ्मय हें शुद्ध बौद्धवाङ्मय होय. पालि हा शब्द च मुळीं प्राचीन-मागधी-निविष्ट बुद्धवचनांचा 'बुद्धोक्त धर्माची पाळ' अशा अर्थानें वाचक असून कालांतरानें तो बौद्ध वाङ्मयानें मागधीचें प्रायः संपूर्ण क्षेत्र च व्यापल्यामुळें त्या भाषेचा पर्याय बनला आहे. नंतरच्या बौद्ध वाङ्मयानें जरी संस्कृताचा आश्रय केला असला तरी बुद्धाची आणि बुद्धधर्माचें मूल जें पिटकत्रय त्याची भाषा पालि च होय आणि त्यांतील हा ग्रंथ म्हणून तो बौद्धांचा आहे हें नाकारण्याचा प्रश्न च उठत नाहीं. तें हि आप्त-वचन च आहे. आणि तें शोधून घेतलें पाहिजे.

२

आतां आपण धम्मपदाच्या अंतर्बाह्य स्वरूपाचा थोडा परिचय करून घेऊं या.

धम्मपदांत एकूण ४२३ श्लोक असून ते २६ वर्गांत विभागलेले आहेत. ह्या श्लोकांपैकीं ३५५ श्लोक अनुष्टुभ् वृत्ताच्या श्लोक-गणरचनेचे असून त्यांपैकीं ३४ श्लोक सहाचरणी आहेत. अर्थात् एकूण पंक्ति ( २ चरणी ) ७४४ होतात. इतर वृत्तांचे श्लोक ६८ असून त्यांत दोन श्लोक सहाचरणी अर्थात् त्यांची एकूण चरणसंख्या २७६. ह्या श्लोकांपैकीं ३७ श्लोक त्रिष्टुभ् वृत्ताच्या उपजाति-गणरचनेचे असून ३१ श्लोक अर्धसम वृत्ताच्या वियोगिनी-गणरचनेचे आहेत. प्रकारान्तरानें सांगायचें तर द्विपाद श्लोक ७४४ आणि चतुष्पाद श्लोक ६८ आहेत. ही सर्व रचना आर्ष असल्यामुळें बरी च शिथिल आहे. गीतेंतील वृत्तांहून वियोगिनी हें अर्धसमवृत्त धम्मपदांत अधिक आहे. अर्धसमवृत्तांचा प्रचार फार प्राचीन नाहीं. त्यावरून हि धम्मपदाची रचना गीतेनंतरची असावी असें दिसतें.

धम्मपदाच्या श्लोकांच्या वर्गीकरणांत फार च थोडें सूत्र आहे. वर्गावर्गांत देखील कांहीं संगति किंवा क्रम नाहीं. धम्मपदाच्या प्राचीन

संपादकानें जसजसे श्लोक हातीं आले तसतसे त्यांचे कच्चे वर्ग करून ठेवून दिले आहेत. विशिष्ट श्लोक कोणत्या प्रसंगीं कोणीं म्हटला इत्यादि त्याच्या इतिहासाची विस्मृति पडल्यानंतर, त्याचा संप्रदाय खंडित झाल्यानंतर, बऱ्या च काळानें त्या श्लोकांचें चयन, ग्रथन आणि संपादन झालें असलें पाहिजे. उदाहरणार्थ १७२, १७३, आणि ३८२ हे तिन्ही श्लोक अंगुलिमाल याचे एका च प्रसंगींचे उद्‌गार असतांना ते फुटले आहेत. ३८२ व्या श्लोकांत 'भिक्षु' शब्द असल्यामुळें तो भिक्षुवर्गांत पडला असून १७२, १७३ हे त्यांत 'लोक' शब्द असल्यामुळें लोक-वर्गांत पडले आहेत. तिन्ही श्लोकांत 'उजळी लोक तो सारा अभ्रमुक्त विधूपरी' ही पंक्ति समान आहे. त्यावरून हि त्यांचें अधिकरण एक च असावें असें सहज अनुमान होतें. श्लोक २८६, २८७, ४७ आणि ४८ यांचे विषयीं हि सदरप्रमाणें च.

तथापि श्लोकांचें वर्गीकरण आणि नामकरण त्यांतील (१) वर्ण्य-विषय, (२) प्रमुख पात्र, (३) आवर्तनशील उपमा. (४) विशिष्ट रचना आणि (५) आरंभक पद या पांचांपैकीं कोणत्या तरी एकावरून झालेलें दिसतें. आणि ज्या श्लोकांचा वरील पांचींत कोठें समावेश केला गेला नाही. त्यांचा प्रकीर्ण म्हणून एक स्वतंत्र वर्ग करण्यांत आला आहे. हा वर्ग वास्तविक शेवटीं यायला पाहिजे. परंतु तो तसा नाहीं. ह्यावरून हि श्लोकांचें वर्गीकरण जसजसे श्लोक हातीं आले तसतसें झालें असलें पाहिजे, ह्या अनुमानाला बळकटी येते. या वर्गांचा हि एका अर्थी चौथ्या गटांत समावेश करतां येईल. कोणत्या वर्गाचा कोणत्या गटांत अंतर्भाव होतो तें येथें गटवार देतों. त्यावरून समग्र धम्मपदाच्या कथावस्तूचें एका दृष्टिपातांत साकल्यानें तसें च क्रमवद्ध आकलन होऊं शकेल. (अ) वर्ण्य विषय—१ मल, २ पाप, ३ निरय, ४ तृष्णा, ५ क्रोध, ६ प्रिय, ७ दण्ड, ८ जरा, ९ चित्त, १० लोक, ११ आत्म, १२ अप्रमाद आणि १३ मार्ग. (आ) प्रमुख पात्र—१ बाल, २ पंडित, ३ भिक्षु, ४ अर्हत्, ५ बुद्ध, ६ ब्राह्मण (आणि धर्मस्थ). (इ) आवर्तनशील उपमा—१ पुष्प, २ नाग. (ई) विशिष्ट रचना—१ यमक, २ प्रकीर्ण. (उ) आरंभक पद—

१ सहस्र, २ धर्मस्थ. हा वर्गक्रम, आहे तें च वर्गीकरण आणि नामकरण स्वीकारून दिला आहे. परंतु तीं दोन्ही हि न्यूनाधिक प्रमाणांत वदलणें शक्य आहे आणि कदाचित् इष्ट हि.

धम्मपदाची भाषा प्रासादिक परंतु रहस्यपूर्ण आहे; तिच्या साध्या शब्दांत खूप खोल अर्थ भरलेला आहे. तिला श्लेष, उपमा, रूपक इत्यादि अलंकारांची हौस आहे, पण त्यांत कोठें हि औचित्यभंग नाहीं. ठायीं ठायीं चमकणाऱ्या ह्या वेधक आणि समर्पक अलंकारांमुळें प्रतिपाद्य विषय चित्रदर्शनाप्रमाणें सुबोध झाला आहे. अलंकारांची उपयुक्तता ती ही च. सत्पुरुषांच्या नांवावर जरी चमत्काराच्या कथा प्रचलित असल्या तरी त्यांनीं त्याचा सदा निषेध च केला आहे — धर्म आणि चमत्कार हे उजेड आणि अंधार यांच्यासारखे परस्परविरुद्ध असल्यामुळें. तथापि वाङ्मयीन चमत्कार ते हि टाळूं शकले नाहींत. प्राचीन भारतीयांना त्याची खोड च होती. त्यामुळें त्यांच्या लिखाणांत मेख ही असावयाची च. श्लोक २९४–२९५ ही अशी च एक मेख आहे. 'यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते । हत्वापि स इमाँल्लोकान् न हन्ति न निबध्यते ।।' हा गीतेंतील श्लोक हि त्या च प्रकारचा आहे. उभयत्र आधार 'न अस्य केन च कर्मणा लोको मीयते, न मातृवधेन, न पितृवधेन' (कौषीतकी अ. ३, कं. १.) इत्यादि उपनिषद्वचनें दिसतो. ह्या गीताधम्मपदांतील श्लोकांचा जे शब्दार्थ घेतात ते लोक भ्रांत होत, देहात्मवादी होत. जे 'अक्षरार्थ' घेतात ते पदज्ञ होत, आत्मज्ञ होत. असे जे पदवी (पदज्ञ) कवि त्यांना च हंस ही पदवी प्राप्त होते. नीरक्षीरांप्रमाणें शब्दार्थ आणि अक्षरार्थ मिसळलेले असतात ते जो वेगळे करून क्षीरवत् अक्षरार्थ घेतो तोच हंस परंतु ही हंसता अंगीं नसल्यामुळें पुष्कळ लोक चकले आहेत. युरोपियन पंडितांनीं तर प्रथम प्रथम असल्या आलंकारिक श्लोकांच्या अर्थाचे अनर्थ करून ठेवले होते. गीताधम्मपदांतील उक्त श्लोक त्यांपैकीं च होत. ह्यांचा ऊहापोह बालबोधिनींत संक्षेपानें केला च आहे. येथें सांगायचें इतकें च आहे कीं भारतांतील सर्व प्राचीन वाङ्मयाप्रमाणें धम्मपदांत हि वाक्चमत्कार आहेत.

भाषाशास्त्र-दृष्टचा धम्मपदाचें परीक्षण केलें नाहीं तरी 'सहते'

'अभिञ्ञा' इत्यादि वैदिक धातु आणि सुबंतें क्वचित् आढळतात त्यांवरून त्याची प्राचीनता अनुमित होते असें म्हणतां येईल.

३

आतां थोडें अंतरंग पाहूं. धम्मपद हा पुष्पांजलि आहे, माला नव्हे. त्यामुळें त्यांत कथासूत्र आढळत नाहीं. तथापि मोकळीं असून हि फुलें जशीं एका गंधामुळें गुणयुक्त, तसें त्रुटित हि धम्मपद हें एका धर्माच्या गुणानें सुसूत्र होय. हें सूत्र कोणतें तें फार दूर शोधायला जावें लागत नाहीं. भासादि कवि जसे आपल्या नाटकाचीं प्रमुख पात्रें पहिल्या च श्लोकांत खुबीनें ग्रथित करतात, त्याप्रमाणें धम्मपदकारांनीं धम्मपदाचें सार पहिल्या च श्लोकांत सांगून टाकलें आहे. समग्र वेद आणि विष्णु-नामसहस्र हीं जशीं एका ॐकाराचें व्याख्यानमात्र होत, त्याप्रमाणें पहिल्या यमकाचा पुढील सबंध धम्मपद हा प्रपंच मात्र होय. "सर्व व्यापार मनोमूलक, मनःप्रधान किंबहुना मनोमय—मनाचे च विकार—होत. म्हणून जो आपलें बोलणें-चालणें, व्यापार-व्यवहार, मलिन मनानें करतो त्याच्यामागें दुःख, तर तें च जो निर्मल मनानें करतो त्याच्यामागें सुख, चालत येतें." हा पहिल्या यमकाचा अर्थ. येथें मनोमूलक, मनःप्रधान आणि मनोमय ह्या पदांचा अभिप्राय असा आहे कीं जसें वडाच्या एका बीजकणिकेंतून वडाचें मूळ, त्याचा बुंधा आणि त्याच्या शाखोपशाखा, पारंब्या, आणि पत्रपुष्पफल इत्यादींचा गगनचुंबी आणि चौफेर विस्तार होतो, तसा एका मनांतून सर्व धर्माचा, सर्व व्यापार-व्यवहारांचा. ह्या प्रचंड आणि जटिल धर्मवृक्षाचें बीज मन होय. तें शुद्ध करा म्हणजे 'शुद्ध बीजापोटीं-फळें रसाळ गोमटीं' प्राप्त होतील. 'मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचें कारण' हा च धम्मपदाचा संदेश आहे, उपदेश आहे, आदेश आहे.

'शोधणें आपुलें चित्त बुद्धांचें सांगणें असें' (१८३)

'स्वचित्ताचें समाधान बुद्धांचें सांगणें असें' (१८५)

या अंतःशुद्धिरूप केन्द्रीय उपदेशाच्या स्कंधाला दया, दान आणि दम ह्या तीन शाखा फुटल्या आहेत. यज्ञ, दान, तप हीं त्यांचीं च दुसरीं नांवें होत. आत्मौपम्य हें दयेचें बाह्यस्वरूप असून अहंतानिरसन हें

अंत:स्वरूप होय. अनासक्ति हें दानाचें बाह्यस्वरूप असून ममता-निरसन हें अंत:स्वरूप होय. समाधि हें दमाचें बाह्यस्वरूप असून समत्व हें अंत:स्वरूप होय. अहंतात्याग बीज, ममतात्याग त्याची शक्ति आणि समता त्याचें फलित होय. अहंतात्यागानें ममतात्यागानें साधक भयरहित आणि शोकरहित होतो. आणि चित्ताची जी भयशोकरहित साम्यावस्था तिचें च नांव शून्य, मोक्ष, शांति, निर्वाण. बुद्धधर्माची ही च निष्ठा होय. धम्मपदाचा हा च आदर्श.

बुद्धाचा हा जो अंत:शुद्धीचा निर्वाणगामी मार्ग तो उच्छेदवाद आणि शाश्वतवाद, देहमंडन आणि देहदंडन या दोन अंतांना टाळून प्रवाहित झाला आहे. दोन्ही अपाय टाळून चाललेल्या प्रवाहाला बुद्ध मध्य म्हणतो आणि मध्य च शुद्धीचा मार्ग होय (श्लो. २७७), मध्य च सुरक्षित मार्ग होय (श्लो. १९२), असें त्याचें म्हणणें आहे. बुद्ध हा चित्रदर्शी कवि आहे. तो आपली प्रत्येक गोष्ट प्रत्यक्षाप्रमाणें वर्णन करतो. आपल्या मार्गाचें मध्य म्हणून वर्णन करतांना त्याच्यापुढें नदीचें चित्र आहे. नदींत ज्याप्रमाणें तळाचा गाळ आणि पृष्ठावरील घाण यांच्या दरम्यान जलाचा शुद्ध प्रवाह वाहतो त्याप्रमाणें बुद्धाचा धर्म-मार्ग उभयविध अंत आणि अशुद्धि टाळून प्रवाहित झाला असल्यामुळें तो मध्य आणि शुद्ध होय. पंकिल तीरावर नाव फसते, खडकाळ तटावर ती फुटते. हे द्विविध अंत अर्थात् धोके टाळून मध्यधारेनें चालविल्यास ती सुरक्षित राहते. म्हणून द्विविध अंतांचा त्याग अर्थात् मध्य च सुरक्षित होय. या मध्याला च सम्यक् ही संज्ञा असून (पहा श्लो. ८५, ८६) तें आपण संपूर्ण जाणल्यामुळें बुद्ध आपणाला 'सम्यक्-संबुद्ध' म्हणवतो. प्रतीत्यसमुत्पाद, चतुर्विध आर्यसत्य आणि अनात्मवाद इत्यादि संपूर्ण बुद्ध-मत हें तें सम्यक् असून तत्साधक प्रत्येक वस्तु सम्यक् होय आणि तद्बाधक ती मिथ्या. सम्यक् आणि मिथ्या या शब्दांची बुद्धवचनांत पदोपदीं गांठ पडते त्यांचा अर्थ उक्त प्रकारें समजावयाचा. अष्टांग मार्गांतील आठ हि पदांना सम्यक् हें विशेषण लावलें आहे तें वरील कारणानें च. जें सम्यक् तें च आर्य. म्हणून चतुर्विध सत्याला आर्य सत्य आणि तदंतर्गत अष्टांगिक मार्गाला आर्य अष्टांग मार्ग म्हटलें जातें.

इतर दर्शनें आणि मार्ग या मध्याला, सम्यक्‌ला, सोडून असल्यामुळें तीं अनार्य आणि अनर्थकर म्हटलीं आहेत.

आतां अहंता आणि ममता यांचें निःशेष निराकरण हें च शुद्धीचें अन्तिम स्वरूप अर्थात् मुक्ति असल्याबद्दल वेदान्ती आणि बौद्ध एकमत आहेत. आणि म्हणून दोघांच्या हि मतें देहात्मवाद्यांचें देहाबरोबर च जीवनाचा अंत होतो हें उच्छेदवादी मत, नास्तिक (अयं लोको, नास्ति पर इति मानी) मत, अहंता आणि ममता यांचें सर्वस्वीं कारण असल्यामुळें अनार्य आणि अनर्थावह होय. देह च सर्वस्व मानणाऱ्या आत्मवाद्यांचें मत उच्छेदवादी, म्हणून दुसरे आत्मवादी 'आत्मा शाश्वत होय' या शाश्वत-वादाचा आश्रय करतात. आत्मा देहाहून वेगळा आणि शाश्वत मानणारे हे बुद्धकालीन दुसरे आत्मवादी एक तर तो आत्मा अक्रिय आहे असें मानून देहानें वाटेल तीं पापें आचरण्यास मोकळीक देत, अथवा आत्मा कर्मबन्धन मानून त्याच्या प्राक्तन कर्माच्या निर्जरेसाठीं, संपूर्ण क्षयासाठीं, तपश्चर्येच्या आगींत देहाची लाही करायला सांगत. अशा प्रकारे हे द्विविध शाश्वतवादी हि उच्छेदवाद्याप्रमाणें च देहाच्या च भोंवतीं घोटाळणारे आणि म्हणून वस्तुतः आत्मद्वेषी होत. पहिले दुसऱ्याच्या देहांतील आत्म्याचा द्वेष करणारे आणि दुसरे आपल्या च देहांतील आत्म्याचा द्वेष करणारे. गीता ह्यांना च 'मामात्मपरदेहेषु प्रद्विषन्तोऽभ्यसूयकाः' म्हणते. बुद्धाला हि नेमकें हें च सांगावयाचें आहे. बुद्धकालीन आत्मवादाची अशी विपरीत गति पाहिली म्हणजे बुद्ध अनात्मवादी कां झाला आणि अनात्मवादाला च 'शुद्धीचा मार्ग हा असे' (श्लो. २७९) असें कां म्हणतो तें समजतें आणि वस्तुतः तो आत्मवादी च कसा आहे हें ध्यानांत येतें.

बुद्ध अनात्मवादी आहे ह्याचा अर्थ इतका च कीं तो आत्म्यासंबंधीं वाद करीत नाहीं आणि धर्ममात्र अनात्म अर्थात् अनित्य आहेत असें सांगतो. वस्तुमात्र अनित्य आणि म्हणून दुःखरूप होय हें जाणून कोणत्या हि वस्तूला 'मीं' किंवा 'माझें' म्हणूं नये हा च दुःखनिवृत्तीचा उपाय होय इतकें सांगून तो निवृत्त होतो. परंतु ह्या अनात्मवादावरून च अतद्व्यावृत्तीवरून च

निष्पन्न होणारें आत्मव्याख्यारूप उत्तर तो देत नाहीं. त्याची पूर्ति 'आत्मा सत् चित् आनंद होय' म्हणून वेदान्त करतो.

एवंच बुद्धाच्या अनात्मवादाचें स्वरूप पाहतां बुद्धाला अनात्मवादी म्हणणें हा अपवाद (Misnomer) झाला. वस्तुतः तो अनहंवादी होय आणि म्हणून च आत्मज्ञ. वेदान्ती जितके अवैदिक, निरीश्वरवादी, अनात्म-वादी आणि नास्तिक म्हणतां येतील तितका च बुद्ध. तो सम्यक्-संबुद्ध आहे. बुद्ध शुद्ध व्यवहारवादी आहे. ह्या सर्व वादांना त्याच्या मतें स्वतंत्र किंमत नाहीं. ते ब्रह्मचर्याला, अंतःशुद्धीला, जितपत उपयोगी असतील तितकी त्यांची किंमत. म्हणून त्याच्या नांवाशीं जर कोणता वाद जोडायचा च असेल तर तो सम्यग्वाद अथवा परमार्थवाद जोडावा लागेल. आणि त्याचें व्यावहारिक स्थूलरूप तें हें :

'युक्तीचा आहार । नीतीचा व्यवहार ।<br>
वैराग्य हें सार । तरावया ॥' —तुकाराम.

यांत बुद्धधर्माचें आणि म्हणून धम्मपदाचें हि सर्व सार सहज च येऊन जातें.

आश्रम, नालवाडी,<br>
ता. १५-२-४१

**कुन्दर दिवाण**

# दुसरी आवृत्ति

धर्म-पदाची ही दुसरी आवृत्ति. बुद्धाच्या परिनिर्वाणाला या वर्षी २५०० वर्षं पूर्ण होत आहेत. त्याच सुमाराला ही निघत आहे हा सुयोग होय. या आवृत्तींत पांच परिशिष्टें जोडलीं आहेत. दिवंगत बौद्ध-पंडित धर्मानंद कोसंबी यांच्या पुस्तकांतून तीं उद्धृत केलीं आहेत. त्यांच्या योगें भगवान् बुद्धाचें मंतव्य अधिक विशद होईल. स्वतंत्र रीत्या त्यांचें विवेचन करतां आलें असतें, परंतु अधिकारी पुरुषाचें म्हणून तेंच उद्धृत केलें आहे.

या शिवाय पूज्य विनोबांचा 'धम्मपद : एक अध्ययन' हा लेख हि जोडला आहे. इतर पूर्ववत् च आहे. म्हणून यास आवृत्ति म्हटलें. विशेष संशोधन व फेरफार झाला असता तर तें संस्करण झालें असतें. आणि तसें तें पुढच्या वेळेस, जरूर तर, करतां येईल.

याला बुद्धधर्म व तत्त्वज्ञान यांचा परामर्श घेणारा विस्तृत निबंध जोडावा अशी मित्रांनीं सूचना केली होती. परंतु हा सर्वसामान्य असा परिचायक व गुणग्राही प्रयत्न असल्यामुळें यांत त्याला स्थान नाहीं. आणि शेवटीं सर्व परामर्शाचें, विचाराचें वा मीमांसेचें पर्यवसान काय ? तर सार-ग्रहण. "तत् तु समन्वयात्" तें होतें समन्वयानें. म्हणून पूज्य विनोबांच्या शब्दांत बौद्ध व वेदान्त या दोन्ही दर्शनांचा कसा समन्वय होतो तें देऊन च संतोष करूं.

"बौद्धांनीं निषेधक शब्द पसंत केला. माणसाचा मोह त्या देहाबरोबर च नाहींसा व्हावा, तो शून्य व्हावा, म्हणून बौद्धांनीं फक्त निर्वाण शब्द च घेतला. वैदिकांनीं ब्रह्म-निर्वाण असा विधायक शब्द घेतला. वैदिकांना विधायक भाषा आवडली. कां आवडली तें बघा, म्हणजे दोन्ही पक्षांच्या भाषेंतील गोडी व मर्यादा लक्षांत येतील. भाषा म्हटली कीं ती पूर्णपणें निर्दोष असणें शक्य नाहीं. भाषेचें स्वरूप च असें विलक्षण आहे, कीं ती एका बाजूनें अर्थ समजावून देते, तर दुसऱ्या बाजूनें गैरसमज निर्माण करते. विधायक आणि निषेधक दोन्ही भाषांचे भाव लक्षांत घेऊन रुचेल तें स्वीकारा. वैदिकांना वाटलें, कीं मोक्ष अभाव-रूप म्हणण्यापेक्षां भव-रूप म्हणणें योग्य. आम्ही नाहींसे झालों, शून्य झालों म्हणण्यापेक्षां आम्ही व्यापक झालों, अनंत झालों म्हणणें बरें, असें वैदिकांना, वाटलें. उलट बौद्ध म्हणतो, आपण नाहींसे झालों म्हणण्याला असें घाबरतां कां ? जरा हिम्मत करा. शून्य बना. नाहींसे होण्याची भीति सोडा. मी अनंत होईन, व्यापक होईन, सर्वमय होईन म्हणण्यांत जो अस्तित्वाचा मोह आहे, तो द्या सोडून. यावर वैदिक म्हणतो, येथें भीतीचा आणि मोहाचा मुद्दा नाहीं. अनुभूतीच्या विरुद्ध कल्पना कशी करायची ? आतांपर्यंत नानाविध साधना करून सर्व सोडलें आणि आत्मनिष्ठ झालों. जन्म-मृत्यु मागें टाकून आपलें वास्तविक

स्वरूप गांठलें. धर्मानें अधर्म मारला, फलत्यागानें धर्म जिरवला, ईश्वरार्पणानें फलत्याग उडविला, शेवटीं अद्वैतानुभूतीनें ईश्वराला हि माझ्यांत सामावून घेतला, तो मीच नाहींसा होणार हें कसें मानायचें? सर्व अवस्तूंचें निराकरण केल्यानंतर उरणारा जो मी तोच व्यापक झालों, ब्रह्म-मय झालों, हेंच म्हणणें योग्य आहे.

पण मोक्ष भावरूप म्हटला, तरी त्यांत नवीन कांहीं जोडायचें असतें, असा वैदिकांचा हि आशय नाहीं. उलट बौद्धांना हि आत्म्याच्या अस्तित्वाचा निषेध करायचा आहे अशी कल्पना करणें, हा मी त्यांच्याविषयींचा गैरसमज समाजतों. असा गैरसमज अनेकांचा झाला आहे, मोठ्या-मोठ्यांचा झाला आहे, तरी पण तो गैरसमज च आहे. बौद्धांना "मी"ची भाषा नको आहे. मग बाकी जें कांहीं असेल तें असेना कां? म्हणून हा भाषा-भेद मुख्यत: रुचि-भेदामुळें झालेला आहे, असेंच समजलें पाहिजे. त्यांत अर्थाच्या दृष्टीनें मला तरी विशेष कांहीं भेद वाटत नाहीं. बौद्धांना 'मी' चा कंटाळा आहे, ही चांगलीच गोष्ट आहे. अनेक अनुभवांनीं बरबटलेला 'मी' हवाच कशाला? आणि खरोखर ब्रह्म-निर्वाण शब्दांत त्याला कोठें जागा दिली आहे? सूक्ष्म पाहिलें असतां ब्रह्म-निर्वाण शब्द केवळ विधायक नाहीं. तो निषेधक अर्थाला पोटांत गुंडाळून विधायक आहे. तो उभय अर्थाचा संग्राहक अशा कल्पनेनेंच गीतेनें योजला आहे. ब्रह्म-निर्वाण म्हटल्यानंतर 'मी' गेला. ब्रह्म उरलें. त्यांत भिण्यासारखे कांहीं च नाहीं. जेथें शब्दच खुंटले तेथें शब्दासाठीं वाद काय घालायचा? गीतेच्या भाषेंत मी तर असें म्हणेन: "एकं ब्रह्म च शून्यं च, य: पश्यति स पश्यति" जो ब्रह्म आणि शून्य एक पाहतो तोच पाहतो. म्हणून ब्रह्म-निर्वाण शब्दानें सर्व वादच संपविला आहे."

ब्रह्म-मंदिर, गोपुरी<br>रविवार, सूर्यग्रहण<br>२-१२-१९५६

**कुन्दर दिवाण**

# धर्मपद

नमस् तस्मै भगवते अर्हते सम्यक्संबुद्धाय ।

# धर्म-पद

## १ : यमक-वर्ग

१ सारे धर्म मनःपूर्व मनःश्रेष्ठ मनोमय
जो कोणी दुष्ट चित्तानें बोले किंवा करी नर
येतसे दुःख त्यामागें बैलाच्या चाक ज्यापरी १

२ सारे धर्म मनःपूर्व मनःश्रेष्ठ मनोमय
जो कोणी स्वच्छ चित्तानें बोले किंवा करी नर
येतसे सुख त्यामागें छायेसम निरंतर २

३ निंदिलें मारिलें मातें जिंकिलें लुटिलें मज
गांठिती जे असें चित्तीं वैर त्यांचें न संपतें ३

४ निंदिलें मारिलें मातें जिंकिलें लुटिलें मज
न गांठिती असें चित्तीं वैर त्यांचें चि संपतें ४

५ वैरानें वैर केव्हां हि नाहीं संपत हें इथें
अवैरानें चि तें संपे धर्म हा चि सनातन ५

६ नेणती लोक, आम्ही तों आवरूं आपणा इथें
असें जे जाणती त्यांचे वैर-विग्रह संपती ६

७ फिरे जो शुभ-दृष्टीनें इंद्रियें जो न सांवरी
नेणे जो भोजनीं माप हीन-पौरुष आळशी
वारा दुर्बल झाडाला पोडी मार तसा तया ७

८ फिरे अशुभ-दृष्टीनें इंद्रियें पूर्ण सांवरी
जाणे जो भोजनीं माप श्रद्धा-वीर्य-समन्वित
पर्वतास जसा वारा न पोडी मार तो तया ८

९ कषाय न मुळीं गेलें वस्त्र कापाय नेसतो
सोडिला दम-सत्यांनीं काषायास न योग्य तो ९

१० कषाय टाकिलें ज्यानें युक्त शीलांत जो सदा
जोडिला दम-सत्यांनीं काषायांबर-योग्य तो १०

११ असारीं मानिती सार आणि सारीं असार जे
मिथ्या-संकल्पकारी ते कधीं सार न पावती ११

१२ जाणती सार सारांत असारांत असार जे
सम्यक्संकल्पकारी ते पावती सार निश्चित १२

१३ घरीं जशी शिरे वृष्टि छावलें जें नसे बरें
तसा राग शिरे चित्तीं नसे भावित जें बरें १३

१४ न शिरे वृष्टि ती तेथ छावलें नीट जें घर
तसें भावित जें चित्त तिथें राग न तो रिघे १४

१५ रडतो उभयत्र पातकी
नर पापी रडतो इथें तिथें
रडतो पडतो पुन्हां पुन्हां
बघुनी क्लेश-द कर्म आपुलें १५

१६ नर एथ नि तेथ मोदतो
शुभ-कर्मा उभयत्र मोदतो
बहु मोद प्रमोद पावतो
बघुनी कर्म विशुद्ध आपुलें १६

१७ नर एथ नि तेथ तापतो
नर पापी उभयत्र तापतो
कृतपाप म्हणूनि तापतो
फिरुनी दुर्गत तापतापतो १७

१८ नर एथ नि तेथ नंदतो
शुभ-कर्मा उभयत्र नंदतो
कृत-पुण्य म्हणूनि नंदतो
फिरुनी सद्गत नंदनंदतो १८

१९ बोले जरी फार हि संहिता ती
न आचरी ती नर जो प्रमत्त
न होतसे तो श्रमणत्व-भागी
जसा गुराखी न धनी गुरांचा १९

२० बोले जरी अल्प हि संहिता ती
चाले परी धर्मपथानुसार
सांडूनिया राग नि द्वेष मोह
यथार्थ बोधें सुविमुक्त-चित्त
इच्छी न कांहीं न इथें तिथें वा
तो एक होई श्रमणत्व-भागी २०

इति यमक-वर्ग प्रथम

# २ : अप्रमाद-वर्ग

२१ अमृताचें अप्रमाद प्रमाद पद मृत्युचें
न अप्रमत्त मरती प्रमत्त मृत-तुल्य चि १

२२ जाणूनि पंडित-श्रेष्ठ अप्रमाद-विशेष हा
मोदती अप्रमादांत आर्यांच्या रमले पथीं २

२३ ते ध्यानी नित्य उद्युक्त सदा दृढ-पराक्रमी
पावती धीर निर्वाण योग-क्षेम अनुत्तर ३

२४ स्मृतिमंत सदा विमृश्य-कारी
शुचि-कर्मा यत-चित्त धर्म-जीवी
नर उद्यम-शील अप्रमत्त
यश पावे शुभ वर्धमान लोकीं ४

२५ उद्योगें अप्रमादानें संयमें नि दमें तसें
करावें द्वीप धीरें जें न ओघ विखरूं शके ५

२६ लागती ते प्रमादाच्या भजनीं लोक बालिश
अप्रमाद सदा धीर राखे श्रेष्ठ धनापरी ६

२७ न भजा रे प्रमादास भोगामध्यें रमूं नका
ध्यानी तो अप्रमादानें अपार सुख पावतो ७

२८ अप्रमादें प्रमादास जेव्हां पंडित हांकितो
प्रज्ञा-प्रासाद वेंघूनि सुखी दुःखि-जनांस तो
कूटस्थसा तलस्थांस धीर मूढांस देखितो ८

२९ अप्रमत्त प्रमत्तांत निद्रितांत अतंद्रित
दुर्बलाश्वास शीघ्राश्व टाकी मागें तसा सुधी ९

३० अप्रमादें चि मघवा देवेंद्र-पद पावला
प्रमाद निंदिला नित्य अप्रमाद प्रशंसिती १०

३१ अप्रमत्त सदा भिक्षु प्रमादीं भय पाहता
संयोजन अणु-स्थूल अग्निसा जाय जाळित ११

३२ रंगला अप्रमादांत प्रमादीं भय पाहता
सुटला पतनांतूनि निर्वाणान्तिक भिक्षु तो १२

इति अप्रमाद-वर्ग-द्वितीय

## ३ : चित्त-वर्ग

३३ चित्त चंचळ ओढाळ दुर्निवार नि दुर्धर
करी सरळ मेधावी बाण-कार जसा शर १

३४ जळांतला जसा जीव टाकिला धरणी-तळीं
तड्फडे हें तसें चित्त सोडितां मार-राज्य हें २

३५ असे चपल दुःसाध्य चित्त हें स्वैर केवळ
दमावें तें प्रयत्नानें चित्त दान्त सुखावह ३

३६ स्वरूप न कळे ह्याचें फसवें स्वैर चित्त हें
राखावें चित्त सुज्ञानें सुखाचें चित्त राखिलें ४

३७ एकटें दूर जाणारें अशरीर गुहाशय
बांधिती चित्त जे ते चि तोडिती मार-बंधनें ५

३८ स्थिरावलें नसे चित्त नेणे सद्धर्म जो तसा
प्रसाद ढळला ज्याचा प्रज्ञा त्याची न फांकते ६

३९ ज्याचें चित्त अनासक्त बुद्धि ज्याची अनाहृत
त्या पापपुण्य-मुक्तास जागत्यास नसे भय ७

४० घटापरी हा समजूनि देह
प्राकारसें सज्ज करूनि चित्त
प्रज्ञायुधें मार सदा लढावा
असक्त-भावें जित तें जपावें ८

४१ परवां हाय हा काय भूवरी पहुडेल कीं
विज्ञान-शून्य निःसार टाकिला बाहुला जसा ९

४२ वैरी दुर्गति वैऱ्याची अरीची करितो अरि
अयुक्त आपुलें चित्त करी तीहूनि दुर्गति १०

४३ न करी माय वा बाप अथवा अन्य बांधव
युक्त तें आपुलें चित्त करी कल्याण तेवढें ११

इति चित्त-वर्ग तृतीय

## ४ : पुष्प-वर्ग

४४ पृथिवी यम-लोक देव-लोक
भुवनें कोण करील हीं अधीन
मुनि-बोधित-धर्मवाक्य-पुष्प
नर वेंचील अभिज्ञ कोण येथें १

४५ पृथिवी यम-लोक देव-लोक
भुवनें शैक्ष करील हीं अधीन
मुनि-बोधित-धर्मवाक्य-पुष्प
नर वेंचील अभिज्ञ शैक्ष तो चि २

४६ फेसापरी ही समजूनि काया
जाणूनि जो ती मृग-तृष्णिकेशी
छेदूनि टाकी नर मार-पुष्पें
दृष्टींतुनी तो निसटे यमाच्या ३

४७ माराचीं तीं फुलें वेंची सक्त चित्तें तया मग
पूरसा सुप्त गांवास मृत्यु घेऊनि जातसे ४

४८ माराचीं तीं फुलें वेंची सक्त चित्तं तया मग
भोग-लुब्ध अतृप्तास मृत्यु येऊनि गांठतो ५

४९ जसा भ्रमर पुष्पाचा वर्ण गंध न नाशितां
पळतो रस घेऊनि ग्रामीं मुनि फिरो तसा ६

५० न दुर्वर्तन लोकांचें न लोकांचें कृताकृत
आपुलें चि विलोकावें कृताकृत पुन्हां पुन्हां ७

५१ मनोहर सुवर्णाचें पुष्प निर्गंध तें जसें
तसें आचार-हीनाचें सुभाषित निरर्थक ८

५२ मनोहर सुवर्णाचें सुगंधी पुष्प तें जसें
तसें आचारवंताचें सुभाषित कृतार्थ तें ९

५३ राशींतूनि फुलांच्या त्या कराव्या मालिका जशा
तशा जन्मूनिया मर्त्यें कराव्या पुण्य-मालिका १०

५४ न पुष्प-गंध प्रतिवात वाहे
न तो तसा चंदन-गंध किंवा
सद्गंध वाहे प्रतिवात लोकीं
दाही दिशा सज्जन-गंध वाहे ११

५५ मोगरी तगरी जाई जुई चंदन उत्पल
गंध-जातांत ह्या एक शील-गंध अनुत्तर १२

५६ तुच्छ केवल तो गंध जो हा तगर-चंदनी
जो गंध शीलवंताचा वाहे देवांत थोर तो १३

५७ अप्रमाद-विहारी जे शील-संपन्न जे सदा
सु-ज्ञानें मुक्त जे त्यांच्या मार वाटे न जातसे १४

५८ मार्गाविकीर्ण केरांत स्थल-पद्म फुटे जसें
शोभायमान सर्वत्र शुचिगंध मनोरम १५

५९ तसा अवकाराकार अंधभूत पृथग्जनीं
शोभे प्रज्ञा-प्रभेनें तो सम्यक्संबुद्ध-श्रावक १६

इति पुष्प-वर्ग चतुर्थ

## ५ : बाल-वर्ग

६० जागत्यास निशा दीर्घ दीर्घ श्रान्तास योजन
मूर्खास दीर्घ संसार जे सद्धर्म न जाणती १

६१ प्रवासी न जरी लाभे श्रेष्ठ वा आत्म-तुल्य हि
निश्चयें एकटें जावें मूर्ख हा न सहायक २

६२ 'पुत्र माझा, वित्त माझें' मूर्ख विह्वलतो असें
आप जो आपुला नाहीं कोठचे पुत्र वित्त तें ३

६३ जो मूर्ख मूर्खता जाणे तावन्मात्रें चि धीर तो
मूर्ख जो पंडितंमन्य तो खरा मूर्ख बोलिला ४

६४ यावज्जीव जरी मूर्ख करी विद्वदुपासना
न जाणे धर्म तो कांहीं रसास्वाद जशी पळी ५

६५ मुहूर्तभर हि प्राज्ञ करी विद्वदुपासना
तत्काळ धर्म तो जाणे रसना रस ती जशी ६

६६ करिती मूर्ख दुर्बुद्धि पाप-कर्में दुरन्त तीं
जोडिती आपुलें वैर मूर्ख दुर्बुद्धि आपण ७

६७ न तें कर्म भलें केलें जें करूनि रडे मन
भोगावें लागतें ज्याचें फळलें अश्रु ढाळित ८

६८ तें चि कर्म भलें केलें करितां रडवी न जें
भोगितां परिणामीं जें अंतरीं मोद वाढवी ९

६९ मधुसें मानितो मूर्ख न पिके पाप जोंवरी
जेव्हां पाप पिके तेव्हां पावतो दुःख मूढ तो १०

७० मासोमासीं कुशाग्रानें मूर्ख यद्यपि जेविला
न होई योग्य विज्ञांच्या सोळाव्या हि कलेस तो ११

७१ न शीघ्र विरजे पाप दूध साजुक तें जसें
अग्निसें गुप्त भस्मानें जाय मूर्खास जाळित १२

७२ जोंवरी वित्त मूर्खाचें अनर्थास चि कारण
माथा खांडूनिया त्याचा सत्त्वाची हानि तें करी १३

७३ नसती मान्यता लाभो लाभो भिक्षूंत गौरव
आवासीं प्रभुता लाभो पूजा पर-कुलीं तशी १४

७४ माझें चि कृत्य मानोत गृही आणि वनी जन
माझे चि वश राहोत कृत्याकृत्यांत सर्वदा
असा हा मूर्ख-संकल्प वाढे हांव नि मीपण १५

७५ ऋद्धीचा वेगळा मार्ग निर्वाणाचा हि वेगळा
बुद्ध-श्रावक भिक्षूनें असें हें नीट जाणुनी
आदरावा न सत्कार वाढवावा विवेक तो १६

इति बाल-वर्ग पंचम

## ६ : पंडित-वर्ग

७६ निधि-वाचकसा होय धीर जो दोष-दर्शक
निग्रहाचे वदे शब्द सेवावा तो चि पंडित
तसा पंडित सेवूनि पावे श्रेय न पाप तो १

७७ वाक्ताडन करी दडी पापापासूनि वारितो
प्रिय संतांसि तो होई असंतां होय अप्रिय २

७८ पाप मित्र न सेवावा न सेवावा नराधम
कल्याण मित्र सेवावा सेवावा पुरुषोत्तम ३

७९ प्रसाद-युक्त चित्तानें धर्म-प्रीति निजे सुखें
आर्योपदिष्ट धर्मांत रमे पंडित सर्वदा ४

८० वळवी जळ पाटकार माळी
वळवी बाण हि बाणकार नीट
वळवी नमवी सुतार काठी
वळवी पंडित तो चि आपणास ५

८१ शिला-घन जसा शैल पवनें न डगे कधीं
तसे निंदा-प्रशंसांत डगती ना सुपंडित ६

८२ जसें प्रसन्न गंभीर अकर्दम सरोवर
प्रसाद पावती धीर धर्म ऐकूनिया तसें ७

८३ ते त्यागिती पंडित संग सर्व
न चर्चिती भोग पुन्हां कधीं ते
सुखांत दुःखांत सदा समान
न पावती हर्ष न खेद कांही ८

८४ इच्छी न जो स्वार्थ परार्थ किंवा
न पुत्र ना वित्त न भूमि कांहीं
इच्छी अधर्में न कधीं समृद्धि
सुशील तो धार्मिक तो सुधी तो ९

८५ मोजके ते मनुष्यांत पावती पैल तीर जे
यातायात करी सारा उरला लोक हा इथें १०

८६ सम्यक्कीर्तित जो धर्म वागती त्यांत जे सदा
लंघूनि पार ते जाती मृत्यु-राज्य सदुस्तर ११

८७ धर्म तामस टाकूनि सेवावा धर्म सात्त्विक
घरांतूनि वना यावें रमणें जेथ दुष्कर १२

८८ रमावें पंडितें तेथ विवेकीं संग सोडुनी
करावी आपुली शुद्धि चित्त-क्लेश धुऊनिया १३

८९ संबोध्यंगांमधें ज्यांचें चित्त सम्यक् स्थिरावलें
होऊनि जे अनासक्त रमले अपरिग्रहीं
ते क्षीणास्रव वर्चस्वी एथ निर्वाण पावले १४

इति पंडित-वर्ग षष्ठ

# ७ : अर्हन्त-वर्ग

९० संसार-मार्ग लंघूनि पावला मुक्ति सर्वथा
न पावे शोक-संताप भिन्न-ग्रंथि महाशय १

९१ झटती स्मृति-शाली ते रमती न निकेतनीं
जसे पल्वल ते हंस टाकिती घर-दार ते २

९२ नसे सांठविलें ज्यांनीं जे युक्ताहार सेविती
जे विलक्षण शून्यत्व-रूप निर्वाण भोगती
नभीं जशी विहंगांची तयांची न कळे गति ३

९३ जे क्षीणास्रव निष्पाप जे अनासक्त भोजनीं
जे विलक्षण शून्यत्व-रूप निर्वाण भोगती
नभीं जशी विहंगांची तयांची न कळे गति ४

९४ सर्वेंद्रियें तीं शमलीं जयाचीं
घोडे जसे शिक्षित सारथ्याचे
निर्मान जो आस्रव-हीन लोकीं
अर्हंत तो देव हि वांछिती ते ५

९५ क्षमे परी जो असपत्न लोकीं
जो इन्द्र-कीलासम कीं व्रतस्थ
ह्रदापरी निर्मल होय पोटीं
अर्हंत संसार न पावतो तो ६

९६ चित्त शांत असे त्याचें बोलणें करणें तसें
जाणूनि मोकळा झाला निवाला तो असे मनीं ७

९७ अश्रद्ध नि अकृत-ज्ञ संधि-च्छेदक जो तसा
हतावकाश वान्ताश तो चि उत्तम पूरुष ८

९८ जनीं वा विजनीं किंवा तळीं वा अथवा स्थळीं
अर्हंत रमती जेथें धरणी रमणीय ती ९

९९ रमणीय अरण्यें तीं जेथ लोक न तो रमे
विरक्त रमती तेथें जे ते भोग न मागती १०

इति अर्हंत-वर्ग सप्तम

## ८ : सहस्र-वर्ग

१०० सहस्र वचनांपेक्षां व्यर्थ जीं शब्द-डंबर
एक सार्थ पद श्रेष्ठ जें ऐकूनि निवे मनीं १

१०१ गाथा-दशशतांहूनि व्यर्थ जीं शब्द-डंबर
एक गाथा-पद श्रेष्ठ जें ऐकूनि निवे मनीं २

१०२ शतावधि नको गाथा व्यर्थ शब्दावडंबर
एक धर्म-पद श्रेष्ठ जें ऐकूनि निवे मनीं ३

१०३ दश-लक्षांस जो एक संग्रामीं जिंकितो, न तो;
जो एक आपणा जिंके तो चि झुंजार उत्तम ४

१०४ हा आत्म-जय पैं श्रेष्ठ सदा लोक-जयाहुनी
जिंकिला आपुला आत्मा चालतो संयमें सदा ५

१०५ न ते देव न गंधर्व स-विधाता न मार हि
तथाविध मनुष्याचें जिंकिलेलें हरूं शके ६

१०६ मासोमासीं सहस्रानें शत वर्षे यजी, पुन्हां
भावितात्म्यास जो पूजी मुहूर्तभर एकदा
पूजा चि ती असे श्रेष्ठ शत वर्षे न यज्ञ तो ७

१०७ अग्नीची शत वर्षें जो परिचर्या करी वनीं
भावितात्म्यास जो पूजी मुहूर्तभर एकदा
पूजा चि ती असे श्रेष्ठ शत वर्षें न यज्ञ तो ८

१०८ जें होमिलें जें यजिलें हि लोकीं
समग्र संवत्सर पुण्य-लोभें
होई न तें सर्व हि पाद-मात्र
संतांस तें वंदन एक श्रेष्ठ ९

१०९ वडिलांची करी सेवा करी जो नित्य वंदन
हीं चार वाढती त्याचीं आयु:-सौख्य-यशो-बल १०

११० जिणें अयुक्त दु:शील शत वर्षे हि तें नको
एकाह जीवित श्रेष्ठ शील-सपन्न युक्त जें ११

१११ जिणें अयुक्त दुष्प्रज्ञ शत वर्षे हि तें नको
एकाह जीवित श्रेष्ठ प्रज्ञा-संपन्न युक्त जें १२

११२ आलस्य-मग्न निर्वीर्य शत वर्षे जिणें नको
एकाह जीवित श्रेष्ठ दृढ जें वीर्यवंत जें १३

११३ नको शताब्द जगणें आय-व्यय न पाहतां
एकाह जीवित श्रेष्ठ पाहुनी आय नि व्यय १४

११४ न पाहतां तें अमृत शताब्द जगणें नको
एकाह जीविन श्रेष्ठ लोकीं अमृन पाहुनी १५

११५ नको शताब्द जगणें थोर धर्म न पाहतां
एकाह जीवित श्रेष्ठ धर्म पाहुनी थोर तो १६

इति सहस्र-वर्ग अष्टम

# ९ : पाप-वर्ग

११६ त्वरा करावी कल्याणीं वारावें चित्त पापतः
रमतें मन पापांत पुण्य-कार्य विलंबतां १

११७ केलें जें पाप तें केलें न करावें पुन्हां पुन्हां
त्याचा छंद न लावावा दुःखाचा पाप-संचय २

११८ केलें पुण्य करावें रे करावें तें पुन्हां पुन्हां
त्याचा चि छंद लावावा सुखाचा पुण्य-संचय ३

११९ पापी हि पाहतो पुण्य न पिके पाप जोंवरी
पिके पाप तदा पाहे पापी तो पाप आपुलें ४

१२० पाहे साधु हि तो पाप न पिके पुण्य जोंवरी
पिके पुण्य तदा पाहे साधु तो पुण्य आपुलें ५

१२१ अवहेलूं नये पाप कीं तें पावेल ना मज
जलबिंदु-निपातानें घडा हि भरतो, तसा
पापानें भरतो मूर्ख थोडें थोडें करूनि तो ६

१२२ अवहेलूं नये पुण्य कीं तें पावेल ना मज
जलबिंदु-निपातानें घडा हि भरतो, तसा
पुण्यानें भरतो धीर थोडें थोडें करूनि तो ७

१२३ भय-मार्ग जसा टाळी अल्प-सार्थ धनी वणिक्
टाळावीं पाप-कर्में तीं जिजीविषु जसा विष ८

१२४ विष हाताळतां येई हात अक्षत तो जरी
अक्षता विष बाधेना अकर्त्या पाप तें नसे ९

१२५ जो दूषितो शुद्ध अदुष्ट लोकां
निष्पाप लोकांस हि निंदितो जो
तें त्या चि मूर्खावरि पाप येतें
त्या फेकिल्या वायु-मुखीं धुळीसें १०

१२६ जन्मती एक ते गर्भीं पापी निरय भोगिती
सुगती पावती स्वर्ग निर्वाण विगतास्रव ११

१२७ न अंतरिक्षांत न सागरांत
न पर्वताच्या विवरीं हि किंवा
नसे असा ह्या जगतीं प्रदेश
पापांतुनी जेथ सुटेल लोक १२

१२८ न अंतरिक्षांत न सागरांत
न पर्वताच्या विवरीं हि किंवा
नसे असा ह्या जगतीं प्रदेश
जेथें धराया न धजेल मृत्यु १३

इति पाप-वर्ग नवम

# १० : दण्ड-वर्ग

१२९ त्रासती सर्व दण्डास सर्व मृत्यूस कांपती
करूनि उपमा आत्मा न मारीं न'व मारवीं १

१३० त्रासती सर्व दण्डास सर्वांना जीवित प्रिय
करूनि उपमा आत्मा न मारीं न'व मारवीं २

१३१ सुख-कामुक जीवांची जो सुखेप्सु चि आपण
दण्डानें करितो हिंसा न पावे सुख तो पुढें ३

१३२ सुख-कामुक जीवांची जो सुखेप्सु चि आपण
दण्डानें न करी हिंसा तो पुढें सुख पावतो ४

१३३ कठोर बोल ना कोणा बोलतां बोलतील ते
प्रत्युत्तर असे दुःख प्रत्याघातास कारण ५

१३४ उपडें टाकिलें कांसें तसा निःशब्द तूं जरी
तूं पावलासि निर्वाण प्रत्युत्तर नसे तुझें ६

१३५ गुराखी हांकितो गाई दण्डानें कुरणाकडे
जरा-मृत्यु तसे नेती प्राण्यांचें आयु हांकित ७

१३६ करीत असतां पापें नेणे मूर्ख दुरन्त तीं
दुर्बुद्धि त्या चि कर्मांनीं तापतो अग्नि-दग्धसा ८

१३७ दण्डी अदण्डच लोकांस जो अदुष्टांस दूषितो
दहांतील दशा एक तो तत्काल चि पावतो ९

१३८ पावतो वेदना तीव्र, हानि, शारीर भेदन
व्याधि भीषण तो पावे चित्त-संक्षोभ वा तसा १०

१३९ राजापासूनिया त्रास मिथ्या आरोप दारुण
बंधूंचा नाश तो पावे पावे तो भोग-नाश वा ११

१४० अथवा जाळितो त्याचीं घरें-दारें महानल
मंद तो नरका जाय देह-पाताअनंतर १२

१४१ न नग्न-चर्या न जटा न पंक
न भूमि-शय्या न उपोषणें वा
न शोधितो जागर भस्म-लेप
मर्त्यास निःसंशयता न येतां १३

१४२ असो धनी चालतसे समत्वें
जो शान्त जो दान्त नि ब्रह्मचारी
कोणावरी दण्ड न जो उगारी
तो भिक्षु तो ब्राह्मण तो तपस्वी १४

१४३ लज्जा-निषेध जो पावे विरळा चि जगीं असा
अपशब्द न जो ऐके कशाघात सदश्वसा १५

१४४ उठा कशा-ताडित अश्वसे झटा
प्रयत्न उत्साह धरूनि चालवा
श्रद्धा तसें शील तसें चि वीर्य
समाधि प्रज्ञा-बल ह्या गुणांनीं
होऊनि संपन्न विनीत दक्ष
द्या टाकुनी दुःख अनल्प जें हें १६

१४५ वळवी जळ पाटकार माळी
वळवी बाण हि बाणकार नीट
वळवी नमवी सुतार काठी
वळवी सुव्रत तो चि आपणास १७

इति दण्ड-वर्ग दशम

# ११ : जरा-वर्ग

१४६ कोण हास कसा हर्ष पेटलें असतां सदा
गढलां अंधकारांत शोधितां न दिवा कसा १

१४७ पहा विचित्र हें रूप रुग्ण आतुर संहत
संकल्प-पूर्ण रे ह्याची स्थिति ही शाश्वती नसे २

१४८ अत्यंत जीर्ण हें रूप रोगांचें घर भंगुर
फुटे हें घाण-गांठोडें जिणें हें मरणान्त चि ३

१४९ शरदीं फेकलेलीं तीं जशीं कीं तुंबिनी-फळें
कपोत-वर्ण हाडें हीं पाहतां कोणतें सुख ४

१५० हाडांचा दुर्ग हा केला लिंपिला मांस-लोहितें
ठेला जेथ जरा मृत्यु ठेला मान नि वंचना ५

१५१ होती नृपांचे रथ चित्र जीर्ण
तसें चि हें जीर्ण शरीर होतें
सद्धर्म तो जीर्ण न होय लोकीं
संतांस ते संत चि सांगती हें ६

१५२ जो अल्प-श्रुत हा लोक वाढे तो बलिवर्दसा
वाढतो पिंड मांसाचा प्रज्ञा त्याची न वाढते ७

१५३ अनेक जन्म-संसार व्यर्थ मी धावधावलों
गृहकारक शोधीत दुःख हें जन्मजन्मणें ८

१५४ देखिला गेहकारा तूं करिशी न पुन्हां घर
भंगले सगळे वांसे तुझें आढें हि मोडलें
निर्वाण-गत चित्तानें तृष्णांचा क्षय गांठिला ९

१५५ न केली ब्रह्म-चर्या हि यौवनीं हि न जोडिलें
ते क्षीण-मीन कासारीं झुरती जीर्ण क्रौंचसे १०

१५६ न केली ब्रह्म-चर्या हि यौवनीं हि न जोडिलें
करीत शोक गेल्याचा पडती जीर्ण चापसे ११

इति जरा-वर्ग एकादश

## १२ : आत्म-वर्ग

१५७ आत्मा प्रिय जरी वाटे राखावा तो सुरक्षित
जागावें तीन यामांत एखादा याम पंडितें १

१५८ योग्य कार्यास लागावें आधीं आपण पंडितें.
दुजास मग सांगावें न पावे क्लेश पंडित २

१५९ जसें दुजास शिकवू व्हावें आपण रे तसें
दमावें आपणा नीट सदा आत्मा चि दुर्दम ३

१६० आत्मा चि आपुला नाथ दुसरा नाथ कोणता
दमतां आपुला आत्मा लाभतो नाथ दुर्लभ ४

१६१ पाप आपण केलेलें आत्म-संभव आत्म-ज
दुरात्म्याचा करी वेध मण्याचा वज्र तें जसें ५

१६२ दुःशीलत्व चढे ज्याचें सालीं मालु-लता जशी
जसें ते इच्छिती द्वेषी तसें तो आपणा करी ६

१६३ वाईट करणें सोपें सोपें अहित आपुलें
चांगलें जें हिताचें जें तें चि अत्यंत दुष्कर ७

१६४ आर्यांचें धर्म-जीवींचें अर्हतांचें सुशासन
निंदी जो मंद दुर्बुद्धि दृष्टि ठेवुनि पापिणी
फळे तो आत्म-घातास फळे कळक तो जसा

१६५ आत्मा चि करितो पाप आत्मा चि मळतो मग
आत्मा चि न करी पाप आत्मा चि निवळे मग
अशुद्धि शुद्धि प्रत्यात्म कोणी कोणा न शोधितो ९

१६६ प्रभूत हि परार्थानें आत्मार्थ गमवूं नये
आत्मार्थ नीट जाणूनि सदर्थी सावधान व्हा १०

इति आत्म-वर्ग द्वादश

## १३ : लोक-वर्ग

१६७ हीन धर्म न सेवावा प्रमादें विचरूं नये
मिथ्या-दृष्टि न सेवावी लोक हा वाढवूं नये १

१६८ ऊठ प्रमाद न करीं विधिवत् धर्म आचरीं
धर्मचारी सुखें झोपे इथें आणि तिथें हि कीं २

१६९ आचरीं धर्म रीतीनें आचरीं न कसा तरी
धर्मचारी सुखें झोपे इथें आणि तिथें हि कीं ३

१७० पहावी मृग-तृष्णा ती पहावा बुड्बुडा जसा
तसा हा लोक जो पाहे पाहे मृत्यु न त्यास तो ४

१७१ अरे या हा पहा लोक चित्र राज-रथासम
मूढ ते बसती येथ होती निःसंग जाणते ५

१७२ प्रमादांतूनि जो आला प्रमाद न करी पुन्हां
उजळी लोक तो सारा अभ्र-मुक्त विधूपरी ६

१७३ कुशलें झांकतें ज्याचें केलेलें पाप आघवें
उजळी लोक तो सारा अभ्र-मुक्त विधूपरी ७

१७४ आंधळा लोक हा सारा विरळा देखणा इथें
विरळा जाय स्वर्गास जाल-मुक्त विहंगसा ८

१७५ हंस विष्णु-पदीं जाती जाती ऋद्धि-बळें नभीं
प्रस्थान करिती धीर बलवान् मार जिंकुनी ९

१७६ सोडिला एकला धर्म पर-लोक हि टाकिला
मृपा-वादी असे त्यास नसे पाप अकार्य जें १०

१७७ कदर्य जे स्वर्ग न पावती ते
प्रशंसिती दान न मंद मात्र
जो धीर लोकीं अभिनंदितो तो
तेणें चि तो होय सुखी परत्र ११

१७८ एकाधिपत्य पृथ्वीचें न वा स्वर्गति ती तशी
न तसें विश्व-साम्राज्य स्रोतापत्ति विशेष ती १२

इति लोक-वर्ग त्रयोदश

# १४ : बुद्ध-वर्ग

१७९ विजयास जयाचिया कधीं
जन चोरूं न शके न पोहचूं ।
पद-हीन अनंत-गोचर
मुनि बुद्धा मग न्याल त्या कसे १

१८० न कुठें हि हरूं शके जया
हत-तृष्णा अतिसंग-जालिनी
पद-हीन अनंत-गोचर
मुनि बुद्धा मग न्याल त्या कसे २

१८१ धीर जे ध्यानशाली जे नैष्क्रम्योपशमीं रत
स्मृति-संयुक्त संबुद्ध त्यांस देव हि वांछिती ३

१८२ देह दुर्लभ मर्त्याचा मर्त्य-जीवन दुर्लभ
धर्म-श्रवण दुर्लभ्य बुद्धोद्भव सुदुर्लभ ४

१८३ सोडणें सर्वथा पाप जोडणें पुण्य-संपदा
शोधणें आपुलें चित्त बुद्धांचें सांगणें असें ५

१८४ तप थोर जगीं क्षमा तितिक्षा
पर निर्वाण चि बोलती सुबुद्ध
न कधीं पर-हानि-घात-कारी
वन-वासे नर होय भिक्षु लोकीं ६

१८५ अविवाद, अनाघात, **प्रातिमोक्षांत** संवर
भोजनीं जाणणें माप, विजनीं **शयनासन**
स्व-चित्ताचें समाधान, बुद्धांचें सांगणें असें ७

१८६ न कार्षापण-वर्षानें भोगांची तृप्ति होतसे
अल्प-स्वाद महा-दुःख भोग जाणूनि पंडित ८
१८७ न रमे दिव्य भोगीं हि तृष्णा-क्षय-परायण
रमे तृष्णा-क्षयामध्यें सम्यक्-सबुद्ध-श्रावक ९
१८८ घेती आश्रय रानांचा पर्वतांचा हि पुष्कळ
उद्यान-वृक्ष-चैत्यांचा भय-संत्रस्त मानव १०
१८९ न हा आश्रय कल्याण न हा आश्रय उत्तम
न हा आश्रय पावूनि दुःखांतूनि सुटे नर ११
१९० गेला शरण बुद्धास धर्मा संघास जो तसा
सम्यक्-प्रज्ञाबळें देखे आर्य-सत्यें चतुर्विध १२
१९१ दुःख, दुःख-समुत्पत्ति, दुःखांचा समतिक्रम
दुःखोपशमगामी तो आर्य अष्टांग मार्ग हि १३
१९२ हा चि आश्रय कल्याण हा चि आश्रय उत्तम
हा चि आश्रय पावूनि दुःखांतूनि सुटे नर १४
१९३ विरळा पुरुष-श्रेष्ठ न तो सर्वत्र जन्मतो
जेथ तो जन्मतो धीर वाढतें सुख त्या कुळीं १५
सुख उत्पत्ति बुद्धांची सुख धर्मोपदेश तो
सुख संहति संघाची तपस्या सुख सांघिक १६
१९५ बुद्ध वा अथवा भिक्षु पूजी पूज्य जनांस जो
प्रपंचातीत जे झाले तरले भय शोक जे १७
१९६ पूजार्हांस अशा पूजी अकुतोभय निर्वृत
पुण्य त्याचें न कोणी हि इयत्तेनें गणूं शके १८

इति बुद्ध-वर्ग चतुर्दश

सुख-वर्ग ... क्र: ...२५
... नों क्र ...

# १५ : सुख-वर्ग

१९७ वैऱ्यांमधें अवैरानें जगूं या जगतीं सुखें
विहरूं या अवैरानें सुखें वैरि-जनांमधें १

१९८ सुख-रूप जगूं लोकीं आतुरांत अनातुर
सुखें आतुर लोकांत विहरूं या अनातुर २

१९९ सुख-रूप जगूं लोकीं उत्सुकांत अनुत्सुक
सुखें उत्सुक लोकांत विहरूं या अनुत्सुक ३

२०० सुख-रूप जगूं लोकीं अकिंचन असंग्रह
प्रीति-भोजन भक्षूं या आभास्वर सुरांपरी ४

२०१ जयानें उपजे वैर निजे दुःखें पराजित
जयापजय सोडूनि निवाला पहुडे सुखें ५

२०२ रागासम नसे अग्नि द्वेषासम हानि हि
स्कन्धासम नसे दुःख न शांतीपरतें सुख ६

२०३ दुःख दारुण संस्कार बुभुक्षा रोग दारुण
जाणे हें नीट तो जाणे निर्वाण सुख उत्तम ७

२०४ लाभ उत्तम आरोग्य संतोष धन उत्तम
बंधु उत्तम विश्वास निर्वाण सुख उत्तम ८

२०५ एकांताचा नि शांतीचा पिऊनि रस शीतल
होय निर्भय निष्पाप धर्म-प्रीति-रस-ज्ञ तो ९

२०६ साधु दर्शन आर्यांचें सत्संगति सदा सुख
मूर्ख-दर्शन टाळूनि सुखी होय सदा नर १०

२०७ मूर्ख-संगत मार्गानें शोक दूरवरी करी
दु:ख संगम मूर्खांचा शत्रूसह जसा सदा
सुख संगम धीरांचा जसा बंधु-समागम ११

२०८ प्राज्ञास धीरास बहु-श्रुतास
धौरेय-शीलास धृत-व्रतास
आर्यास संतास सदा भजावें
सुधांशु नक्षत्र-पथा जसा तो १२

इति सुख-वर्ग पंचदश

## १६ : प्रिय-वर्ग

२०९ आयोगीं योजितो आत्मा योगीं योजी न जो नर
श्रेय सोडूनि घे प्रेय युक्ताची तो स्पृहा धरी १

२१० प्रियांसह नको वास नको तो अप्रियांसह
प्रिय-विच्छेद तो दु:ख दु:ख अप्रिय-योग तो २

२११ तरी प्रिय नको कांहीं प्रियापगम दु:खद
होती निर्ग्रंथ ते संत प्रियाप्रिय नसे जयां ३

२१२ प्रियापासूनिया शोक प्रियापासूनिया भय
प्रियांतूनि सुटे त्यास नसे शोक कसें भय ४

२१३ प्रेमापासूनिया शोक प्रेमापासूनिया भय
प्रेमांतूनि सुटे त्यास नसे शोक कसें भय ५

२१४ रतीपासूनिया शोक रतीपासूनिया भय
रतींतूनि सुटे त्यास नसे शोक कसें भय ६

२१५ कामापासूनिया शोक कामापासूनिया भय
कामांतूनि सुटे त्यास नसे शोक कसें भय ७

२१६ तृष्णेपासूनिया शोक तृष्णेपासूनिया भय
तृष्णेंतूनि सुटे त्यास नसे शोक कसें भय ८

२१७ शील-दर्शन-संपन्न करी कर्तव्य आपुलें
धर्म-स्थ सत्य-वादी जो होय तो प्रेम-भाजन ९

२१८ लोभला जो अनाख्यातीं स्पर्शला जो मनें तसा
भोगीं न गुंतला चित्तें तो **ऊर्ध्व-स्रोत** बोलिला १०

२१९ प्रवासी दीर्घ-कालानें येतां कुशल दूरुनी
ज्ञाति मित्र सुहृत् त्यास प्रेमानें अभिनंदिती ११

२२० परेत पुण्यवंतास पुण्यें तीं आपुलीं तशीं
भेटती प्रिय-पात्रास येतां तो बंधु ते जसे १२

इति प्रिय-वर्ग षोडश

## १७ : क्रोध-वर्ग

२२१ सोडूनि दे क्रोध नि मान सारा
लंघूनि संयोजन-मात्र जाई
जो नाम-रूपीं न रमे विरक्त
त्याच्यावरी आपटती न दुःखें १

२२२ धरी उसळला क्रोध खळला रथ कीं जसा
म्हणें मी सारथी त्यास एर ते दोर-धारक २

२२३ अक्रोधें क्रोध जिंकावा साधुत्वें चि असाधुता
औदार्यें क्षुद्र जिंकावा सत्यें अनृत-भाषणी ३

२२४ बोलें खरें, न रागावीं, देईं थोडें हि याचितां
स्थानांहीं हया तिहीं पावे देव-सांनिध्य मानव ४

२२५ जे अहिंसक सर्वत्र काय-संवृत नित्य जे
पावती ते ध्रुव स्थान जेथें शोक नसे मुळीं ५

२२६ शिकती जे अहोरात्र जागती जे निरंतर
निर्वाण-पर जे त्यांचे पावती अस्त आस्रव ६

२२७ अनादि हें असें बापा हें कांहीं आजचें नसे
स्तब्धास निंदिती लोक मुखरास हि निंदिती
निंदिती मित-भाषास नसे लोकीं अनिंदित ७

२२८ न तो झाला न होईल विद्यमान हि तो नसे
सर्वथा निंदिला किंवा सर्वथा जो प्रशंसिला ८

२२९ वारंवार ें विज्ञ ज्यास प्रशंसिती
अछिद्र-वृत्ति मधावी प्रज्ञा-शील-समाहित ९

२३० निष्क जांबूनदाचें जो निंदी कोण बरें तया
त्यास प्रशंसिती नित्य ब्रह्म-प्रमुख देव हि १०

२३१ काय-प्रकोप तूं राखीं सांवरीं काय आपुला
काय-दुश्चरितें सोडीं काय-सच्चरितें धरीं ११

२३२ वाचा-प्रकोप तूं राखीं वाचा तूं सांवरीं सदा
वाचा-दुश्चरितें सोडीं वाचा-सुचरितें धरीं १२

२३३ मनःप्रकोप तूं राखीं सांवरीं मन आपुलें
मनो-दुश्चरितें सोडीं मनःसुचरितें धरीं १३

२३४ काय-संवृत जे नित्य वाचा-संवृत जे तसे
मन संवृत जे धीर ते खरे परिसंवृत १४

इति क्रोध वर्ग सप्तदश

# १८ : मल-वर्ग

२३५ पिकलें दल तूं उभे इथें हे
तुजपाशीं यम-दूत पाश-हस्त
उठलास चि तूं हि जावयास
तुजपाशीं न अरे मुळीं शिदोरी १

२३६ चल द्वीप करीं स्वतांस तेव्हां
झटुनी पंडित हो नको विलंबूं
मल झाड नि पाप-मुक्त होई
मग जाशी पर दिव्य आर्यभूतें २

२३७ सरलें वय चाललासि आतां
मनुजा सत्वर अंतकाकडे तूं
वसति-स्थान तुझें मधें न कोठें
तुजपाशी न अरे मुळीं शिदोरी ३

२३८ चल द्वीप करीं स्वतांस तेव्हां
झटुनी पंडित हो नको विलंबूं
मल झाड नि पाप-मुक्त होई
मग तूं जन्म-जरा न पावशील ४

२३९ आपुला मळ प्राज्ञानें थोडा थोडा क्षणोक्षणीं
जसा सोनार चांदीचा निर्धमावा तसा क्रमें ५

२४० मल आयस तो जसा अयातें
असुनी तद्भव खाय त्या चि नित्य
अविनीत जनांस रे तसें चि
निज कर्में चि सुदुर्गतीस नेती ६

२४१ अपाठ मल मंत्रांचा घरांचा तो अनुद्यम
मल आळस देहाचा रक्षकाचा प्रमाद तो ७

२४२ स्त्री-जनांचा दुराचार दात्याचा क्षुद्रता मळ
मळ तीं सगळीं पापें दोन्ही लोकांत सारखीं ८

२४३ मळ सर्व मळांहूनि अविद्या हा महामळ
झाडूनि मळ हा सारा भिक्षूंनो मल-मुक्त व्हा ९

२४४ आचार-हीन निर्लज्ज काक-शूर विघातक
धृष्ट नि क्लिष्ट-कर्मा जो सुखाचें त्यास जीवित १०

२४५ विनीत दक्ष मेधावी शौचाचार-परायण
शुद्धाजीव समर्याद कष्टाचें त्यास जीवित ११

२४६ जीव-हिंसा करी लोकीं मिथ्या-भाषण जो करी
जो कोणीं न दिलें घेई भोगी जो पर-योषिता १२

२४७ सुरा-मैरेय-पानाच्या मागें जो लागला सदा
ह्या चि लोकांत तो मूढ खणतो मूळ आपुलें १३

२४८ असे हे मनुजा जाण पापाचार असंयत
पचवोत न दुःखांत लोभाधर्म तुला चिर १४

२४९ देती जन जशी श्रद्धा जशी चित्त-प्रसन्नता
तेथ जो करितो खेद लोकांच्या पान-भोजनी
न त्यास दिवसां रात्रीं समाधान मिळे कधीं १५

२५० छेदिला खेद हा ज्यानें मूलतां चि उपाडिला
तयास दिवसां रात्रीं समाधान मिळे सदा १६

२५१ रागासम नसे अग्नि द्वेषासम नसे ग्रह
मोहासम नसे जाळें तृष्णेसम नदी नसे १७

२५२ लोकांचे दिसतो दोष पाहणें स्वीय दुष्कर
मनुष्य दोष लोकांचे उपणे भूस कीं जसें
लपवी आपुले जैसा हारोचा डाव धूर्त तो १८

२५३ लोकांचे पाहतो दोष सदा सूचन-शील जो
आस्रव-क्षय तो दूर त्याचे आस्रव वाढती १९

२५४ नसे श्रमण बाहेर आकाशांत नसे पद
प्रपचीं रमले लोक निष्प्रपच तथागत २०

२५५ नसे श्रमण बाहेर आकाशांत नसे पद
अनित्य सर्व संस्कार बुद्ध ते नित्य निश्चळ २१

इति मल-वर्ग अष्टादश

## १९ : धर्मस्थ-वर्ग

२५६ महमा निवडी अर्थ न तो धर्मस्थ होतसे
अर्थानर्थ विवेकानें निवडी पंडित जो गुणी १

२५७ नेई लोकांस धर्मानें सम-भावें असाहसें
धर्म-रक्षित मेधावी तो चि धर्मस्थ बोलिला २

२५८ न तो जो बोलतो फार होई पंडित त्यामुळें
क्षमी निर्वैर निर्भीक तो चि पंडित बोलिला ३

२५९ बोलतो बहु तेणें तो न धर्म-धर होतसे
अल्प हि श्रुत जो धर्म देहें प्रत्यक्ष आचरी
प्रमाद न करी धर्मी तो धर्म-धर बोलिला ४

२६० पिकलें शिर त्यायोगें न तो स्थविर होतसे
वय तें पिकलें त्याचें तो वृथा-जीर्ण बोलिला ५

२६१ जो सत्य-निष्ठ धर्मिष्ठ अहिंसा-पर संयमी
जो दान्त वान्त-मल तो धीर स्थविर बोलिला ६

२६२ न वाङ्माधुर्य-मात्रें तो न वा रूप गुणामुळें
साधु-रूप कधीं होई शठ ईर्षालु मत्सरी ७

२६३ ज्याचें हें छेदिलें सर्व मूलतां चि उपाडिलें
निर्धूत-दोष मेधावी बोलिला साधु-रूप तो ८

२६४ व्रत-हीन मृषा-वादी नव्हे श्रमण मुंडणें
कसा श्रमण तो होय इच्छा-लोभ-वशानुग ९

२६५ लहान थोरलीं सारीं पापें जो शमवी इथें
पापें शमविता झाला तेव्हां श्रमण बोलिला १०

२६६ भिक्षतो लोक जो कोणी न होई भिक्षु तो तसा
न वा तो भिक्षु जो कोणी स्वीकारी धर्म संकट ११

२६७ जो पाप-पुण्य झाडूनि ब्रह्म-चर्या करी सदा
विज्ञानें विचरे लोकीं तो खरा भिक्षु बोलिला १२

२६८ न होय मुनि मौनानें मूढ-रूप अशिक्षित
जो तुला-हस्तसा धीर घेई तोलूनि उत्तम १३

२६९ देई टाकूनिया पापें त्यायोगें होय तो मुनि
लोकीं तो तोलतो दोन्ही म्हणूनि मुनि बोलिला १४

२७० प्राण्यांच्या हिंसनानें तो कोणी आर्य न होतसे
अहिंसेनें चि प्राण्यांच्या सर्वथा आर्य बोलिला १५.

२७१ नव्हे केवळ शीलानें व्रतानें श्रवणें बहु
न वा समाधि-लाभानें विविक्त-शयनें न वा १६

२७२ भोगीं नैष्कम्य-सुख मी अपृथग्जन-सेवित
ठेवा विश्वास भिक्षूंनो आस्रवांच्या क्षयाविना १७

इति धर्मस्थ-वर्ग एकोनविंश

## २० : मार्ग-वर्ग

२७३ मार्गांत श्रेष्ठ अष्टांग पदें सत्यांत चार तीं
विराग श्रेष्ठ धर्मांत द्विपदांत हि डोळस १

२७४ दृष्टि-शोधन हा मार्ग नसे ह्यावेगळा दुजा
ह्याची तुम्ही धरा कास माराचें हें प्रमोहन २

२७५ पावाल पार दुःखाचा ह्याची कास धरूनिया
मीं हा सांगितला मार्ग शल्य-कृंतन जाणुनी ३

२७६ करायाचा तुम्हीं यत्न सांगणार तथागत
मार्गस्थ सुटती ध्यानी माराच्या बंधनांतुनी ४

२७७ अनित्य सर्व संस्कार हें जो प्रज्ञा-बळें बघे
दुःख-निर्वेद तो पावे शुद्धीचा मार्ग हा असे ५

२७८ संस्कारमात्र दुःखास हें जो प्रज्ञा-बळें बघे
दुःख-निर्वेद तो पावे शुद्धीचा मार्ग हा असे ६

२७९ अनात्म धर्म हे सारे हें जो प्रज्ञा-बळें बघे
दुःख-निर्वेद तो पावे शुद्धीचा मार्ग हा असे ७

२८० उत्थान-कालीं न उठे युवा जो
सशक्त होऊनि हि आळसानें
सचिंत जो निष्क्रिय आळशी जो
प्रज्ञेचिया तो न पथास लागे ८

२८१ वाचेस रक्षीं नियमीं मनास
दुरन्त कांहीं न करीं तनूनें
राखीं तिन्ही कर्म-पथांस शुद्ध
पुढें ऋषींचा मग मार्ग घेई ९

२८२ योग-मूल असे बुद्धि नासे बुद्धि अयोगतः
संपत्तीचा विपत्तीचा हा द्विधा पथ जाणुनी
ज्यायोगें वुद्धि ती वाढे योजावें आपणा तसें १०

२८३ छेदीं वन, न रे वृक्ष, वन होय भयंकर
वनिका वन छेदूनि भिक्षूंनो वन-मुक्त व्हा ११

२८४ अणुमात्र हि कामना स्त्रियांची
नर हा जोंवरि तोडुनी न टाकी
मन तोंवरि बांधिलें तयाचें
मन मातेंत जसें स्तनंधयाचें १२

२८५ निज स्नेह-ममत्व-बंध छेदीं
कुमुदें शारद तीं जशीं करानें
शम-मार्ग चि वाढवीं जगीं तूं
परिनिर्वाण असे तथागतोक्त १३

२८६ इथें राहीन हेमंतीं ग्रीष्म-वर्षामधें इथें
असें हें चिंतितो मूढ अंतराय न तो बुझे १४

२८७ माजला पशु-पुत्रांनीं झाला आसक्त त्यास तो
पूरसा सुप्त गांवास मृत्यु घेऊनि जातसे १५

२८८ न पिता वा न ते पुत्र न ते बांधव रक्षिती
ग्रासिला अंतकानें जो त्राता त्या स्वजनीं नसे १६

२८९ जाणूनि अर्थ हा सारा शील संवृत पंडितें
निर्वाणगामी मार्गाचा करावा शोध सत्वर १७

इति मार्ग-वर्ग विंश

## २१ : प्रकीर्ण-वर्ग

२९० थोडकें सुख सोडूनि दिसे पुष्कळ तें जरी
सोडावें थोडकें सुज्ञें पाहूनि सुख पुष्कळ १

२९१ परांस दुःख देऊनि इच्छी जो सुख आपुलें
वैरांतूनि सुटे ना तो वैर-जाळांत गुंतला २

२९२ करायचें न तें केलें केलें अकरणीय जें
प्रमादशील जे भ्रांत त्यांचे आस्रव वाढती ३

२९३ समुद्यत असे ज्यांची नित्य काय-गता स्मृति
अकार्य सेविती ना ते कार्य-निष्ठ निरंतर
स्मृति-जागर-शीलांचे पावती अस्त आस्रव ४

२९४ माता पिता तसे दोघे राजे मारूनि क्षत्रिय
सानीक राष्ट्र मारूनि जाय निष्पाप ब्राह्मण ५

२९५ माता पिता तसे दोघे राजे मारूनि श्रोत्रिय
व्याघ्र-पंचम मारूनि जाय निष्पाप ब्राह्मण ६

२९६ प्रबोध पावती स्वच्छ सदा गौतम-शिष्य ते
अहर्निश असे ज्यांची नित्य बुद्ध-गता स्मृति ७

२९७ प्रबोध पावती स्वच्छ सदा गौतम-शिष्य ते
अहर्निश जसे ज्यांची नित्य धर्म-गता स्मृति ८

२९८ प्रबोध पावती स्वच्छ सदा गौतम-शिष्य ते
अहर्निश असे ज्यांची नित्य संघ-गता स्मृति ९

२९९ प्रबोध पावती स्वच्छ सदा गौतम-शिष्य ते
अहर्निश असे ज्यांची नित्य काय-गता स्मृति १०

३०० प्रबोध पावती स्वच्छ सदा गौतम-शिष्य ते
अहिंसेंत अहोरात्र जयांचें रमलें मन ११

३०१ प्रबोध पावती स्वच्छ सदा गौतम-शिष्य ते
भावनेंत अहोरात्र जयांचें रमलें मन १२

३०२ दुष्प्रव्रज्या असे दुःख दुरावास घरें तशीं
तसा असम-संवास दुःखानुमृत यात्रिक
तरी होऊं नये यात्री न च दुःखानुमार्गित १३

३०३ श्रद्धालु शील-संपन्न यशो-भोग-समन्वित
जेथें जेथें वसे लोकीं पूजा पावे तिथें तिथें १४

३०४ दूरूनि दिसती संत हिमवंत गिरीपरी
असंत लोपती स्थानीं रात्रि-क्षिप्त शरांसम १५

३०५ एकटा चि निजें बैसें चालें सावध एकटा
एकटा नियमीं आत्मा वनांतीं एकटा रमें १६

इति प्रकीर्ण-वर्ग एकविंश

# २२ : निरय-वर्ग

३०६ अभूत-वादी नरकांत जातो
करूनिया जो वदतो न केलें
दोघे हि हे मानव नीच-कर्म
समान होती मरुनी परत्र १

३०७ भगवें नेसती नैक पाप-धर्म असंयत
पापी ते पाप कर्मांनीं नरकीं जन्म पावती २

३०८ असंयत दुराचार राष्ट्राचा पिंड जो गिळी
त्याहूनि रे बरा खाणें जळता लोह-गोळ तो ३

३०९ दारा परांच्या उपभोगितो जो
तो पावतो चार गति प्रमत्त
न पुण्य लाभे न निवांत निद्रा
पावूनि निंदा नरकांत जाई ४

३१० अपुण्य लाभे गति होय पापी
भयाकुलांची रति ती क्षणैक
राजा हि तो दंड कठोर देई
सेवूं नये ह्यास्तव अन्य-दारा ५

३११ वांकडा धरिला दर्भ जसा हात चि कापतो
श्रामण्य अविचाराचें नरकीं खेचितें तसें ६

३१२ आळसें कर्म जें केलें कष्टें आचरिलें तप
ब्रह्मचर्य हि साशंक न तें होय महाफल ७

३१३ करायचें जरी आहे करीं दृढ कसूनिया
परिव्राजक जो सैल उडवी धुरळा बहु ८

३१४ दुष्कृत्य तें न केलेलें बरें तापास होय तें
बरें सत्कृत्य केलेलें न तें तापास कारण ९

३१५ पर्यंत-नगरी जैसी आंत बाहेर रक्षित
तसें आत्म्यास रक्षावें **क्षण** हा गमवूं नये
रडती कीं क्षणें हीन लोटिले नरकामधें १०

३१६ लाजती न जिथें लाज लाज तेथें न लाजती
धरूनि दृष्टि ही मिथ्या पावती जीव दुर्गति ११

३१७ अभयीं देखती भीति अभीति बघती भयी
धरूनि दृष्टि ही मिथ्या पावती जीव दुर्गति १२

३१८ अवर्ज्य मानिती वर्ज्यी अवर्ज्यीं वर्ज्य मानिती
धरूनि दृष्टि ही मिथ्या पावती जीव दुर्गति १३

३१९ अवर्ज्य तें अवर्ज्यीत वर्ज्य वर्ज्यीत जाणतो
धरूनि दृष्टि ही सम्यक् पावती जीव स्वर्गति १४

इति लोक-वर्ग द्वाविंश

# २३ : नाग-वर्ग

३२० चाप-मुक्त जसा वाण संग्रामीं नाग सोशितो
तसा अवाच्य साहीन जन दुःशील प्रायशः १

३२१ समितीस दान्त तो नेती राजा दान्तावरी चढे
दान्त श्रेष्ठ मनुष्यांत जो साहे अपशब्द कीं २

३२२ दान्त अश्वतर श्रेष्ठ आजानेय हि सैंधव
तसे कुंजर नागेंद्र आत्म-दान्त विशेष तो ३

३२३ न जाववे इहीं यानीं अनाक्रांत दिगंत तो
सुदान्त दान्त आत्म्यानें दान्त तो जाय कीं जसा ४

३२४ धन-पालक नाम वारण
मद-लेखोत्कट दुर्निवारण
प्रतिबद्ध न खाय घास तो
स्मरतो नाग-वनास सर्वदा ५

३२५ जो होय खादाड नि आळशी जो
निद्राळु जो लोळत झोप काढी
वराहसा लठ्ठ निवाप-पुष्ट
गर्भीं पडे मंद पुनःपुन्हां तो ६

३२६ हें चित्तें पूर्वी चरलें यथेच्छ
इथें तिथें हें रमलें यथेष्ट
नेमीन तें आज निदान-योगें
जसा करी उन्मद अंकुशानें ७

३२७ अप्रमादीं रमा नित्य राखा रे चित्त आपुलें
गजसा कर्दमांतूनि करा उद्धार आपुला ८

३२८ लाभे जरी धीर प्रवीण साथी
सद्वृत्ति सद्वर्तन सद्विचार
न योजितां सर्व परिश्रमांना
जावें सुखें त्यासह जागत्यानें ९

३२९ साथी न लाभे हि जरी प्रवीण
जो होय सच्छील उदार धीर
त्यजूनि सारें हृत-राष्ट्र भूपसा
फिरें वनीं तूं गज-तुल्य एकटा १०

३३० बरवी एकली चर्या मूर्ख तो न सहायक
मातंगसें अरण्यांत असहाय अनुत्सुक
एकलें विचरावें गा पाप-कर्म करू नये ११

३३१ विपत्ति-कालीं सुख ते सहाय
ती तुष्टि रे सौख्य परस्परें जो
प्रयाण-काळीं सुख होय पुण्य
सर्वत्र तो दुःख-विमोक्ष सौख्य १२

३३२ सुख मातृत्व या लोकीं पितृत्व सुख तें तसें
सुख श्रामण्य तें लोकीं ब्राह्मणत्व तसें सुख १३

३३३ सुख यावज्जरा शील सुख श्रद्धा प्रतिष्ठित
सुख तो लाभ प्रज्ञेचा पापें न करणें सुख १४

इति नाग-वर्ग त्रयोविंश

# २४ : तृष्णावर्ग

३३४ नर सावध जो न होय त्याची
तृष्णा वाढत जाय मालुकेशी
फल-काम वनीं प्लवंगसा तो
प्लुतिमागें प्लुति घेत जाय मूढ १

३३५ ज्यास ही मायिनी तृष्णा, लोकीं आसक्ति, जिंकिते
तयाचे वाढती शोक वाळा वृष्ट जसा वनीं २

३३६ लोकीं दुर्दम्य तृष्णा ही जिंकितो जो बळें कुडी
तयाचे गळती शोक बिंदु पद्माहुनी जसे ३

३३७ हिताचें सांगतों ऐका जमले येथ जे तुम्ही
तृष्णेचें या खणा मूळ वाळ्याचें खणती जसें
बोरूस पूरसा नित्य न मोडो मार हा तुम्हां ४

३३८ जसा असे अक्षत-मूल जोंवरी
वाढे पुन्हां तो तरु तोडिला हि
तसा चि तृष्णाशय तो न नाशितां
पुन्हां पुन्हां दुःख वळूनि ये हें ५

३३९ छत्तीस स्रवतो ज्याचे वेगानें विषयांकडे
त्या दुर्दृष्टीस संकल्प नेतो वाहूनि राग-ज ६

३४० सर्वधा स्रवती स्रोत फुटे मर्वत्र ती लता
पाहूनि फुटली छेदा प्रज्ञेनें मूळ तें तिचें ७

३४१ सरिता सुखदायिनी अतीव
गमती स्नेहमयी जनास भारी
सुख-कामुक जे प्रवाह-मग्न
नर ते जाति-जरादि पावती कीं ८

३४२ गुण-बद्ध सशापरी प्रजा ही
तृष्णा-पूर्वक घेत फेरफेरे
चिर-काल पुन्हां पुन्हां अरेरे
दृढ-संयोजन-सक्त दुःख पावे ९

३४३ गुण-बद्ध सशापरी प्रजा ही
तृष्णा-पूर्वक घेत फेरफेरे
म्हणुनी श्रमणें विराग-कामें
हत-तृष्णा चि समूळ ती खुडावी १०

३४४ वन-मुक्त वनास जो निघाला
वन सोडूनि वनाकडे चि धावे
नर तो निसटूनिया पहा रे
परते दुर्मति बंधनाकडे चि ११

३४५ न तें खरें बंधन बोलती ते
जें कीं अयो-दारु-तृणादिकांचें
पत्नी-सुतांची मणि-कुण्डलांची
आसक्ति जी बंधन तें चि मोठें १२

३४६ हें जें खरें बंधन होय लोकीं
ढिलें हि जें रम्य असोनि दुस्त्यज
छेदूनिया तें हि निरिच्छ धीर
सांडूनि जातो गृह-भोग सारे १३

३४७ रागांध सारे पडती प्रवाहीं
जाळ्यांत कोळी अपुल्या चि जैसा
छेदूनिया तें हि निरिच्छ धीर
सांडूनि जाती भव-दुःख सारें १४

३४८ त्यज रे पुढचें नि मागचें जें
त्यज चालू, भव-पार होय भिक्षो
निज चित्त करीं विमुक्त आधी
मग तूं जाति-जरा न पावशो कीं १५

३४९ शुभ-दृष्टि नि तीव्र-राग-युक्त
नर जो होय वितर्क-भिन्न त्याची
पसरे दृढ-मूल नित्य तृष्णा
करितो तो दृढ बंध आपुले चि १६

३५० शुभ-दृष्टि न, जो सदैव दक्ष
नर जो होय वितर्क-शांति-भोगी
नर तो चि करील अंत त्याचा
नर छेदील हि तो चि मार-बंध १७

३५१ निष्पाप पावला निष्ठा तृष्णा टाकूनि निर्भय
काढिलीं भव-शल्यें तीं त्यास हा देह अंतिम १८

३५२ वीत-तृष्ण अनासक्त निरुक्ति-पद-कोविद
अक्षरांचा संनिपात पौर्वापर्य हि जो बुझे
बोलिला तो महा-प्रज्ञ त्यास हा देह अंतिम १९

३५३ मी विश्व-वेत्ता विजयी असें मी
मी सर्व धर्मात असें अलिप्त
तृष्णा-क्षयीं मुक्त निरस्त-विश्व
जाणें स्वयें, देशिक कोण माझा २०

३५४ मारीं दानें जिकितें धर्म-दान
मान्या गोडी जिकिते धर्म-गोडी
धर्माचा जो छद तो सर्व छंद
जिके तृष्णा-नाश दुःखें अशेष २१

३५५ मारिती भोग दुर्धीम न शोधी पर-पार जो
मारी तो भोग-तृष्णेनें आपणा परका जसा २२

३५६ तण तो दोष शेतांचा प्रजेचा दोष राग ह्या
म्हणूनि राग-मुक्तांस दिलें होय महा-फल २३

३५७ तण तो दोष शेतांचा प्रजेचा दोष द्वेष ह्या
म्हणूनि द्वेष-मुक्तांस दिलें होय महा-फल २४

३५८ तण तो दोष शेतांचा प्रजेचा दोष मोह ह्या
म्हणूनि मोह-मुक्तांस दिलें होय महा-फल २५

३५९ तण तो दोष शेतांचा प्रजेचा दोष काम ह्या
म्हणूनि काम-मुक्तांस दिलें होय महा-फल २६

इति तृष्णा-वर्ग चतुर्विंश

## २५ : भिक्षु-वर्ग

३६० साधु संवर नेत्राचा श्रोत्राचा साधु संवर
साधु संवर घ्राणाचा जिह्वेचा साधु संवर १

३६१ साधु संवर देहाचा वाचेचा साधु संवर
साधु संवर चित्ताचा साधु सर्वत्र संवर
भिक्षु संवृत सर्वत्र सर्व दुःखांतुनी सुटे २

३६२ कर-संयत पाद-संयत
वचनीं संयत संयतोत्तम
विजन-प्रिय भिक्षु बोलिला
दृढ आध्यात्मिक जो समाहित ३

३६३ मुख-संयत जो भिक्षु मंत्र-भाषी अनुद्धत
जो अर्थ दाखवी धर्म त्याचें मधुर भाषित ४

३६४ खेळे धर्मीं रमे धर्मी करी धर्म-विचारणा
भिक्षु धर्मानुसारी तो चळेना सत्य-धर्मत: ५

३६५ स्वलाभ नावमानावा स्पर्धावा न परार्थ तो
भिक्षु स्पर्धालु अन्यार्थी समाधान न पावतो ६

३६६ न जो अवगणी भिक्षु लाभ थोडा हि आपुला
शुद्धाजीवी अतंद्रालु त्यास देव प्रशंसिती ७

३६७ नाम-रूपांत ह्या ज्यास सर्वथा ममता नसे
गेल्याचा न करी शोक तो खरा भिक्षु बोलिला ८

३६८ मैत्रींत रमला भिक्षु शमला बुद्ध-शासनीं
पावतो पद शांतीचें सुख संस्कार-शामक ९

३६९ भिक्षो प्रक्षाल ही नाव धुतां चालेल ती लघु
राग-द्वेषांस छेदूनि मग निर्वाण पावसी १०

३७० छेदीं पांच त्यजीं पांच पांचांची भावना करीं
निष्पंचसंग जो भिक्षु तो तीर्ण-स्रोत बोलिला ११

३७१ करि ध्यान, करूं नको प्रमाद
न रमो **काम-गुणीं** त्वदीय चित्त
न गिळीं विसरूनि लोह-गोळ
जळतांना मग 'दु:ख हें' न क्रन्दें १२

३७२ अप्रज्ञास नसे ध्यान प्रज्ञा ध्यानाविना नसे
प्रज्ञा-ध्यान असे ज्यांत निर्वाणांतिक तो मुनि १३

३७३ विचारी कोठकोठूनि स्कंधांचा उदय-व्यय
प्रीति-प्रमोद तो पावे विज्ञां अमृत होय जो १४

३७४ जाणता येथ जो भिक्षु त्याचा आरंभ हा असा
इंद्रियें राखणें, तुष्टि, प्रातिमोक्षांत संवर १५

३७५ कल्याण मित्र तूं सेवीं शुद्धाजीव अतंद्रित
होई कुशल आचारीं होई दाक्षिण्य-शील तूं
प्रमोदें भरला तेव्हां दुःखान्त करशील तूं १६

३७६ जीर्ण शीर्ण दलें पुष्पें गाळिते यूथिका जशी
तसा हा राग हा द्वेष भिक्षूंनो विखरा सदा १७

३७७ काया वाचा मनें शांत सर्वथा जो समाहित
ओकिलीं आमिषें सारीं भिक्षु तो शांत बोलिला १८

३७८ प्रेरीं तूं आपणा आप पारखीं आप आपणा
आत्म-गुप्त स्मृती भिक्षो सुखें विहरशील तूँ १९

३७९ आत्मा चि आपुला नाथ आत्मा चि गति आपुली
म्हणूनि संयमीं आत्मा वणिक् भद्राश्व तो जसा २०

३८० प्रमोदें भरला भिक्षु शमला बुद्ध-शासनीं
पावतो पद शांतीचें सुख संस्कार-शामक २१

३८१ आपणा जो युवा भिक्षु योजितो बुद्ध-शासनीं
उजळी लोक तो सारा अभ्र-मुक्त विधूपरी २२

इति भिक्षु-वर्ग पंचविंश

# २६ : ब्राह्मण-वर्ग

३८२ ब्राह्मणा हांक रे काम छेदीं ओघ पराक्रमें
संस्कार-क्षय जाणूनि होशील अकृत-ज्ञ तूं १

३८३ जेव्हां उभय धर्मांत होई निष्णात ब्राह्मण
ज्ञात्याचे त्या तदा सारे अस्त संयोग पावती २

३८४ अपार अथवा पार पारापार नसे जया
निर्भीक जो अनासक्त त्यास ब्राह्मण मी म्हणें ३

३८५ ध्यानी निष्ठित निर्दोष कृतकृत्य अनास्रव
पोंचला परमार्थास त्यास ब्राह्मण मी म्हणें ४

३८६ दिवसां तळपे सूर्य रात्रीं चंद्र प्रकाशतो
संनद्ध तळपे योद्धा ध्यानी तळपतो द्विज ५
बुद्ध तो तळपे तेजें अहोरात्र जनीं वनीं

३८७ मल-निर्वहणें चि ब्राह्मणत्व
सम-चर्या श्रमणत्व-हेतु लोकीं
परिव्राजित-दोष तो परिव्राड्
न परिव्राजक होय भिक्षणानें ६

३८८ ब्राह्मणास न हाणावें ब्राह्मणें खवळूं नये
ब्रह्म-हंत्यास धिक्कार खवळे त्यास त्याहुनी ७

३८९ मनें प्रियांचा करितो निषेध
हें थोडकें श्रेय न ब्राह्मणातें
जसा जसा हिंसन दूर टाकी
तसा तसा दुःख-वियोग पावे ८

३९० काया-वाचा-मनोयोगें आचरी जो न दुष्कृत
जो संवृत तिन्ही स्थानीं त्यास ब्राह्मण मी म्हणें ९

३९१ जेथूनि धर्म-विज्ञान सम्यक्संबुद्ध-दर्शित
सत्कारें त्यास वंदावें हुताग्नीस जसा द्विज १०

३९२ न जटांहीं न गोत्रानें न जात्या होय ब्राह्मण
ज्यांत सत्य वसे धर्म शुचि तो तो चि ब्राह्मण ११

३९३ कशास रे जटा-चर्म दुर्बुद्धे लाभ कोणता
अंतरीं दाटला सारा क्षाळिसी तूं वरी वरी १२

३९४ धुळीचीं नेसला वस्त्रें शिरांनीं वेढिला कृश
वनीं एक करी ध्यान त्यास ब्राह्मण मी म्हणें १३

३९५ जन्मला ब्राह्मणापोटीं न म्हणें त्यास ब्राह्मण
भो-वादी मात्र तो होय जरी होय स-किंचन
अकिंचन अनादान त्यास ब्राह्मण मी म्हणें १४

३९६ संयोगमात्र छेदूनि त्रासापासूनि जो सुटे
लंघूनि संग जो मुक्त त्यास ब्राह्मण मी म्हणें १५

३९७ क्रमानें तोडुनी ज्यानें दोरी वादी नि सांखळी
मोडिला कूप जो बुद्ध त्यास ब्राह्मण मी म्हणें १६

३९८ निंदा मार तसा बंध साहतो निर्विकार जो
जो क्षमा-बल सेनानी त्यास ब्राह्मण मी म्हणें १७

३९९ सुशील श्रुत-संपन्न व्रती दान्त अकोपन
देह अन्तिम हा ज्यास त्यास ब्राह्मण मी म्हणें १८

४०० आरीवरी जशी राई पद्म-पत्रीं जसें जळ
तसा भोगीं न जो लिंपे त्यास ब्राह्मण मी म्हणें १९

४०१ पाहतो ह्या चि देहीं जो दु:खाचा क्षय आपुल्या
स्रस्त-भार विसंयुक्त त्यास ब्राह्मण मी म्हणें २०

४०२ गंभीर-प्रज्ञ मेधावी मार्गामार्ग-विचक्षण
पोंचला परमार्थास त्यास ब्राह्मण मी म्हणें २१

४०३ गृही अगृह दोहोंच्या संसर्गांतूनि वेगळा
अनाश्रित नि अल्पेच्छ त्यास ब्राह्मण मी म्हणें २२

४०४ जो चराचर भूतांस दण्ड ठेवूनि खालती
न मारी मारवी ना वा त्यास ब्राह्मण मी म्हणें २३

४०५ अविरुद्ध विरुद्धीं जो शांत दण्डधरांमधें
आसक्तांत अनासक्त त्यास ब्राह्मण मी म्हणें २४

४०६ ज्याचा राग तसा द्वेष गळाला मान दंभ हि
आरीहूनि जशी राई त्यास ब्राह्मण मी म्हणें २५

४०७ शब्द जो बोलतो सत्य विज्ञापक अकर्कश
अनुद्वेजक सर्वांस त्यास ब्राह्मण मी म्हणें २६

४०८ जो येथ दीर्घ वा ह्रस्व अणु-स्थूल शुभाशुभ
अदत्त वस्तु घेई ना त्यास ब्राह्मण मी म्हणें २७

४०९ आशा ज्यास न ह्या लोकीं न त्या लोकीं हि ज्यास त्या
निराशय विसंयुक्त त्यास ब्राह्मण मी म्हणें २८

४१० झाला नि:शंक जाणूनि नसती ज्यास आलय
अमृतावगाह-संपन्न त्यास ब्राह्मण मी म्हणें २९

४११ जो पाप-पुण्य लंघूनि झाला उभयथा सुटा
शुद्ध निर्मल नि:शोक त्यास ब्राह्मण मी म्हणें ३०

४१२ प्रसन्न स्वच्छ जो होय शुद्ध उज्ज्वल चंद्रसा
वितृष्ण क्षीणभव जो त्यास ब्राह्मण मी म्हणें ३१

४१३ विमार्ग दुर्ग संसार गेला लंघूनि मोह जो
तरला पावला पार ध्यानी निःशंक निश्चल
त्यागें निवृत्त जो झाला त्यास ब्राह्मण मी म्हणं ३२

४१४ सोडूनि कामना झाला प्रव्राजक अकेतन
निःशेष-कामभव जो त्यास ब्राह्मण मी म्हणें ३३

४१५ तृष्णा सोडूनि जो झाला प्रव्राजक अकेतन
निःशेष-तृष्णाभव जो त्यास ब्राह्मण मी म्हणें ३४

४१६ जो मर्त्य-योग सोडूनि गेला लंघूनि दिव्य हि
सर्व-योग-विनिर्मुक्त त्यास ब्राह्मग मी म्हणें ३५

४१७ जो रत्यरति सोडूनि निवाला निरुपाधि जो
जो सर्व-लोकजित् वीर त्यास ब्राह्मण मी म्हणें ३६

४१८ उत्पत्ति-च्युति सत्त्वांची जाणे निःसंग सर्व जो
असे सुगत जो बुद्ध त्यास ब्राह्मण मी म्हणें ३७

४१९ देव मानव गंधर्व ज्याची गति न जाणती
जो क्षीणास्रव अर्हन्त त्यास ब्राह्मण मी म्हगें ३८

४२० ज्यास मागें पुढें मध्यें नसे कांहीं कुठें मुळीं
अकिंचन अनादान त्यास ब्राह्मण मी म्हणें ३९

४२१ वृषा प्रवर जो वीर महर्षि विजितारि जो
निष्कंप स्नात जो बुद्ध त्यास ब्राह्मण मी म्हणें ४०

४२२ पूर्व आवास जो जाणे पाहे स्वर्गति दुर्गति
जन्मान्त गांठिला ज्यानें अभिज्ञा-पर जो मुनि
कृत-कृत्य असे झाला त्यास ब्राह्मण मी म्हणें ४१

इति ब्राह्मण-वर्ग षड्त्रिंश

[ धर्म-पद समाप्त ]

१२५१९ 91131६
मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रा. क्र. ९००
शाखा

# बाल-बोधिनी

**विनायकास वंदूनि बुद्ध सर्वार्थसिद्ध जो**
**करीं धर्म-पदाची ही टीका मी बाल-बोधिनी ॥**

**धर्मपद** ह्या प्रस्तुत ग्रंथाच्या नांवाच्या अर्थसंबंधीं एकवाक्यता नाहीं. धर्म म्हणजे सत्य, नीति, न्याय, सदाचार, विधि, कर्तव्य, पुण्यकर्म, गुण, स्वभाव, व्यापार, संस्कार, वेदना-संज्ञा-संस्कार आणि कार्यकारणभाव; त्याचप्रमाणें पद म्हणजे मार्ग, स्थान, श्लोक, चरण, काव्य, शब्द, वाक्य आणि ग्रंथ; असे नाना अर्थ घेऊन धर्म-पदाची व्याख्या केली जाते आणि ती यथास्थित च होय. कारण हा सर्वांचा, सर्व शास्त्रांना विहित, सर्वविध कल्याणाचा मार्ग आहे. एका शब्दांत सांगायचें तर हा सन्मार्ग आहे. सन्मार्ग म्हणजे सत्याचा, सदुक्त, सनातन, सदाचरित मार्ग. ह्या व्याख्येंत सर्व अर्थ सुव्यवस्थित साधले आहेत. स्थल-कालांच्या अभिन्नतेमुळें सनातन म्हणजे सार्वकालीन त्याचप्रमाणें सार्वत्रिक. पद शब्दाचा शब्द, वाक्य, ग्रंथ, काव्य हा अर्थ सदुक्त शब्दानें व्यक्त होतो. तेव्हां धर्म-पद सन्मार्ग होय, धर्म पद सत्काव्य होय.

धर्म-पद हें श्लिष्ट नांव, काव्यमय नांव, संपूर्ण ग्रंथाची श्लेषमयता अर्थात् काव्यमयता येथें सूचित करीत आहे. धर्मपदांत पदोपदीं धर्माचें सोनें चमकत आहे आणि काव्याचा सुगंध सुटत आहे. असें धर्मपद हें अप्रतिम काव्य आहे.

**यमक-वर्ग**. यमक म्हणजे युग्मक, जोडी. जुळ्या श्लोकांचा वर्ग असल्यामुळें हें नांव. इतर वर्गांत हि असे जुळे श्लोक पडले आहेत.

जसें; ६४–६५, ६७–६८, ११९–१२०, १२१–१२२ इत्यादि.

१–२ येथें धर्म शब्दाचा अर्थ हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती इत्यादि संप्रदाय वा संस्कृति असा नाहीं. परिभाषा पहा.

कोणती हि वस्तु यदृच्छया होत नाहीं. वस्तुमात्र मग तें भौतिक असो वा चैत्तिक, कार्यकारण-भावानें बद्ध आहे, हा या श्लोकाचा अभिप्राय आहे. बुद्धधर्माचें हें मूलभूत तत्त्व आहे. तें येथें पहिल्याच श्लोकांत आलें हें यथास्थान च होय.

दुष्ट—विकार-युक्त, कलुषित, मलिन.

दुःख सुसह्य नव्हे, दुःखानें मनुष्य भारावतो म्हणून दुःखाला चाकाची उपमा. चाकांवर च गाडीचा सर्व भार असतो. उलट सुखाला छायेची उपमा दिली आहे. कारण छायेला वजन नाहीं, ती दुर्वह नाहीं. प्रस्तुत उपमांचें हें रहस्य आहे.

५ अवैर—ह्याचा अर्थ चवथ्या श्लोकांत वर्णिल्याप्रमाणें वैर मनांत न आणणें इतकाच. प्रेम करणें, सेवा करणें हा अर्थ अभिप्रेत नाहीं. प्रतिपक्ष-भावनेपेक्षां अभावना उत्तम.

सनातन धर्म म्हणजे सत्य, निश्छल उपदेश, अटळ कायदा.

६ 'आवरूं आपणा इथें' हा नवीन अर्थ आहे. सांप्रदायिक त्या ऐवजीं 'ह्या लोकांतून आपण निवर्तू' असा अर्थ घेतात. पण तो योग्य नाहीं. कारण, आपण मृत्युधर्मी आहों ह्या ज्ञानानें शांति होते हें सांगणें प्रस्तुत नसून अवैर-संकल्पामुळें वैर शमतें हें सांगावयाचें आहे.

७–८ ह्या श्लोकांत सैतानाच्या तडाख्यांत कोण सांपडतो आणि कोण सांपडत नाहीं हें सांगितलें आहे. ज्याला मरायचें नसेल, माराच्या तडाख्यांत सांपडायचें नसेल, त्यानें (१) संसार-दोषानुदर्शन, (२) इंद्रिय-दमन, (३) मिताहार आणि (४) निरलस उद्योग ह्यांचें सेवन केलें पाहिजे.

स्थैर्यासाठीं पर्वताचा दृष्टान्त प्रसिद्ध च आहे. जसें; 'स्थावराणां हिमालयः।' 'स्थैर्येण हिमवानिव।' विभूतिमत्त्वासाठीं, असाधारणतेसाठीं प्रस्तुत उदाहरणांत हिमाचल घेतला आहे. तत्रापि त्याचें अचलत्व प्रधान होय.

९ कषाय म्हणजे रज, रजोगुण. आणि काषाय हें तर विरक्तीचें

वस्त्र. म्हणून ज्याचा राग गेला नाहीं त्यानें विरागवस्त्रें धारण करणें दंभ होईल.

ज्याच्याठायीं राग (कषाय) आहे त्यानें रक्त (काषाय) वस्त्र वापरणें अनुरूप च म्हणावें लागेल. पण रक्तवस्त्र विरक्ताचें चिन्ह असल्यामुळें येथें कषाय आणि काषाय ह्या शब्दांनीं विरोधाभासाची चमत्कृति साधली आहे.

सत्य आणि दम हे साधकाचे अपरिहार्य गुण होत. सत्य म्हणजे खरेपणा, निर्दंभता. दम म्हणजे तप, सत्यानुसरणासाठीं लागणारा निग्रह अथवा मनोबल.

११ निंबापासून आंबे मिळतील अशी कल्पना करणें अथवा आंब्याला निंबोळ्या लागतील अशी अपेक्षा करणें ह्याचें नांव मिथ्या संकल्प. जे मिथ्यासंकल्पी त्यांच्या आशा, कर्में व वित्तें व्यर्थ च असणार.

१३ भावित म्हणजे कायगता स्मृति, मरण-स्मृति, मैत्री इत्यादि कर्मस्थानांच्या, ध्यानविषयांच्या, भावनांत सरावलेलें. असें भावित चित्त राग-द्वेष-मोह-निर्लेप होतें. श्लो. १०६ ची टिप्पणी पाहणें.

१५–१८ पुण्य कर्मानें मोद आणि आनंद होतो. पाप-कर्मानें शोक आणि ताप. हा अनुभव, ही वेदना, कर्म केल्यावर ह्या लोकीं आणि कर्माचें स्वर्ग-नरकरूप फळ मिळाल्यावर पुन्हां परलोकीं होते.

मोद आणि आनंद तसे च शोक आणि ताप हे मानसिक भाव होत. रडणें, हंसणें हे त्यांचे बाह्य परिणाम.

क्लिष्ट कर्म म्हणजे क्लेश देणारें अकुशल कर्म.

१९, २० धर्मवचनें गाईसारखीं होत, क्रियावान् पुरुष धनी भोक्ते, आणि क्रियाहीन पाठक ते निव्वळ गुराखी. धर्माचरण, निर्विकार चित्त, प्रज्ञावत्ता आणि ऐहिक तद्वत् पारलौकिक भोगांविषयीं निःस्पृहता हें श्रमणत्वाचें मोल आहे.

२१ अप्रमाद हा बौद्धांचें ब्रीद-वाक्य (watch word) आहे. अप्रमाद म्हणजे दक्षता, ध्यान, संयम, चित्त-रक्षा. प्रमाद म्हणजे इंद्रियासक्ति,

स्वैरता. पहा; 'करि ध्यान करूं नको प्रमाद। न रमो कामगुणी त्वदीय चित्त' ॥ ३७ ॥

पद म्हणजे मार्ग. प्रमाद मृत्यूचा मार्ग आहे, ध्यान मोक्षाचा.

२३ येथें ध्यानी हें पद अप्रमादी ह्या च अर्थानें आलें आहे. येथें निर्वाणाची सर्वोत्तम जीवन (अनुत्तर योगक्षेम) अशी व्याख्या केली आहे.

२४ उद्यमशील आणि अप्रमत्त पुरुषाचें यश वाढतें.

पतन झालें, प्रमाद झाला तरी नाउमेद न होतां फिरून नेटानें उठणारा त्याचें नांव उद्यमशील. मुळांत उत्थानवान् शब्द आहे. उत्थान शब्द पतनाचा विरुद्धार्थवाची आहे. उत्थानवान् म्हणजे सकाळीं लवकर उठून कामाला लागणारा. हाहि अर्थ अभिप्रेत च आहे.

२५ रागज संकल्प हे ओघ होत. ते मनुष्याला वाहून नेतात. उत्थान, दक्षता, इंद्रियांचा संयम आणि मनाचें दमन ह्यांच्या योगानें आपणांला चोहोंबाजूंनीं जें संयत राखणें तें च बेट होय जें ओघांनीं फुटून वाहून जात नाहीं.

२८, २९ ह्या श्लोकांत ध्यानी पुरुष प्रमादशील जनतेच्या किती वर चढतो, किती पुढें जातो, तें दृष्टांतांनीं दाखविलें आहे. दोघे हि एका ठिकाणाहून निघतात, पण 'भवति च पुनर् भूयान् भेदः फल प्रति.' प्रमादाचा अभाव आणि प्रभाव हें ह्याचें कारण आहे.

३० ध्यानाच्या, अप्रमादाच्या महत्त्वाविषयीं एक प्राचीन दाखला.

३१, ३२ अग्नि जसा ज्या कशाचा संयोग होईल तें तें जाळीत जातो, आणि शेवटीं विझतो त्याप्रमाणें साधक लहान मोठ्या सर्व संयोगांची, स्पर्शांची, विषयांची, बंधनांची जाळून राख करून आणि स्वतः देदीप्यमान होऊन शेवटीं शांत होतो, निर्वाण पावतो, मुक्त होतो. अग्नीच्या उपमानाचें हें रहस्य आहे.

सर्व संयोजनांचा परिपूर्ण क्षय झाला असतां अर्हद्दशा प्राप्त होते-हिचें च नांव निर्वाण. अप्रमाद त्याचा मार्ग आहे हें २१ व्या श्लोकांत

सांगितलें. येथें (३२) निर्वाण-प्राप्तिरूप त्याचें फल दाखवून तें च स्पष्ट केलें आहे.

'सुटला पतनांतूनि निर्वाणांतिक भिक्षु तो' ही गीतेची ब्राह्मी स्थिति होय, निर्वाण-परमा शान्ति होय. अशा पुरुषाला देहपाताबरोबर निर्वाण, गीतेच्या परिभाषेंत ब्रह्मनिर्वाण लाभणार. (पहा श्लो. १७५ ची टिप्पणी)

३३ शरानें लक्ष्याचा वेध करायचा असतो. निर्वाण हें चित्ताचें लक्ष्य म्हणून चित्त शररूप झालें. शर अगदीं सरळ नसेल तर तो विफल जाईल. तसें चित्त सरळ म्हणजे एकाग्र नसेल तर तें प्रमाद करील. शराच्या उपमेचें हें रहस्य आहे.

३४ मार-राज्य म्हणजे तृष्णा-विषय. तृष्णा जलविषयक असते म्हणून तृष्णाकुल विषयासक्त, जड जीवाला=चित्ताला, जल-जीवाची= माशाची उपमा.

३७ चित्त हें (वाऱ्यासारखें) एकाकी, दूर दूर फिरणारें, अमूर्त आणि अव्यक्त (गुहाशय) असें आहे.

३८ ज्याच्या ठायीं प्रसाद म्हणजे बुद्धि-निश्चय नाहीं, अर्थात् जो भ्रान्त व संशयित आहे, ज्याला सदाचार ठाऊक नाहीं, तसें च ज्याचें चित्त अनेकाग्र आहे, त्याची ज्ञान-शक्ति विकास पावत नाहीं.

३९ 'ज्याचें . . . अनाहत' ह्याचा हि अर्थ ज्याचा निश्चय खंबीर आणि चित्त एकवटलेलें आहे, असा च होतो. सदसतांचा, ग्राह्याग्राह्यांचा, निश्चय करणें हें बुद्धीचें काम आहे. म्हणून बुद्धि म्हणजे निश्चय. आसक्ति-विषयांच्या अनंतत्वामुळें चित्त सर्वदा पसरलेलें, अनेकश: भिन्न झालेलें' राहतें. म्हणून अनासक्तता म्हणजेच एकाग्रता.

पापपुण्य-मुक्त--पापांच्या अकरणामुळें पाप-मुक्त आणि पुण्याच्या अनासक्तिपूर्वक करण्यामुळें पुण्य-मुक्त.

४० शरीर हें मातीच्या घड्यासारखें नश्वर आहे. तें कांहीं मरणोत्तर आपल्याबरोबर यावयाचें नाहीं. पण चित्ताचें, जीवाचें, तसें नाहीं.

तो आपला कायमचा साथी आहे. म्हणून त्याला भावनांच्या अभ्यासानें नगराच्या कोटाप्रमाणें सुरक्षित, मार-शत्रूच्या हल्ल्याचा प्रतिकार करायला सुसज्ज करून प्रज्ञेच्या तरवारीनें त्याशीं झुंजावें आणि हातीं लागलेल्या वित्ताचें पहारेकरी (मूळ—अनिवेश) होऊन दक्षतेनें (असक्तभावें) रक्षण करावें.

४१ मुळांत 'कलिंगर' शब्द आहे. त्याचा अर्थ कलिंग देशांतील लांकडी बाहुलें असा आहे. पण हें पद इतर कित्येक पदांप्रमाणें पूर्वसूरींना मुळीं च उकललेलें नाहीं. त्याचें कारण धर्मपद हें काव्य आहे, त्यांतील पदरचना अतिशय समर्पक आहे, हें त्यांना पाठपरायणतेमुळें कळलें नाहीं, हें च होय. कलिंग देशाचीं (उत्कल-उत्कलिंग) आज हि लांकडी बाहुलीं प्रसिद्ध आहेत. पुरीच्या जगन्नाथाच्या देवालयांतील रामकृष्णांच्या मूर्ति लांकडी च आहेत. संस्कृतांत बाहुलें ह्या अर्थी दारुक शब्द प्रसिद्ध आहे. आणि दारुक म्हणजे लांकडी. म्हणून येथें 'कलिंगर' चा अर्थ लांकडी बाहुलें असा च होतो. बाहुलें (मनुष्याकृति) जसें निर्जीव, तुच्छ आणि जमिनीवर उताणें पडलेलें असतें, तसें च मनुष्याचें शव. म्हणून शवाला दिलेली लांकडी बाहुल्याची उपमा किती समर्पक आहे पहा ! धम्मपदकार समर्थ कवि आहेत. (पहा श्लो. ३३५).

जीवाला च बौद्ध विज्ञान अथवा चित्त म्हणतात. म्हणून येथें विज्ञानहीन म्हणजे निर्जीव, सुखदु:खवेदनाहीन असा अर्थ होतो.

४२–४३ दुर्गति (मूळ-पापियो) करतें म्हणजे घायाळ करतें; 'करी कल्याण' म्हणजे त्राण, रक्षण करतें; असा आशय आहे. (श्लो. २९६ ची टिप्पणी पहा.)

४४ माळी जसा गवतकाडी बाजूला सारून मालकानें दाखवलेलें फूल तेवढें वेंचून घेतो त्याप्रमाणें स्वर्ग मृत्यु पाताळ हे तृणवत् त्याज्य लेखून धोण बरें पुण्यशील बुद्ध मुनीनें स्पष्ट दाखविलेलें धर्म-पद जें आर्यत्व तें वेंचून घेईल ?

मुळांतील 'धर्मपद', सुदेशित' आणि 'कुशल' हीं पदें. श्लिष्ट आहेत. र्म-पद——१ धर्ममार्ग, आर्यत्व; २ धर्मपद हा ग्रंथ. सुदेशित——१ नेमके

दाखविलेलें; २ सम्यक् उपदेशिलेलें. कुशल--१ माळी (कुशान् लुनाति इति); २ (तृणवत् छेद्य) पापांची निंदाई करणारा अर्थात् आर्य.

४६ शरीर हें फेंसाप्रमाणें म्हणजे बुडबुड्याप्रमाणें निःसार आणि भुंगर होय, मृगजळाप्रमाणें भासिक. केवळ हें सांगण्यासाठीं फेस आणि मृगजळ ह्या उपमा येथें दिल्या नाहींत. फेस पिऊन तहान भागत नाहीं. अथवा याहून यथार्थ बोलायचें म्हणजे मृगजळ दिसायला जल पण असायला तप्त वायु आणि म्हणून प्यायची वस्तु च नव्हे. हें जो जाणतो तो ह्यांच्यामागें लागत नाहीं, त्यांचा तहानेला रहात नाहीं. तसें शरीराविषयीं भोग्य-बुद्धि टाकून देणें, त्याविषयीं विरक्त होणें म्हणजे शरीराला फेसाप्रमाणें, मृगजळा-प्रमाणें जाणणें होय. प्रस्तुत उपमांचें हें रहस्य. मारपुष्पें म्हणजे मारक विषय-भोग. स्पर्श-रूप-गंधांमुळें पुष्पें लोभनीय वाटतात. त्यांचा रस मनुष्य पहात नाहीं. तसेच भोग. म्हणून त्यांना पुष्पें म्हटलें आहे. पण तीं विषवल्लीचीं विषारी फुलें आहेत, माराचीं मारक फुलें आहेत, हें अजाण मनुष्य ओळखत नाहीं आणि म्हणून तो मृत्यूमुखीं पडतो. पण जो भोगांन, मारक म्हणून, विषारी म्हणून ओळखतो तो च मृत्युपाशांतून बचावतो. विषयभोग हे फेसाप्रमाणें तृप्तिकर नव्हत, मृगजळाप्रमाणें तृष्णाविषय नव्हता इतकें च नव्हे तर ते विषारी फुलाप्रमाणें नितांत त्याज्य होत.

४७, ४८ रात्रींच्या वेळीं (नदीकांठच्या) एखाद्या निद्रारत गांवाला त्याची झोंप संपण्यापूर्वी च जसा पूर वाहून घेऊन जातो तसा कालसर्प ह्या संसारवाटिकेंत भोगपुष्पें वेंचण्यांत गढून गेलेल्या मनुष्याला त्याची वेंचणी चालू असतांना अतृप्तावस्थेंत च न कळत येऊन ग्रासतो. श्लोकाचा हा ध्वनितार्थ आहे.

४९ मुनीनें माधुकरी वृत्तीनें रहावें म्हणजे फुलपांखराप्रमाणें आपला निर्वाह करावा. माधुकरी वृत्तींत पुढील वस्तूंचा समावेश होतो; १ अनेक ठिकाणचें २ थोडें ३ सात्विक ४ अन्न ५ गृहस्थांचा संसारिक रंग आणि गंध लागू न देतां ६ घेऊन त्वरित दूर जाणें.

५८, ५९ जे श्रावक झाले नाहींत ते पृथग्जन केराप्रमाणें होत. आणि श्रावक हा तज्जन्य स्पृहणीय स्थलकमलाप्रमाणें होय.

६० मूर्खांचा संसार म्हणजे जन्म-मरण-परंपरा सुदीर्घ असते. कारण, संसार-विच्छेद-कारण जो सद्धर्म तो ते जाणत नाहीत.

७१ दही हा दुधाचा परिणाम होय, विकार होय. पण साजुक दूध जसें परिणाम तावडतोब पावत नाहीं, तसें पाप आपला परिणाम, आपलें आंबट फळ, लगें च देत नाहीं; कालांतरानें देतें.

राखेनें झांकलेला अग्नि जसा गुप्तपणें एखादी वस्तु जाळत जातो, तसें पाप गुप्तपणें माणसाला खात असतें, नष्ट करीत असतें. येथें पापाचा दुहेरी स्वभाव सांगितला आहे: एक, तें कालांतरानें फळतें आणि दुसरें, फळेपर्यंत गुप्तपणें कर्त्याचा घात करीत राहतें.

७२ वित्त म्हणजे ज्ञान आणि संपत्ति दोन्ही. अनर्थ म्हणजे अहित. जोंपर्यंत विद्येचा आणि संपत्तीचा व्यय हितार्थ होत नाहीं तोंपर्यंत त्या दोन्ही शक्ति बुद्धीचा नाश करीत राहून मनुष्याला निःसत्व करितात.

८० माळी पाण्याला, सुतार लांकडाला, बाणकार लोहार लोखंडाला नमवतो, वळवतो; तसा आत्मदमन पुरुष पाणी, लांकूड आणि लोखंड ह्या बाह्य पदार्थांप्रमाणें क्वचित् मृदु, मध्यम आणि कठिण असें जें आपलें विचित्र चित्त त्याचें दमन करतो. इतरेजन बाह्याला, तर आर्य अंतराला वळवतात, हा विशेष होय.

८१ स्वार्थ–स्वत.साठीं. परार्थ–दुसऱ्यासाठीं.

९१ हंसांना डबकें जसें किळसवाणें तसें गृहस्थाचें ग्राम्यजीवन विवेकी जनांना.

९२ निर्वाण हें 'विलक्षण म्हणजे चिह्नहीन अनिर्देश्य असून तें शून्यस्वरूप म्हणजे निर्विशेष होय. अलख निरंजन ह्या दोन शब्दांचा हि हा च आशय आहे.

९३ 'जे क्षीणास्रव निःशेष' अर्थात् जे अर्हद्दशेस पोंचले आहेत. दहा हि संयोजनांच्या पूर्ण क्षयानंतर च ती प्राप्त होते.

९५ पृथ्वीवर प्रहार केला असतां ती मुळीं देखील प्रतिकार करीत नाहीं, तसा जो निर्वैर आहे; नगराच्या वेशीबाहेरील इंद्र-कीलाची कोणी भक्ति-भावानें गंधोदकानें पूजा केली असतां किंवा कोणी कुतरीं मांजरीं, चिमण्या कावळे इत्यादींनीं मलमूत्रविसर्जनानें अवहेलना केली असतां जसा त्याला त्याचा हर्षामर्ष नाहीं, तसा जो समचित्त आहे, आपल्या समत्वाच्या व्रतांत भक्कम आहे; आणि जो डोहाच्या विशाल उदरांत जसा थोडासा हि गाळ आढळत नाहीं, तर तो जसा स्वच्छोदकानें तुडुंब भरलेला असतो, तसा ज्याच्या हृदयाच्या खोलींत अविद्येचा यत्किंचित् हि मळ आढळत नाहीं, तर जो केवळ पवित्र ज्ञानानें भरलेला आहे, तो च अर्हत् होय. त्याचें च जन्ममरणांचें चक्र बंद पडतें.

पृथ्वी कोठल्या हि जागीं केवळ क्षमारूप आहे, अप्रतिकाररूप आहे. म्हणून तिची सर्वत्र निर्वैर अर्हताला उपमा. इंद्रकील वेशीबाहेरचा, पूज्य, उंच आणि स्तंभ म्हणून त्याची विजनवासी, पूज्य, उदासीन आणि व्रतस्थ अर्हताला उपमा. निर्मल जल पावन असतें आणि डोह त्यानें भरलेला आणि शांत असतो, म्हणून त्याची पवित्र-ज्ञान-पूर्ण अ.णि निर्वाण पावलेल्या अर्हताला उपमा.

९७ ही विरोधाभासाची श्लिष्ट वक्रोक्ति आहे. अर्हताचें रूढार्थानें निंद्यवत् परंतु श्लिष्टार्थानें यथार्थ वर्णन केलें आहे. अश्रद्ध म्हणजे ज्याला श्रद्धेची गरज उरली नाहीं असा शिक्षेस अपात्र अर्थात् कृतविद्य पूर्ण शिक्षित. अकृत-ज्ञ म्हणजे जें कोणी केलेलें नाहीं, अकृत म्हणून जें विकृत हि नव्हे असें अमृत, निर्वाण, त्याला जाणणारा. संधिच्छेदक ह्याचा रूढार्थ मैत्री तोडणारा; परंतु अभिप्रेत अर्थ आहे (संधि म्हणजे) पुनर्जन्माचा योग छेदून टाकणारा, हतावकाश ह्याचा रूढार्थ होतो, अवकाश म्हणजे थारा, राहतें घर, ज्यानें मोडून टाकलें असा आततायी. अभिप्रेत अर्थ आहे, अवकाश म्हणजे स्वर्गादि लोक ज्याला बंद आहेत असा. वांताश ह्याचा रूढार्थ वांति खाणारा, कुत्रा. अभिप्रेत अर्थ आहे ज्यानें आशा ओकून टाकली आहे असा, निराश, नि:स्पृह.

९९ 'जे ते भोग न मागती' जे हें यत् पासून आलेलें अव्यय आहे. जे म्हणजे ज्याअर्थी ते भोग अपेक्षीत नाहींत त्याअर्थी, त्यामुळें ते रानांत रमतात.

१०५ 'तथाविध ....जिंकिलेलें' येथें जिंकिलेलें म्हणजे शांति, निर्वाण असा अर्थ आहे. कारण संयमी पुरुपाला महान् संग्राम करून अखेर तें च हस्तगत करावयाचें असतें.

१०६ भावितात्मा म्हणजे ज्यानें भावनेच्या, ध्यानाच्या, अभिपेकांनीं अंतःकरण शुद्ध केलें आहे, प्रसन्न केलें आहे, असा पूतात्मा.

११३ आय म्हणजे संसारांत येणें, अर्थात् बंध; आणि व्यय म्हणजे संसारांतून बाहेर पडणें, अर्थात् मोक्ष. बंध-मोक्षाच्या कारणज्ञानांत जीवितसाफल्य आहे, ह्रस्व-दीर्घ जीवितावधींत नाहीं हा अभिप्राय आहे.

११९.१२० पुण्य-भोग सरेपर्यंत पाप फळत नाहीं. पाप-भोग सरेपर्यंत पुण्य फळत नाहीं. म्हणून पाप करून हि मनुष्य आपलें ठीक चाललें आहे असें पाहतो. पुण्यभोग सरून पाप फळलें म्हणजे मात्र तो आपलें पाप भोगतो तसें च पुण्य करून हि मनुष्य आपलें भलें नाहीं असें पाहतो. परंतु पापभोग सरून पुण्य फळलें म्हणजे मात्र तो पुण्य भोगतो. तात्पर्य हें आहे कीं पापपुण्याचें बीज पेरल्याबरोबर त्याला फळ लागत नसतें. तें यथाकाळीं च लागतें. आणि जेव्हां तें पिकतें त्यानंतर च त्याचा कडू गोड स्वाद अनुभवास येतो.

१२३ आयुष्याचें महान् भांडवल मिळालें आहे त्यावर आपल्याला धर्माचरणाचा व्यापार करावयाचा आहे आणि शांतीचा नफा काढायचा आहे. परंतु या संसारकांतारांत फार थोड्या सज्जन उदमी धंदेवाईकांचा आपल्याला साथ आहे. म्हणून वाटमाऱ्या चोरांचा जिकडे सुळसुळाट आहे त्या पापकर्माच्या आडवाटेनें आपण जातां कामा नये.

१२४ कर्म हें क्षत होय, पाप हा विषस्पर्श. क्षताचा विषाशीं स्पर्श झाला तर मनुष्य मरेल. पण हात जर आपण अक्षत राखला,

कराला, कर्माला, पापाचा स्पर्श च होऊं दिला नाहीं, तर पाप-विपाचा स्पर्श आपणाला बाधणार नाहीं.

१२६ येथें चतुर्विध संपराय म्हणजे मरणोत्तर गति सांगितल्या आहेत; (१) मृत्युलोकीं जन्म (२) नरक (३) स्वर्ग आणि (४) मोक्ष पापपुण्य समतोल असल्यास पहिली, पाप अधिक असल्यास दुसरी, पुण्य अधिक असल्यास तिसरी आणि पापपुण्याच्या अतिक्रमानें चौथी गति लाभते.

१९९ त्रासती—त्रस्त होतात, धाक पावतात. न'व हें अव्यय नैव पासून आलेलें आहे.

१२१ पुढें म्हणजे मरणोत्तर परलोकांत.

१३३ कोणाला कठोर शब्द बोलूं नको. तूं बोललास म्हणजे उलट तुला ते बोलतील. उलट बोलणें दुःखदायी असल्यामुळें तूं बोललास दुसऱ्याला पण अशा प्रकारें उलट तें तुला च लागेल.

कोणाला शब्दानें हि दुखवूं नये कारण अखेर तें आपणाला च दुखविण्यासारखें असल्यामुळें हेय होय.

१३४ कांशाच्या भांड्याचें तोंड खुलें ठेवलें आणि त्याला प्रहार केला तर तें शब्द करूं लागतें, प्रत्युत्तर देतें. पण तें च जर उपडें टाकून त्याचें तोंड बंद केलें, तर प्रहार केला असतां तें शब्द करीत नाहीं, प्रत्युत्तर देत नाहीं. म्हणून म्हटलें आहे; उपड्या टाकलेल्या कांशाच्या भांड्या-प्रमाणें जो बाह्य आघात तोंडातून अवाक्षर न काढतां मुकाट्यानें सहन करतो तो च शांत, तो च निर्वाण पावला म्हणावा.

इतर भांडीं हि शब्द करतात. पण तीं वाद्यें नव्हत. कांसें हें वाद्य होय. म्हणून वदन जें वाद्य म्हणजे वाचाल त्याला त्याची उपमा अनुरूप होय. ती येथें ध्वनित आहे.

मुकाट्यानें तडाखे सहन करणें, ही च खरी शांति. ज्यानें शब्द केला त्यानें आपली असहिष्णुता आपल्या तोंडानें च जाहीर केली.

१३५ मृत्यु हा गुराखी आणि जरा ही त्याची काठी असें सुचविलें आहे

१३६ हा अग्नि आहे, ह्याला स्पर्श केल्यास आपला हात पोळेल हें न जाणतां अबोध बालक निखारा मुठींत धरतें आणि हात भाजला म्हणजे दुःखानें आक्रंदतें. त्याचप्रमाणें अज्ञ जन पाप करणें अग्निस्पर्शाप्रमाणें तापदायक आहे, दुःखद आहे, हें न जाणतां पाप करतात आणि त्यामुळें शेवटीं दुःखी होऊन हाय हाय करतात.

दाहकता हा अग्नीचा धर्म तो न जाणल्यामुळें बालक दुःखी होतें. तसा कोणत्या कर्माचा काय धर्म आहे तें न जाणल्यामुळें अर्थात् धर्म-ज्ञानाच्या अभावीं जड जनता दुःखी होते. असे सर्व धर्म सिद्धार्थानें जाणल्यामुळें तो बुद्ध, धर्मराज झाला.

१४१ जटा म्हणजे जटा-धारण; तसें च पंक म्हणजे पंक-चर्चा. देहदंडनानें चित्तशुद्धि होत नाहीं. ती तर जो संशयाचें जाळें उपटून फेकून देतो, मोहाचें आवरण दूर सारतो, त्याची च होते.

१४२ वरील श्लोकांत देहाचे हाल करण्यांत, तो दंडित करण्यांत लाभ नाहीं हें सांगितलें येथें तो मंडित करण्यांत कांहीं हानि नाहीं हें सांगतात. देहाचें दंडन किंवा मंडन ही गोष्ट मुद्दयाची नाहीं चित्ताचें दंडन म्हणजे संयम आणि चित्ताचें मंडन म्हणजे ज्ञानसंपन्नता, ही मुद्दयाची गोष्ट आहे. अशा यतचित्त आणि ज्ञानसंपन्न पुरुषाला कोणत्या नांवानें ओळखावें ही देखील महत्त्वाची गोष्ट नव्हे. त्याला ब्राह्मण म्हणा, श्रमण म्हणा, नाहीं तर भिक्षु म्हणा, वस्तु एक च.

येथील धनी शब्द मुळांतील 'अलंकतो' ह्या पदाचा अनुवाद आहे. मुळांतील रहस्य त्यानें प्रगट होत नाहीं. दंडिताचा विरुद्धार्थवाची म्हणून तो आलेला आहे. 'न नग्नचर्या', ह्या लगतच्या पूर्ववर्ती श्लोकांत दंडित शब्द आलेला नाहीं. पण तो अभिप्रेत आहे. श्लोक दंड-वर्गांत आहे हें एक, आणि दुसरें, शेजारच्या प्रस्तुत समवृत्त श्लोकांत 'अलंकतो' शब्द साभिप्राय आहे, त्यावरून हें अनुमान होतें.

१४३ लज्जा दोन प्रकारची : एक जनलज्जा आणि दुसरी मनलज्जा. जन-लज्जेला अवत्रपा आणि मनलज्जेला ह्री अशा विशिष्ट संज्ञा आहेत. येथें लज्जा शब्दानें ह्री अभिप्रेत आहे. आणि खरी लज्जा ती ही च.

शिकविलेला घोडा जसा नुसत्या लगामाच्या इषाऱ्यानें वाटेनें चालतो' त्याला चाबकाचा फटकारा खाण्याची पाळी येत नाहीं, तसा जो मनलज्जेच्या लगामाच्या इषाऱ्यानें सन्मार्गानें चालतो, वांकडें पाऊल पडूं देत नाहीं, त्याला लोक-निंदेचा सन्मार्गावर आणणारा तडाखा खावा लागत नाहीं.

ह्री, मनलज्जा ही निषेधरूप असते. कारण 'खबरदार. पाप करूं नको', अशी जी अंतरात्म्याची सूचना तिचें च नांव ह्री. यक्षप्रश्नांना उत्तरें देतांना धर्मानें 'ह्रीरकार्यनिवर्तनम्' अशी व्याख्या केली आहे. परंतु ह्या लज्जारूप निषेधाच्या कह्यांत राहणारे, ह्या बुद्धीच्या लगामाला मान वांकविणारे, अंतरात्म्याची ही पापाची मनाई ऐकणारे विरळा. बुद्धि–स्वार. ह्री–लगाम. देह–घोडा. धर्म–मार्ग.

१४६ भगवान् बुद्ध कळवळून म्हणत आहेत:–बाबांनो, देहगेहाला जन्ममृत्यूंची, जराव्याधींची, रागद्वेषांची, आग लागली आहे, आणि इकडे तुमचें आपलें गाणें बजावणें चाललें आहे ! किती विपरीत वर्तन तुमचें हें ? संसाराच्या ह्या सुदीर्घ व किर्र अंधेऱ्या जंगलांत जन्ममृत्यूच्या ठेचा-मागून ठेचा खात अहां आणि धर्मरूप दिव्याची पर्वा करीत नाहीं ! काय म्हणावें तुम्हांला ?

१४७ मन:प्राणेंद्रियांचें बनलेलें हें शरीर एकजिनसी नव्हे; अस्थि, चर्म, रक्त, मांस इत्यादींचें रचलेलें धातु-संघातरूप होय. वयोभेदानें हें बहुरंगी हि आहे. हें आधींनीं तसें च व्याधींनीं हि ग्रासलेलें असून बहुविध संकल्पांनीं भरलेलें आहे. पण हें असें बहु-जिनसी, बहुरंगी आणि बहुभंगी बिंब टिकाऊ नव्हे, हें लवकर च काळाचें तोंडीलावणें होणार !

येथें शरीराला बिंब म्हटलें आहे. बिंब म्हणजे प्रतिमा. बिंब म्हणजे तोंडलें. तोंडलें साल, मगज यांचा समूह असून तें रंग पालट करतें, हिरव्याचें

पिवळें लाल होतें, आंतून बाहेरून किडतें, बियांनीं भरलेलें असतें, आणि भक्ष्य असतें. म्हणून ही रूपक-कल्पना.

१४९ 'तुंबिनी-फळें'--दुधी वेगळी, तुंबिनी वेगळी. जिला सांगडीच्या आणि तुंबे, कमंडलु बनविण्याच्या उपयोगी पडणारे भोपळे लागतात ती तुंबिनी, अर्थात् कडू दुधी. दुधी भोपळ्यांची भाजी होते. आणि ते प्रायः तुंब्याच्या आकाराचे नसतात हि.

वर्षाऋतूंत नद्या दुस्तर असतात. शरद् ऋतूंत त्यांच्यावर रहदारी जोरानें सुरू होते. तेव्हां फुटलेले भोपळे तीरावर फेकून दिलेले आढळतात. नदीकांठावर च स्मशान असतें. तेथें हाडें पडलेलीं दिसतात.

१५० आपलें शरीर म्हणजे एक गड आहे, राजधानी आहे. हाडांच्या विटांनीं आणि रक्तमांसांच्या चिखलानें ह्यांची बांधणी झाली आहे. ह्या किल्ल्यांत मृत्युराजा आणि जराराणी मान आणि वंचना ह्या आपल्या परिचरांसह राज्य करीत आहे.

१५१ शरीराला रथाची उपमा प्रसिद्ध च आहे;

'आत्मानं रथिनं विद्धि शरीरं रथमेव तु ।
बुद्धिं तु सारथिं विद्धि मनः प्रग्रहमेव च ।
इंद्रियाणि हयानाहुर्विषयांस्तेषु गोचरान् ॥'

कठोपनिषद्

१५३, १५४ संबोधि प्राप्त झाल्यावर, बुद्धत्व प्राप्त झाल्यावर, मार-जय केल्यावर, सिद्धार्थाच्या तोंडून बाहेर पडलेले उद्‌गार. गृहकारक–तृष्णा, घर–शरीर, आढें–अविद्या, वांसे–रागद्वेषमोहादि.

१५५ ज्यांनीं बालपणीं विद्यार्जन केलें नाहीं, तरुणपणीं धनार्जन केलें नाहीं, ते म्हातारपणीं सुकलेल्या तळ्याकांठीं भक्ष्यासाठीं ध्यानस्थ बसलेल्या करकोंच्याप्रमाणें आपल्या निःसार गत आयुष्याकडे शून्य दृष्टीनें पहात चिंतामग्न होतात, काळजींत पडतात.

१५६ ज्याच्यांतून बाण सुटून गेले आहेत, आतां बाण सोडून लक्ष्यवेध करण्याची शक्ति उरलेली नाहीं, अशा जीर्ण धनुष्याप्रमाणें ते

बालपण आणि तरुणपण निघून गेल्यावर म्हातारपणीं पाठीची कमान झालेले, विद्याधनार्जन करण्याची शक्ति नसलेले, गतायुष्याबद्दल शोक करीत पडले राहतात.

१५७ त्रियामा म्हणजे रात्र. अर्थात् तीन यामांतील एक याम म्हणजे रात्रीचा तृतीयांश आत्महितैषी पुरुषानें ध्यानचिंतनांत खर्चावा. वैदिक वाङ्मयांत रात्रिशेष अभीष्ट मानला आहे.

१६१ गारेच्या मण्याला हिरकणी अर्थात् वज्रसूची च भोंक पाडते गारगोटयांच्या खाणींत च हिरा जन्मतो हें प्रसिद्ध च आहे.

१६२ 'मालु'—झाडावर च उगवणारी, त्याचा च जीवनरस पिऊन त्याला आपल्या वेढयांनीं आणि विस्तारानें झांकून खुरटवणारी, एक वृक्षादनी लता.

१६४ कळकाला डोळे असतात पण तेथें दृष्टि नसल्यामुळें ते मथ्या, नष्ट, म्हणावयाचे. कळकाला बत्तीस वर्षांनीं फळें लागतात. आणि फळें लागलीं म्हणजे कळकाचें बेट फलपाकान्त ज्वारी, गहूं इत्यादि ओषधींप्रमाणें सुकून जातें. म्हणून म्हटलें आहे : अर्हतांचा उपदेश मिथ्या दृष्टीचा आश्रय केल्यामुळें जो मानत नाहीं त्याला लाभणारें ( पाप ) फळ बांसाच्याप्रमाणें स्वत:च्या जनकाच्या च घातास कारण होतें.

१६७ हीनधर्म=संसारवर्धक धर्म. लोक=संसार. श्लो० ६० पहा.

१६८ 'ऊठ प्रमाद न करीं'—पातकें टाक, पतित राहूं नको. उठल्यावर सावध राहून पुन्हां पतित होऊं नको. आणि तज्ज्ञांपासून समजून घेऊन त्याप्रमाणें वाग.

विधिवत् म्हणजे यथाशास्त्र. आणि शास्त्र हें तज्ज्ञांच्या मताहून वेगळें काय आहे ? तज्ज्ञमताचें च दुसरें नांव शास्त्र होय.

'उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान् निबोधत' ही च प्राचीन शिकवण येथें दिली आहे. उन्नतीचा हा सनातन क्रम आहे.

१७० हा लोक म्हणजे संसार. श्लो. ४४ ची टिप्पणी पहा. तेथें फेस आणि मृगजळ ह्या उपमा देहाला उद्देशून आल्या आहेत. येथें संसाराला. दोहोंचा अर्थ एक च–अनासक्त बचावतो.

१७१ रंगोबेरंगी राज-रथांत जो तो बसायला हपापतो. आणि बसायला मिळालें असतां तेथून उठूं इच्छीत नाहीं. तसा हा रंगेल संसार मूढांना आसक्त करतो. ते तेथें बैठक मारून बसतात, उठण्याचें नांव घेत नाहींत. परंतु जे शहाणे आहेत, त्यांना तो आसक्त करीत नाहीं. ते तर संसारांतून उठून चालते होतात.

रथाला चाकें असतात आणि तो वाहून नेणारें वाहन होय. म्हणून त्याचें उपमान भ्रमपूर्ण आणि गतिमान संसाराला दिलें आहे. शिवाय संसार रंगेल आहे, वैचित्र्यपूर्ण आहे. म्हणून त्याला राजाच्या नाना वर्णाकृतींनीं सजवलेल्या रथाचें उपमान दिलें आहे, साध्या रथाचें दिलेलें नाहीं. रथाच्या उपमानांत आणखी हि एक खुबी आहे. रथांत बसल्याखेरीज तो आपणाला कोठें घेऊन जात नाहीं. तसा जो संसारांत बसत नाहीं, आसक्त होत नाहीं, त्याला संसार भ्रमांत आणि फेऱ्यांत टाकीत नाहीं, रथांत बसणें न बसणें ही गोष्ट आपल्या हातची आहे.

१७५ ऊर्ध्व मार्गाचे अनेक विभाग पडतात. त्याचा आरंभ भूर्लोकापासून होऊन अंत स्वर्लोकांत होतो. ह्या दोन अंतांमधील पायऱ्यांचें सांघिक नांव भुवर्लोक. ह्याचे नाना लोकांनीं नाना विभाग पाडून त्यांना अमुक अमुक लोक म्हणून नांवें दिलीं आहेत. माझी कल्पना पुढीलप्रमाणें:– भुवर्लोकाला च अंतराल असें नांव आहे. ह्याचे प्रथम दोन भाग पडतात. एक आकाश आणि दुसरा अवकाश. आकाशांत सूर्य-चंद्र-ग्रह-नक्षत्र तारकांचा ताप आहे. अवकाशांत असा कोणता च ताप नाहीं. अवकाशाचे भाग पडूं शकत नाहींत. कारण तेथें कोणतें च चिह्न नाहीं. विलक्षण शून्यत्वरूप निर्वाण तें हें च. आकाशाचे चंद्र-लोक, सूर्य-लोक आणि नक्षत्र लोक म्हणजे च ब्रह्मलोक असे उत्तरोत्तर वरचढ तीन विभाग पडतात. जे केवळ मनःशुद्धीवर थांबतात त्यांची गति चंद्रलोकापर्यंत होते. ह्यांना

हंस ही संज्ञा आहे. मानससेवी म्हणून हंसाची कीर्ती प्रसिद्ध च आहे. जे मनःशुद्धि उल्लंघून एकदम बुद्धिशुद्धीपर्यंत मजल मारतात ते 'परमहंस' होत. बुद्धीची देवता सूर्य कल्पिली आहे. सूर्य आपल्या तेजानें चंद्राप्रमाणें इतरांना निस्तेज च करीत नाहीं, तर त्यांना तो पार लोपवतो आणि एकटा असपत्न राज्य करतो म्हणून तो परमहंस. चंद्र आणि सूर्य दोघे हि राजे झाले तरी त्यांना राजत्वासाठीं झुंजावें लागतें. आणि शिवाय एकाचें राज्य फक्त रात्रीं तर दुसऱ्याचें फक्त दिवसां. परंतु जे बुद्धिशुद्धीवर न थांबतां हृदयशुद्धि करतात ते 'विमान' होत. आकाश हृदयाची देवता कल्पिली आहे. आकाश चंद्र-सूर्यांना जरा हि प्रतिकार न करतां शांतपणें रात्रि आणि दिवस या दोहोंवर हि राज्य करतें. आकाशांत चंद्र आणि सूर्य दोहोंचा समावेश होतो. त्याप्रमाणें हृदय-शुद्धींत चित्तशुद्धि आणि बुद्धिशुद्धि या दोहोंचा समावेश होतो. परंतु चित्तशुद्धि अधिक बुद्धिशुद्धि म्हणजे हृदयशुद्धि नव्हे. हृदयशुद्धींत मान-निरसन, अहंकार-निर्मूलन, संन्यास हा विशेष आहे. ज्यानें हृदयशुद्धि साधली तो च नक्षत्र-लोकास ब्रह्म-लोकास पोंचला, ब्रह्मीभूत झाला, बुद्ध झाला, (श्लो. ३८७ पहा).

हंस, परमहंस आणि विमान ह्या तीन संज्ञा क्रमानें चंद्र, सूर्य, आणि आकाश या तीन देवतांच्या तशा च त्यांचा प्रसाद ज्यांना लाभला आहे अशा त्यांच्या शुद्ध-चित्त, शुद्ध-बुद्धि आणि शुद्ध-हृदय उपासकांच्या वाचक आहेत.

नक्षत्र म्हणजे च ब्रह्म. ब्रह्म शब्दानें त्याचें वैशिष्टच व्यक्त होत नाहीं. तें नक्षत्र शब्दानें होतें. क्षत्र म्हणजे क्षत्रिय. हे प्रतिकार करणारे, मानी म्हणून प्रसिद्ध आहेत. ईश्वरभाव हा त्यांचा जातीय गुण. उलट ब्राह्मणांचा जातीय गुण शम. शांति. (श्लो. ३८७ पहा.) कसला हि प्रतिकार न करतां मुकाट्यानें सहन करणें याचें नांव शांति. ब्रह्माचें हें च लक्षण गीतेनें दिलें आहे. 'निर्दोपं हि समं ब्रह्म.' 'खं ब्रह्म' हें त्याचें उदाहरण. ह्याचा अर्थ आकाश ब्रह्म आहे म्हणजे शांत आहे, सम आहे, अप्रतिकार आहे. विमान शब्दाचा हि हा च आशय. विमान म्हणजे च

समान. तुकाराम महाराज विमानांत बसून गेले ह्याचा अर्थ ते ब्रह्मभूयास, समत्वास पोंचले इतका च

आकाशाची, ऊर्ध्वगतीच्या पूर्वार्धाची, विल्हेवाट लागली. परंतु अवकाशाचें, उत्तरार्धाचें कसें ? त्याचे अधिकारी कोण ? ह्याचें उत्तर जे ब्रह्मलोकाला पोंचले ते च. अंतर इतकें च कीं देहपातापर्यंत ते नक्षत्र-लोकाचे अधिकारी राहतील. देहपातानंतर च निर्वाणाचे. नक्षत्र-लोकांत ताप नसला तरी तेज आहे च. निखारे विझायला आले म्हणजे कांहीं वस्तु तापवायला ते उपयोगी पडत नाहींत. तरी ते निखारे च, राख नव्हत. तसा देहधारी शांत पुरुष हा निर्वाणाधीन म्हणावयाचा, देहपातोत्तर च निर्वाण, निवाला, म्हणावयाचा. मरायला टेकलेल्या माणसासंबंधीं बोलतांना 'गेला च तो' हें जसें घटके दोन घटकेंत जाईल, आतां कांहीं संशय उरला नाहीं अशा अर्थी बोलणें, तसें देहधारी शांत पुरुषाला निर्वाण म्हणणें होय.

१७६ एकला धर्म म्हणजे सत्य. (१) धर्म च सत्य होय. म्हणून जो सत्य बोलतो, तो धर्म च बोलतो; आणि जो धर्म बोलतो तो सत्य च बोलतो. एका च वस्तूचीं हीं दोन रूपें होत. –शतपथ ब्राह्मण. (२) सत्यान्नास्ति परो धर्मः। (३) सत्यमेकपदं स्वर्ग्यम्। –महाभारत (४) सत्य तो चि धर्म–तुकाराम (५) सर्व व्रतें एका सत्याच्या व्रतांतून उत्पन्न झालीं आहेत व त्याच्यासाठीं च त्यांचें अस्तित्व. (६) सत्याविना कोणत्या हि नियमाचें पालन अशक्य आहे–गांधी. तात्पर्य, सत्य हें सर्व धर्मकर्माचें सूत्र होय. तें ज्याचें सुटलें त्यानें केलें तो सारा दंभ झाला, मिथ्याचार झाला. सत्य एकमात्र धर्म म्हणायचा तो ह्यामुळें च.

१७७ कदर्य म्हणजे कद्रू, कवडीचुंबक.

१९७ ज्याचें हस्तगत केलेलें धर्म-प्रवर्तकत्व कोणाकडून हि हिरावलें जाऊं शकत नाहीं किंवा कोणी हस्तगत हि करूं शकत नाहीं त्या सर्व मार्ग आक्रमून मुक्कामास पोंचलेल्या सर्वज्ञ बुद्ध मुनीस तुम्ही भटकलेले जीव कोणत्या वरें मार्गानें नेते व्हाल ?

आशय हा आहे कीं ज्यानें स्वतः च पहिल्या प्रथम लोकांसाठीं धर्माचा मार्ग चालून तयार केला, ज्यानें मार्गाचा अंत गांठला आणि म्हणून जो

सर्वज्ञ झाला, त्या लोकनेत्या बुद्ध मुनीला दुसरा कोणी कसा नेईल ? नेता दुसऱ्याचें नेतृत्व कसें पत्करील ? नायक अनुयायित्व कसें स्वीकारील ?

बुद्धाला दुसऱ्या कोणाचें शिष्यत्व पत्करायला सांगणाऱ्यांना बुद्धाचा हा नकारार्थी उलट प्रश्न आहे. बुद्ध आपण शिष्य नसून 'शास्ता' असल्याचें, ' विनायक ' असल्याचें, सांगत आहे.

निर्वाणलब्धि अथवा रागद्वेपजय हा कांहीं बुद्धाचा असा विजय नव्हे कीं जो कोणी मिळवूं शकत नाहीं किंवा ज्याच्या आसपास हि कोणाला जातां येत नाहीं. तसें झाल्यास बुद्धाचें धर्मप्रवर्तन व्यर्थ च ठरेल. बुद्धाचें धर्म-प्रवर्तकत्व मात्र त्याच्यापासून कोणी काढून घेऊं शकत नाहीं किंवा स्वतः दुसरा कोणी स्वीकारूं हि शकत नाहीं. 'चोरूं पोहचूं न शके.' ह्या दोहोंचा असा अभिप्राय आहे.

पद-हीन आणि अनंत-गोचर हीं दोन्ही पदें श्लिष्ट, पर्यायवाची आणि पुन्हां विरुद्धार्थसूचक आहेत.

पद हीन--(१) मार्ग संपवून मुक्कामास पोंचलेला.
(२) मार्गहीन, अगतिक, पंगु.

अनंत-गोचर--(१) सर्वज्ञ (२) सर्वगामी.

पहिले अर्थकार्यकारणभावानें बद्ध व पर्यायवाची असून दुसरे परस्पर विरुद्ध आहेत. अर्थात् बुद्ध न्यायला आलेल्यांना सवाल करतो:-मी पंगु; तुमच्या मागोमाग मी कसा येणार ? मी सर्वगत; मला तुम्ही कसे नेणार ?

१८० जाळ्यांच्या साधनानें जीवघात करून उपजीविका करणाऱ्या कोळिणी पारधिणी, मासे ससे, आपल्या जाळ्यांत पकडून घेऊन जातात; त्याप्रमाणें रजोगुणाच्या वळलेल्या आसक्तिरूप बळकट जाळ्यांत तृष्णा विषयी जीवांना पकडून मृत्यूच्या घरी घेऊन जाते.

अशी ही प्रसक्ति-जालिनी विपयिजीवघातिनी तृष्णा ज्याला बद्ध करून घेऊन जाऊं शकली नाहीं त्या सर्व-विपय-प्रवाह तरून ज्ञानाच्या अनंत भूमिकेवर अधिष्ठित झालेल्या बुद्ध मुनीला तुम्ही विपयी जीव

कुठल्या बरें पदाचें–अधिकाराचें–विषयाचें आमिष दाखवून न्याल, चलित कराल ?

'पदहीन'--(१) निर्विषय (२) स्थान-हीन, अनिकेत, बेपत्ता.

'अनंतगोचर'--(१) सर्वज्ञ. (२) सार्वभौम.

ज्याचा पत्ता नाहीं, ठाव-ठिकाण नाहीं, तो तुमच्या मागें येणार कसा ? जो सर्वगत त्याला तुम्ही नेणार कसे ?

१८१ 'नैष्कर्म्योपशमीं रत'--गृहसुखत्याग आणि ध्यान यांत रंगलेला, ग्राम्य-धर्म-निवृत्त आणि मोक्ष-धर्म-रत.

१८३ गौतमाच्या च नव्हे तर सर्व बुद्धांच्या, ज्ञान्यांच्या, शिकवणुकीचा हा दृढभाजक होय.

१८५ 'प्रातिमोक्षांत संवर'--प्रतिमोक्ष म्हणजे मोक्षविरुद्ध विषय आणि प्रातिमोक्ष म्हणजे त्यांचा संग्रह. त्यापासून अलग राहणें म्हणजे प्रातिमोक्षाविषयीं संयम, अर्थात् आचार-नियमांचें उल्लंघन न करणें.

'स्वचित्ताचें समाधान'-- आपलें चित्त समाहित करणें, चित्ताला चतुर्ध्यानात्मक समाधीचें शिक्षण देणें.

२०२ 'द्वेषासम न हानि हि'--येथें 'हानि' ऐवजीं मुळांत 'कलि' शब्द आहे. त्याचा पर्यायानें हानि असा अर्थ होतो. मराठींत त्याचा अर्थ कलह होतो. तो हि पर्यायानें आला आहे.

द्यूत ज्यानें खेळतात त्या फांशाला चार बाजू असतात. त्यांच्यावर क्रमानें एक, दोन, तीन, आणि चार शून्यें अंकित असत. त्यांना अनुक्रमें कलि, द्वार, त्रेता, आणि कृत अशा संज्ञा आहेत (सांप्रत चार बाजूंवर क्रमानें एक, दोन, सहा आणि पांच शून्यें अंकित असतात.) फांसे फेंकले आणि सर्व फाशांची वरची बाजू कृताची अर्थात् चतुरंक आली तर तो उत्तम लाभ झाला. पण त्याऐवजीं ती कलीची अर्थात् एकांक आली तर तो अगदी हलका डाव पडला. अर्थात् ती हानि म्हटली जाईल. म्हणून कलीचा अर्थ हानि. दहा म्हणन कोणी डाव टाकला आणि तो पडला कलीचा. ही

अर्थात् त्याची हार झाली. अशी हार झाली, कलीचा डाव पडला, म्हणजे जुगारी तो लपवूं लागतो, (श्लोक २५२ पहा.) किंवा हात लावून मोडूं लागतो आणि अर्थातच त्यामुळें भांडण जुंपतें, कलागत लागते. कलि म्हणजे भांडण हा अर्थ असा आला आहे

इतका प्रपंच न करतां हि कलि म्हणजे द्यूताचा डाव अर्थात् फसवणूक, हानि असा अर्थ करतां येईल. कारण द्यूत म्हणजे अक्षरशः छल, अचक घात, कार्यकारणभावशून्यरूपतेमुळें. उलट धर्म म्हणजे निश्चितफलदातृत्व आणि तें हि कार्यकारणभावरूपतेमुळें च.

२०८ 'धौरेय-शीलास'––धौरेय म्हणजे धुरेचा अर्थात् बैल. तेव्हां धौरेयशील म्हणजे बैलाच्या शीलाचा. नांगर, गाडी ओढण्यासारखीं मोठमोठीं भारी कामें करणें हा बैलाचा गुण. म्हणून धौरेयशील म्हणजे गुरु-भार वाहणारा, मेहनती, कठोर परिश्रमी, तपस्वी. आणि म्हणून नेतृत्वशाली, म्होरक्या.

२०९ अयोग्य कार्यांत लागणारा आणि उलट योग्य कार्यांत न लागणारा अर्थात् नीति-न्याय न पाहतां मन मानेल तसें करणारा मनुष्य अखेर योग्य कार्यांत लागणाऱ्या पुरुषाचा अर्थात् त्याच्या सदाचरणाचा आणि तन्मूलक सुस्थितीचा आणि सुगतीचा हेवा करील आणि आपल्याबद्दल अर्थात् आपल्या दुर्वर्तनाबद्दल आणि तन्मूलक दुःस्थितीबद्दल आणि दुर्गतीबद्दल पश्चात्ताप पावेल.

मुळांत अर्थ आणि प्रिय शब्द आहेत. त्यांचा अनुवाद येथें श्रेय आणि प्रेय शब्दांनीं केलेला आहे. अर्थ म्हणजे अर्थनीय, वांछनीय, अर्थात् पथ्य, हित, न्याय्य. ह्याच्याविरुद्ध प्रिय म्हणजे नुसतें जिभेला गोड वाटणारें परंतु परिणामीं अपथ्य, अहितकर. अशा प्रकारें अर्थ आणि प्रिय हे शब्द विरुद्धार्थवाची होत. तेव्हां अर्थ म्हणजे कडू पण पथ्य, अप्रिय पण हित. आणि प्रिय म्हणजे अनर्थावह पण गोड, अहितकर पण आवडतें.

२१२–२१६ 'प्रिय'=गोड, आवडता, स्निग्ध. 'प्रेम'=गोडी, आवड, स्नेह, ममत्व. 'रति'=विषयभोग, रमणें. 'काम'=मूळ भोगवृत्ति, राग. 'तृष्णा'=भोगप्रवृत्ति, भोगांकडे ओढा.

२१७ दर्शन म्हणजे मार्ग-ज्ञान आणि शील म्हणजे मार्गक्रमण यांनीं युक्त तो शील-दर्शन-संपन्न अर्थात् क्रियावान् पंडित.

२१८ स्रोत म्हणजे मार्ग. ऊर्ध्वस्रोता म्हणजे ऊर्ध्वमार्गी. ज्याला अनिर्वचनीय निर्वाणाची चटक लागली आहे, मनानें निर्वाणाचा स्वाद ज्यानें चाखला आहे, आणि भोगांतून जो पूर्णपणें सुटला आहे, तो ऊर्ध्व-स्रोता होय. भोगदासी आसक्तीला फारकत देऊन ज्यानें मोक्षस्वामिनी शांति वरली तो च ऊर्ध्वरेता होय. ज्याचें वीर्य, ज्याचें मनोबल, भोगाच्या घाण्याला जुंपलेलें नसून मोक्षाधिष्ठित योगाच्या दिव्यरथाचें धुरीण आहे, तो च ऊर्ध्वरेता होय.

२२२ भ्रान्त म्हणजे मार्गभ्रष्ट असा रथ जो बरोबर रस्त्यावर आणतो, तो च सारथी. तसा जो उसळलेला क्रोध मनांत आवरून घेतो तो च संयमी. इतर तो नामधारी.

२३० 'निष्क जांबूनदाचें'--आधीं च ज्यांत थोडें हि हीन नाहीं असें जांबूनदाचें (जंबूनदीकांठचें) निखळ सोनें आणि वर पुन्हां राजाची पुन्हां पुन्हां कठोर कसोटी होऊन मग च ज्यावर मुद्रा पडली आहे असें नाणें, अशा नाण्याची जशी कोणी वद्द म्हणून निंदा करणें शक्य नाहीं, त्याप्रमाणें जो आधीं च निर्दोष आहे, वर पुन्हां पंडितांच्या कसोटींतून तावून आणि मान्यतेनें सुलाखून निघाला आहे त्याची निंदा करण्याची कोणाची प्राज्ञा आहे ?

२३५ 'शिदोरी'--पुण्याची गांठोडी. पुण्य च परलोकाच्या मार्गांत यात्रेंत उपयोगी होय.

२३६ येथें झटणें म्हणजे राबणें, शेती करणें, आपल्या देहक्षेत्रांत अमृत-फळाचें पीक काढणें. मुळांत 'वायम' म्हणजे व्यायाम कर असा प्रयोग आहे.

'द्वीप'--प्रवाहांतील आश्रय, रक्षा स्थळ, शरण. भवनदींत आर्यत्व हें शरण होय.

२४४ कावळा ससाण्याप्रमाणें एखाद्या पक्ष्याची शिकार करूं शकत नाहीं. तें शौर्य त्याच्या अंगीं नाहीं. तो पशूंच्या व्रणांत चोंची मारून

त्यांचें मांस तोडण्यांत मात्र शूर. तसा जो दुसऱ्यांच्या दोषांवर नजर ठेवून उपजीविका करणारा तो काक-शूर होय.

२५४ आकाश जसा लक्षण-शून्य तसा श्रमण म्हणजे श्रमण-पद बाह्य-लक्षण-शून्य होय, अनिर्देश्य होय, अव्यक्त होय, अचिंत्य होय.

२५६ या धर्मस्थ-वर्गांत धर्मस्थ, पंडित, धर्म-धर इत्यादि कितीएक मान्य पदांची प्रायः व्युत्पत्ति-निष्ठ निरुक्ति देऊन नवीन व्याख्या केली आहे. पुढें थोडक्यांत त्याचे मार्मिक रसग्रहण केलें आहे.

न्यायाधीशाला धर्मस्थ म्हणतात; पण जो धर्माच्या कोटांत सुरक्षित राहतो तो च धर्मस्थ होय (२४६). समिति (सभा, वाद-सभा) जिंकणाऱ्या पुरुषाला पंडित म्हणतात. पण जो निंदा, मार, धाक इत्यादींची समिति (लढाई) जिंकतो तो च पंडित (समितिंजय) होय (२५८). ज्याला पुष्कळ धर्म-शास्त्र कण्ठस्थ आहे त्याला धर्मधर म्हणतात; पण जो धर्म शरीरानें धारण करतो अर्थात् आचरतो तो च धर्मधर होय (२५९). ज्याचे केस पांढरे झाले त्याला स्थविर म्हणतात; पण जो सत्यांत, धर्मांत, अहिंसेंत ठरला, स्थिरावला तो च स्थविर होय (२६०). जो गोरागोमटा आणि गोडबोल्या असतो त्याला लोक साधु (चांगला) म्हणतात; पण ज्यानें सर्व दोष साधले म्हणजे वधले तो च साधु होय (२९२). जो मुंडन करतो त्याला (मुंडी) श्रमण म्हणतात; पण ज्यानें पापांचें मुंडन, शमन केलें तो च मुंडी, तो च श्रमण होय (२६५). जो भीक मागतो त्याला भिक्षु म्हणतात. पण जो पापपुण्याला भिकेस लावतो तो च भिक्षु होय (२६८). जो मौन धरतो त्याला मुनि म्हणतात; पण जो मौन म्हणजे तुला (पाली मुनाति—तोलतो) धरतो अर्थात् हलकेभारी (पापपुण्य) तोलून घेतो तो च मुनि (विवेकी) होय (२६९). जो यज्ञकर्मांत प्राण्यांचा घात करतो त्याला (यजमानाला) आर्य (ऋ. ५ प. मारणें प्रयोजकरूप श्लो. २९५ ची टिप्पणी पहा) म्हणतात; पण जो कोणाचा घात करीत नाहीं तो च आर्य (कुशल, पाप-नाशक, बुद्धभिक्षु) होय (२७०).

ग्राम्य जनांना न लाभणारें, आरण्यकांचें सुख जें निर्वाण, तें जें मी भोगत आहे तें केवळ शील, व्रत, श्रवण, एकांतवास अथवा समाधि यांच्या

बळावर नव्हे. तें मला सर्व आस्रवांचा निःशेष क्षय केल्यानंतर च भोगायला मिळत आहे हें पक्कें लक्षांत ठेवा. आणि सर्व आस्रवांचा संपूर्ण क्षय होईपर्यंत कशानें हि संतुष्ट राहूं नका. (२७१–२७२).

बुद्धाचा हा ( २७१–२७२ ) आपल्या भिक्षुसेनेला 'आगे बढो' चा हुकूम आहे.

२५६ अर्थ– न्याय्य. धर्म– न्याय. धर्मस्थ–न्यायाधिकारी. निवडणें–निवाडा देणें, ठरवणें. नेणें– निर्णय देणें. समभाव–निःपक्षपातवृत्ति. सहसा– दंडेलीनें. धर्म-रक्षित– न्यायाच्या प्राकारांत सुरक्षित.

२६१ 'वान्त-मल'—वांति म्हणजे ओक, पोटांतील घाण. तशी अंतरांतील घाण ज्यानें काढून टाकली तो वांत-मल. वांत-शब्दाचें हें रहस्य

२८३ येथें वन हा शब्द श्लिष्ट आहे. वन म्हणजे (१) वृक्ष-समूह, अरण्य (२) काम. दुसरा अर्थ वनु ८ आ. वांछणें या धातूपासून आलेला आहे. वनिता हा शब्द हि त्यापासून च आलेला आहे. त्याचा अर्थ कामिलेली. येथें हि वन शब्दाचा अर्थ मुख्यतः स्त्रीभोग-वासना असा च आहे. असूर्यपश्य वन तोडून वनवासी जसे सूर्याच्या स्वच्छ प्रकाशांत येतात तसे 'हे संसारी लोक हो, वासनांचें जंगल तोडून ज्ञानाच्या निर्मल प्रकाशांत या.' अशा आशयानें भगवान् कंठरवानें सांगत आहेत; "आरण्य-कांनो, अरण्य (व्रस्च् ६ प. तोडणें, म्हणून वृक्ष-राज्य तोडावयाचें असलें तरी) काय तोडतां? 'वन' तोडा. तें च भयंकर आहे. लहान (वनिका) मोठें वन तोडून असे खुल्या मैदानांत या."

२८५ उपमानासाठीं मुकुदें च कां ? पुंडरीकें कां नाहीं घेतलीं ? आणि शरद् ऋतूंतील च कां ? वर्षाऋतूंतील कां नाहीं ? कारण, कवीला म्हणायचें आहे : वर्षाऋतु निघून गेल्यामुळें स्वच्छ झालेल्या सरांतून मनुष्य जसा रक्त सरसिजें हातानें खुडतो, त्याप्रमाणें रागद्वेषमोह घालवून प्रसन्न केलेल्या चित्तांतून तूं रागयुक्त स्नेहादि मनोविकार तोडून टाक.

२९४ पितृहत्या, राजहत्या, अथवा लोकहत्या यांच्यासारखें घोर कर्म करून हि ब्राह्मणाला त्याचा तिळभर हि दोष लागत नाहीं अशी

लोकांतील समजूत [ हिचा आधार 'निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः ।' इत्यादि वचनें आहेत. त्यांचा अर्थ विधिनिषेध अगदीं आंगवळणीं पडले असतां, टाळायचें तें सहजगत्या इंद्रियें टाळूं लागली आणि करायचें तें करूं लागलीं म्हणजे शास्त्राचें प्रयोजन उरत नाहीं असा आहे. ज्याला ही सहजावस्था प्राप्त झाली, ब्राह्मी स्थिति प्राप्त झाली, त्याच्या हातून पाप होऊं च शकत नसल्यामुळें अशा ब्राह्मणानें किती हि घोर कर्म केलें तरी त्याचें पाप त्याला लागत नाहीं असें आलंकारिक भाषेंत म्हटलें जातें. कांहीं हि केलें तरी ब्राह्मणाला पाप लागत नाहीं. कारण जो केवळ निष्पाप असेल त्याला च ब्राह्मण ही संज्ञा लागू आहे. पहा 'बाहितपापोति ब्राह्मणो ।' (३८८ )] मान्य करून तिचा आपला खरा अर्थ बुद्ध लोकांना सादर करतो; 'तृष्णा आणि अभिमान हे दोन पितर, शाश्वतदृष्टि आणि उच्छेददृष्टि हे दोन राजे आपल्या तृष्णासंगसमुद्भव दोषगुणरूप कुटुंबकबिल्यासकट, आपल्या कामरागादि लवाजम्यासगट आणि त्यांच्या वतनासगट ठार मारून ब्राह्मणाला पापाचा लवलेश लागत नाहीं.'

यांत खुबी ही आहे कीं लोक म्हणतात—पितृ-हत्या, राज-हत्या, लोक-हत्या करून हि ब्राह्मणाला पाप लागत नाहीं. तर बुद्ध त्यांना म्हणतो तसें नव्हे; तशा हत्या करून च ब्राह्मणाला यत्किंचित् हि पाप लागत नाहीं. तशा हत्या न केल्यास पाप त्याला स्पर्श च काय चांगला घाव करील जर ब्राह्मणानें माराचा घात केला नाहीं तर मार त्याला कुशल सोडणार नाहीं.

या श्लोकांत 'निष्पाप' शब्दावर कोटी केली आहे. निष्पाप म्हणजे कुशल, पुण्यवान्. निष्पाप म्हणजे अक्षत, सहीसलामत, कुशल. ४२ व्या श्लोकाची टिप्पणी पहा. निष्पापांचे घातकी म्हणून चमत्कृतिजनक आलंकारिक वर्णन करण्याची प्रथा आजतागायत चालू आहे. पहा, 'संत केवळ घातकी पाहीं । परी तयांसी पातक नाहीं ।।'—एकनाथांचीं भजनें, १४०.

२९५ 'व्याघ्य्-पंचम मारूनि'—ज्यांत वाघाचें जंगल पांचवें भय-स्थान आहे असा मार्ग कापून. व्याघ्य् म्हणजे वाघाचें जंगल अर्थात् निबिड अरण्य, दुर्गम स्थान. जंगलांतून गेलेल्या मार्गावर कमी अधिक दुर्गम स्थळें

लागतात. तसा मोक्षमार्ग ज्या संसार-कांतारांतून गेला आहे त्यावर हि. बौद्ध मतांत हीं दुर्गम स्थळें, हीं भयस्थानें, पांच सांगितलीं आहेत; (१) राग, (२) द्वेष, (३) मोह [अप्रवृत्ति], (४) भ्रांति वा [चांचल्य] आणि (५) संशय. या पांचांत संशय शेवटचें आणि अत्यंत दुर्गम आहे. कारण निःसंशयता म्हणजे साक्षात्कार असल्यामुळें संशय हा साक्षात्काराचा शेवटचा आणि म्हणूनच अत्यंत दुर्लंघ्य अडथळा म्हणावयाचा. ह्या पांचांना 'नीवरणें' म्हणजे आवरणें, पडदे, अशी संज्ञा आहे. पड्याआड असलेल्या दर्शनीय पदार्थाचें दर्शन पड्यामुळें होत नाहीं, अर्थात् नीवरणें म्हणजे दर्शनाचे अडथळे. हे अडथळे येथें जंगलाच्या रूपानें वर्णिलें आहेत. त्यांत हेतु आहे. जंगलें हीं सूर्याच्या दर्शनाला अडथळे होत. प्रस्तुत दर्शनीय वस्तु अर्थात् ज्ञान हें सूर्यासारखें आहे, हें सुचविण्यासाठीं आवरणांना जंगलाच्या रूपानें वर्णिलें आहे.

पूर्वीच्या काळीं जंगलें इतकीं घनदाट असत कीं त्यांच्यांतून सूर्याचें दर्शन मुष्कीलीनें च होई. अशीं वनें (अर्थात् वनभूमि) असूर्यपश्य च म्हणावयाचीं. अशा जंगलांतून वाट काढणें किती कठिण असे याची कल्पना 'सुखमप्रवासगमनम् ।' ह्या वचनावरून येण्यासारखी आहे. ज्या काळीं हिंदुस्थानांत अशीं महारण्यें होतीं त्या काळचे हे श्लोक असल्यामुळें त्यांत त्या काळच्या परिस्थितीनुरूप भाषा आली आहे. आणि त्यावरोबर च त्या काळचीं कालस्थलवृत्तें सांठवलीं आहेत. बुद्धकाळीं अशीं अरण्यें होतीं आणि म्हणून त्या काळीं जंगल तोडणाऱ्यांचा वर्ग होता. (श्लो. २८३ पहा)

जंगलें तोडण्यांत, व तोडवण्यांत पुण्य समजलें जाई. वृक्ष म्हणजे तोडण्यास योग्य, (पहा २८३), आर्य (ऋ ५ प मारणें, तोडणें. अरि-मारणारा, तोडणारा. आरी-कुऱ्हाड, करवत) म्हणजे तोडवणारा (पहा २७०), हे शब्द, त्याचप्रमाणें 'मार्ग कापणें,' हा शब्दप्रयोग हि हा सर्व इतिहास सांगतो. वेदांत ईश्वर 'स्वधितिर् (कुऱ्हाड) वनानाम् ।' म्हणून गौरविला असून लोकांत तो कुऱ्हाड घेऊन (परशुराम) अवतरला आहे. इतिहासावर ही राजमुद्रा झाली.

विशेषत: ज्यांच्यामुळें वन भयंकर म्हणावयाचें त्या हिंस्र श्वापदांत त्यांच्या क्रौर्यावरून, भयंकरतेवरून प्रतवारी लावायची झाल्यास वाघाला पहिल्या प्रतीचा भयंकर म्हणावें लागेल. म्हणून वाघाचें जंगल सर्वांत मोठें भयस्थान म्हणावयाचें. आधी जंगल हें च भयंकर त्यांत वाघाचें जंगल म्हणजे भयाची सीमा झाली. संशयाला वैयाघ्र्य म्हणण्यांत हा भाव आहे.

शाश्वत-दृष्टि आणि उच्छेद-दृष्टि—ज्यांच्या मतें वस्तुमात्र अनादि आणि अनंत आहे ते शाश्वतवादी होत आणि त्यांचें मत ती शाश्वतदृष्टि. आणि ज्यांच्या मतें मृत्यूबरोबर च ह्या जीवाचा विनाश होतो, ते उच्छेदवादी आणि त्यांचें मत ती उच्छेद-दृष्टि. हीं दोन मतें दोन अंत होत. ह्यांच्या दरम्यानचें तें च बुद्धाचें मध्यम मत. शाश्वत-दृष्टि आणि उच्छेद-दृष्टि हे दोन अंत म्हणजे अंत-स्वरूप, नाश-स्वरूप असल्यामुळें त्यांना दोन (अचूक नेमबाज, तिरंदाज) राजांशीं आणि दोन (गळा धरून कापणाऱ्या) याज्ञिकांशीं उपमित केलें आहे. ह्या तुलनेनें ब्राह्म आणि क्षात्र हिंसेचा उपरोध केला आहे. येथें श्रोत्रिय-शब्दानें बुद्धाचा ब्रह्मविद्येवर आक्षेप आहे काय? कीं केवळ यज्ञीय हिंसेवर? जयदेव कवि बुद्धाचा केवळ यज्ञीय श्रुतींवर आक्षेप समजतो;

'निंदसि यज्ञविधेरहह श्रुतिजातम् ।
सदय–हृदय, दर्शित-पशुघातम् ॥'

—गीतगोविन्दम्

३०४ दुरून दर्शन देणाऱ्या शीतल, उत्तुंग आणि सीमवर्ती हिमाचलाप्रमाणें संत हे संसाराच्या परतीरावर, अचल, शांत आणि उदासीन राहून लोकांना मार्ग दाखवितात.

उलट असंत हे रात्रीं सोडलेला बाण जसा कोणत्या मार्गानें कोठें गेला हें न दिसतां नष्ट होतो, त्याप्रमाणें अविद्येनें भ्रान्त होऊन मार्गदर्शक होत नाहींत, नाश पावतात.

जो स्थिर झाला तो च मार्ग-दर्शन करूं शकतो. जो स्वत: च भटकत आहे तो दुसऱ्याला मार्गदर्शन कसें करील?

३११ कुश नीट हाताळला नाहीं तर तो हातांत शिरून निघतांना (निरयाय) हात चिरतो. तसें श्रामण्य विधिपूर्वक ग्रहण केलें नाहीं तर तें श्रमणदीक्षा घेणाऱ्याला नरकांत (निरयाय) खेंचतें.

श्रामण्य हा पवित्र आणि दुर्धर असा आरण्यक-धर्म असल्यामुळें त्याला अरण्यांतील पवित्र, धारदार आणि धर्मोपयोगी कुशाची, दर्भाची उपमा दिली आहे. निरय-शब्द श्लिष्ट आहे.

३१३ एखादें कर्म दृढ करणें म्हणजे सर्वतोपरी संयम करून करणें आणि शिथिल करणें म्हणजे असंयमपूर्वक करणें. गबाळ वाटसरू (परिव्राजक) चोहोंबाजूंनीं धोतर आवरून कंबर चांगली न कसल्यामुळें जसा धूळ उडवीत चालतो तसा सैल कासोटयाचा भिक्षु (मोक्षमार्गी) आपल्याभोंवतीं पापाची धूळ पसरवीत चालतो.

३१५ 'पर्यंत-नगरी'–सरहद्दीवरील किल्लेवजा गांव. 'क्षण'–(१) निमिष (२) पावन-संधि. जसें–बुद्धांच्या काळीं, वा बुद्धांच्या देशांत, वा बुद्धांचा उपदेश ऐकायला, मनुष्य-जन्म लाभणें. जे अशी संधि गमावतात ते ज्ञानदृष्टीच्या अभावीं दुर्गतीस जाऊन शोक करतात. जे बुद्धांची शिकवण (श्लो. १८३–१८५) ऐकत नाहींत ते दृष्टिहीन जन मार्ग-भ्रष्ट होऊन खड्डयांत पडले वा भिंतीवर आपटून कपाळमोक्ष पावले तर त्यांत नवल कसचें ?

३१६–३१९ मिथ्यादृष्टि म्हणजे अयथार्थ दर्शन. कार्याला अकार्य आणि अकार्याला कार्य त्याचप्रमाणें अभयाला भय आणि भयाला अभय पाहणारे जे अयथार्थदर्शी आंधळे ते च दुर्गतीला जातात. वर्ज्य (म्हणजे टाळायचे जे खड्डे आणि अडथळे) तें वर्ज्य आणि अवर्ज्य (म्हणजे सेव्य जो मार्ग) तें अवर्ज्य समजणारे जे यथार्थदर्शी डोळस ते च सुगतीला म्हणजे च परिणामीं स्वर्गतीला पोंचतात.

३२० नाग हा शब्द श्लिष्ट आहे नाग म्हणजे (१) पर्वताकार प्राणी (न अगः, पर्वताकार पण अचल नव्हे) अर्थात् हत्ती. (२) निरपराध, निष्पाप (न आगः अस्मिन् इति). अग हा शब्द मुळांत स्वतः च नञ्समास

असल्यामुळें त्याचा पुन्हां नञ् करतांना न ला अन् आदेश झाला नाहीं. नाक (क–कल्याण, अक–अकल्याण, न अक–नाक म्हणजे अकल्याणशून्य अर्थात् कल्याणपूर्ण स्वर्ग) हें ह्याचें दुसरें उदाहरण होय. निष्पाप ह्या अर्थानें नाग शब्द असंस्कृत आहे. बुद्धानें श्लिष्टार्थानें अन्यत्र हि तो वापरला आहे. (पहा––बुद्धलीलासारसंग्रह, पृ. १८६.)

जसा कांसव गीतेच्या आदर्शाचें तसा विजनप्रिय, तितिक्षु आणि शिक्षित नाग (हत्ती) हा बौद्ध आदर्शाचें प्रतीक आहे. सिद्धार्थ मायादेवीच्या कुशींत नागरूपानें शिरला होता. म्हणून हि बौद्धांना तो पूज्य आहे. बुद्धाचें एक नांव महानाग असें आहे.

३२२ अश्वतर–खेंचर. सैन्धव आजानेय-सिंधचा जातिवंत घोडा. कुंजर नागेन्द्र–पृथ्वीला हादरवणारा प्रचंड हत्ती. हीं शिकवून विनीत करायला उत्तरोत्तर कठिण आणि श्रेष्ठ तथापि भूमीवर मात्र गति असलेलीं वाहनें होत. परंतु आपलें अंतःकरण हें विनीत करायला ह्या तिहींहून हि कठिण, सर्वोत्तम आणि दिव्य वाहन होय

३२४ विहारमध्यें आज देखील सोनपूर येथें हत्तींचा मोठा बाजार भरतो. बुद्धाच्या काळीं तर हत्ती पुष्कळ च होते. नुकत्या च पकडून आणलेल्या धनपाल नामक हत्तीची हकीकत सांगून बुद्धदेव भिक्षूंना म्हणतो; 'पहा तो हत्ती आपल्या त्या स्वच्छंद विजन-सुखाची सर्वदा चिंता करीत या बंधनपूर्ण ग्राम्य सुखांत मुळीं च रस घेत नाहीं. तुम्ही हि असें च असलें पाहिजे.'

३३४ फळें खाण्याच्या इच्छेनें वानर जसा ह्या झाडावरून त्या झाडावर कुदत रानांत भटकतो तसा भोगतृष्णेमुळें मनुष्य जन्म-जन्मान्तरें घेत संसारांत भ्रमत आहे.

३३७ संधियुक्त बोरूला पूर जसा वर्षोवर्षी मोडतो तसा मार जन्मोजन्मीं जन्ममरणसंधींनीं युक्त होत्सात्या तुम्हांला न मोडो. बोरूच्या उपमेचें हें रहस्य.

३३९ पांच इंद्रियें आणि सहावें मन, त्यांचे सहा विषय आणि त्यांचीं सहा विज्ञानें म्हणजे स्पर्श वा संयोग हे असे एकण अठरा बाह्याभ्यंतर

भेदानें छत्तीस गणले जातात. हे छत्तीस जेव्हां प्रेयाच्या माग सुटतात (स्रवती) तेव्हां रागमूलक संकल्परूप प्रवाह मनुष्याला–संयमरूप द्वीपाचा, प्रवाहांतील रक्षास्थलाचा आश्रय करून आत्महित न पाहणाऱ्या अंध मनुष्याला–वाहून नेतात.

३४० चोहों बाजूंना पसरणारें पाणी अडवायचें असेल किंवा फैलणारी वेली खुंटवायची असेल तर झरा च बंद केला पाहिजे, मूळ च उपटलें पाहिजे.

३४२ दोरीनें बांधलेला ससा जसा दोरीच्या मागोमाग फिरत राहतो तसा हा सारा जीवलोक तृष्णा नेईल तिकडे बांधलेल्या पशूप्रमाणें परवश फिरत आहे ! तृष्णापूर्वक म्हणजे तृष्णानीत.

३४४ वन हा शब्द श्लिष्ट आहे. (१) वासना (२) अरण्य. जो गृहस्थ लहान मोठ्या सर्व कामना सोडून वनस्थ झाला आणि पुन्हां वन सोडून गृहस्थ होतो तो दुरात्मा अरेरे, निसटून परत जाळ्यांत शिरत आहे !

३५२ निरुक्ति-कोविद म्हणजे अक्षरांचा संनिपात अर्थात् शब्द कोणत्या धातूपासून कोणत्या अर्थानें सिद्ध केला आहे हें जाणणारा. पद-कोविद म्हणजे धातूला वा प्रातिपदिकाला कोणकोणते उपसर्ग आणि प्रत्यय (पूर्वापराणि) लावून पद सिद्ध केलें आहे तें जाणणारा. अर्थात् शब्दांचें विश्लेपण आणि एकीकरण दोन्ही जाणणारा.

जो 'शाब्दे परे च' निष्णात तो च पदज्ञ कवि. येथें त्याला च महाप्रज्ञ महापुरुष म्हटलें आहे. धम्मपदकार हे असे पदज्ञ कवि होते हें पदोपदीं प्रत्ययास येतें. सबंध धम्मपद च, तत्रापि धर्मस्थ-वर्ग विशेषत:, त्यांच्या पदज्ञतेचा उत्कृष्ट नमुना आहे.

३५३ यांत बुद्ध 'आपण कोणाचे शिष्य ?' या (उपक श्रमणाच्या) प्रश्नाला उत्तर देत आहे. आपण स्वयंप्रज्ञ असून कोणाचे हि शिष्य नाहीं अर्थात् विनायक आहों, शास्ता आहों असें सांगत आहे. विनायक आणि शास्ता हीं बुद्धाचीं खास नांवें आहेत. पहा;

'षडभिज्ञो दशबलो ऽद्वयवादी विनायकः ।
मुनीन्द्रः श्रीघनः शास्ता ।'--अमर.

यावरून गौतमबुद्धपूर्व बुद्धपरंपरेची कल्पना निर्मूल आणि उसनी असल्याचें स्पष्ट दिसून येतें.

३५६ न शालेस्तंबकरिता वप्तुर्गुणमपेक्षते । त्यासाठीं उत्तम कसलेलें शेत लागतें बुद्ध तें शेत म्हणजे निर्विकार सत्पुरुष होत आणि विपुल पुण्य-फल हवें असल्यास तेथें च दान पेरा हें सांगत आहे

३६९ संसार अफाट सागर आहे मर्त्य-जीवन ही नाव आहे. राग-द्वेष तिचा वुडवा मलभार आहे. तो धुऊन टाकल्यास नाव हलकी होऊन तळ न गांठतां जलद पार गांठील. म्हणून भगवान् म्हणत आहेत; 'नाविका, धू, आपली नाव धू !'

३७० पहिलीं पांच संयोजनें तोड आणि पुढलीं पांच सोड. श्रद्धा, स्मृति, वीर्य, समाधि आणि प्रज्ञा हीं पांच जोडून आणि पांच स्कंधांची आसक्ति सोडून काम, भव, दृष्टि व अविद्या हे ओघ तरून जा.

३८४ शमथ म्हणजे समाधि आणि विपश्यना म्हणजे प्रज्ञा हे दोन धर्म होत. शील हें दोहोंचें हि उपान्त्य पद होय. श्रद्धा ही ह्या सर्वांचें मूळ आणि निर्वाण हें फळ होय श्रद्धा, शील, समाधि आणि प्रज्ञा ही बुद्धधर्माची चतुष्पदी होय. (श्लो. ३७२ पहा.)

३८६ पार म्हणजे पलीकडील तीर आणि अपार म्हणजे अलीकडील तीर हे दोन्ही अंत (श्लोक २९५ ची टिप्पणी पहा) टाळून जो मध्य स्रोतानें, मार्गानें, आपली नाव वल्हवतो तो मध्यमार्गावलंबी होय. आणि म्हणून च तो निर्भय. तो जेव्हां दहा हि संयोजनें तोडून टाकतो तेव्हां च विसंयुक्त अर्थात् बंधमुक्त होतो, विमुक्त होतो.

३८७ येथें सूर्य, चंद्र, योद्धा आणि ध्यानी हे अनुक्रमें दिवस, रात्र, जन आणि विजन यांचें उपलक्षण मात्र होय. ह्यांचें राजत्व त्या त्या काळीं आणि त्या त्या स्थळीं मात्र पहावें. अन्यत्र ते फिके पडतात. परंतु बुद्धाचें

तसें नाहीं. त्याचें राजत्व सर्वदा आणि सर्वत्र अप्रतिहत आहे त्याचा महिमा असीम आणि अनंत आहे तो दिक्कालातीत आहे.

३८८ येथें पापें बहिष्कृत करणारा तो ब्राह्मण, शमधर्मानें (समत्वानें ?) चालणारा तो श्रमण, आणि आपला मळ देशोधडीस लावणारा तो परिव्राजक, अशा निरुक्ति दिल्या आहेत.

३८९ येथें 'खवळूं नये' हा मूळ 'न मुञ्चेथ' चा अनुवाद आहे. रक्ष् आणि मुच् हे धातु मुळांत विरुद्धार्थवाची म्हणून योजले आहेत. राखणें म्हणजे विकार बाहेर पडूं न देणें आणि सोडणें म्हणजे विकार बाहेर पडूं देणें. 'न मुञ्चेथ' आणि 'राखा रे चित्त आपुलें' या दोहोंचा अर्थ एक च: आपलें चित्त विकारी होऊं देऊं नका.

३९५ ह्याचा अर्थ घर, शरीर आणि वस्त्रें ह्या विषयीं अनास्थ, अनासक्त, इतका च घ्यावयाचा. कारण बुद्धाला एकान्तिक मार्ग मान्य नाहीं. त्याचा मार्ग भोगवाद आणि त्यागवाद हे दोन अंत टाळणारा मध्यस्थ मार्ग आहे, योगमार्ग आहे.

'येनकेनचिदाच्छन्नो येनकेनचिदाशित:
यत्रक्वचनशायी च तं देवा ब्राह्मणं विदु: ।।'

हा महाभारतांतील श्लोक आणि प्रस्तुत श्लोक समानार्थक च होत.

३९६ भोवादी म्हणजे 'अमुकशर्माहं भो:' अशा पद्धतीनें आपला नामनिर्देश करणारा. ब्राह्मणांत ही रीति होती म्हणून त्यांना भोवादी णावयाचें. अर्थात् भोवादी म्हणजे नामधारी. ब्राह्मण सकिंचन म्हणजे सधन आणि म्हणून समल असल्यास तो नामधारी म्हणावयाचा. कारण नि:स्पृहता आणि अपरिग्रह हें ब्राह्मण्याचें कवच होय. म्हटलें च आहे:—

'यो ऽर्थे शुचि: स हि शुचि र् न मृद्वारिशुचि: शुचि: ।'

३९८ येथें जागृत झालेल्या पुरुषर्षभाचें वर्णन केलें आहे. कसा पुरुषर्षभ ? तर जो प्रथम आपलें दोराचें दावें, नंतर त्याहून मजबूत असें वरात म्हणजे चामड्याचें दावें आणि तदनंतर सर्वांत मजबूत असें लोखंडाचें

दावें अर्थात् सांखळी तोडून सरतेशेवटीं कुंपण देखील मोडून पसार झाला आहे असा. या रूपकांत दावें = वैर, वरात = तृष्णा, सांखळी = दृष्टि आणि कुंपण = अविद्या होय.

४०४ 'गृही...वेगळा' म्हणजे ज्यानें गृह किंवा वन कशाचा च आश्रय केला नाहीं असा केवळ स्वाश्रयी.

४१४ 'विमार्ग'--आडवाट, वन्यमार्ग. संसार ही आडवाट होय. धर्म हाच उजू मार्ग. 'त्यागें निर्वृत' हें 'अनुपादाय निब्बुतो'चें भाषांतर आहे. अनुपादाय म्हणजे संसाराचें उपादान, घटक द्रव्य, जे संस्कार, वासना, त्यांच्या त्यागानें. 'विसंस्कार' हें निर्वाणाचें नामांतर होय.

पहा—(१) 'विसंखारगतं चित्तं' श्लो. १५४. (२) श्लो. ३८३.

४१७ योग = बंध. बंध या अर्थी योग, संयोग, संयोजन हे शब्द वापरले असल्यामुळें अनेकदा विनिर्मुक्त या अर्थी विसंयुक्त शब्द वापरला आहे.

४२२ वृषा = श्रेष्ठ, धर्मिष्ठ, धर्मराज. विजितारि = मारजित्. स्नात = उत्तीर्ण.

४२३ पूर्व आवास जाणणें म्हणजे जन्मान्तरज्ञान असणें. अभिज्ञा म्हणजे दिव्य ज्ञान.

तसें नाहीं. त्याचें राजत्व सर्वदा आणि सर्वत्र अप्रतिहत आहे त्याचा महिमा असीम आणि अनंत आहे. तो दिक्कालातीत आहे.

३८८ येथें पापें बहिष्कृत करणारा तो ब्राह्मण, शमधर्मानें (समत्वानें ?) चालणारा तो श्रमण, आणि आपला मळ देशोधडीस लावणारा तो परिव्राजक, अशा निरुक्ति दिल्या आहेत.

३८९ येथें 'खवळूं नये' हा मूळ 'न मुञ्चेथ' चा अनुवाद आहे. रक्ष् आणि मुच् हे धातु मुळांत विरुद्धार्थवाची म्हणून योजले आहेत. राखणें म्हणजे विकार बाहेर पडूं न देणें आणि सोडणें म्हणजे विकार बाहेर पडूं देणें. 'न मुञ्चेथ' आणि 'राखा रे चित्त आपुलें' या दोहोंचा अर्थ एक च. आपलें चित्त विकारी होऊं देऊं नका.

३९५ ह्याचा अर्थ घर, शरीर आणि वस्त्रें ह्या विषयीं अनास्थ, अनासक्त, इतका च घ्यावयाचा. कारण बुद्धाला एकान्तिक मार्ग मान्य नाहीं. त्याचा मार्ग भोगवाद आणि त्यागवाद हे दोन अंत टाळणारा मध्यस्थ मार्ग आहे, योगमार्ग आहे.

'येनकेनचिदाच्छन्नो येनकेनचिदाशितः
यत्रक्वचनशायी च तं देवा ब्राह्मणं विदुः ॥'

हा महाभारतांतील श्लोक आणि प्रस्तुत श्लोक समानार्थक च होत.

३९६ भोवादी म्हणजे 'अमुकशर्माहं भोः' अशा पद्धतीनें आपला नामनिर्देश करणारा. ब्राह्मणांत ही रीति होती म्हणून त्यांना भोवादी म्हणावयाचें. अर्थात् भोवादी म्हणजे नामधारी. ब्राह्मण सकिंचन म्हणजे सधन आणि म्हणून समल असल्यास तो नामधारी म्हणावयाचा. कारण निःस्पृहता आणि अपरिग्रह हें ब्राह्मण्याचें कवच होय. म्हटलें च आहे:—

'यो ऽर्थे शुचिः स हि शुचि र् न मृद्वारिशुचिः शुचिः ।'

३९८ येथें जागृत झालेल्या पुरुषर्षभाचें वर्णन केलें आहे. कसा पुरुषर्षभ ? तर जो प्रथम आपलें दोराचें दावें, नंतर त्याहून मजबूत असें वरात म्हणजे चामड्याचें दावें आणि तदनंतर सर्वांत मजबूत असें लोखंडाचें

दावें अर्थात् सांखळी तोडून सरतेशेवटीं कुंपण देखील मोडून पसार झाला आहे असा. या रूपकांत दावें = वैर, वरात = तृष्णा, सांखळी = दृष्टि आणि कुंपण = अविद्या होय.

४०४ 'गृही...वेगळा' म्हणजे ज्यानें गृह किंवा वन कशाचा च आश्रय केला नाहीं असा केवळ स्वाश्रयी.

४१४ 'विमार्ग'--आडवाट, वन्यमार्ग. संसार ही आडवाट होय. धर्म हाच उजू मार्ग. 'त्यागें निर्वृत' हें 'अनुपादाय निब्बुतो'चें भाषांतर आहे. अनुपादाय म्हणजे संसाराचें उपादान, घटक द्रव्य, जे संस्कार, वासना, त्यांच्या त्यागानें. 'विसंस्कार' हें निर्वाणाचें नामांतर होय.

पहा--(१) 'विसंखारगतं चित्तं' श्लो. १५४. (२) श्लो. ३८३.

४१७ योग = बंध. बंध या अर्थीं योग, संयोग, संयोजन हे शब्द वापरले असल्यामुळें अनेकदा विनिर्मुक्त या अर्थीं विसंयुक्त शब्द वापरला आहे.

४२२ वृषा = श्रेष्ठ, धर्मिष्ठ, धर्मराज. विजितारि = मारजित्. स्नात = उत्तीर्ण.

४२३ पूर्व आवास जाणणें म्हणजे जन्मान्तरज्ञान असणें. अभिज्ञा म्हणजे दिव्य ज्ञान.

# परिभाषा

**अकिंचन**—राग-द्वेष-मोह-शून्य.

**अकृत-ज्ञ**—कृत म्हणजे केलेलें, कार्यकारणभावरूप. जें कृत नाहीं तें अकृत, अर्थात् निर्वाण. त्याला जाणणारा तो अकृत-ज्ञ.

**अमृत**—मोक्ष, निर्वाण.

**अशुभदृष्टि**—देहांत अस्थि-चर्म, रक्त-मांस, मूत्र-पुरीष इत्यादि घाण पाहून देहमात्राविषयीं विरक्त होणारा. अर्थात् रूपादिमोहित न होणारा. ह्याउलट रूपादिमोहित होणारा तो **शुभदृष्टि**.

**अविद्या** - अयथार्थ ज्ञान. ह्याचे प्रकार तीन:–(१) जग अनित्य म्हणजे रूपांतर पावणारें असतां तें नित्य मानणें, (२) आत्मा म्हणून अविनाशी अविकारी पदार्थ नसतां तो आहे असें मानणें. आणि (३) संसार दुःखमय असतां त्यांत च सर्व सुख आहे असें मानणें हें त्रिविध अयथार्थ ज्ञान सर्व संसारदुःखाचें मूळ आहे.

**अर्हंत** - जीवन्मुक्त. ज्याच्या दहा हि संयोजनांचा नाश झाला आहे असा आर्य.

**अष्टांग मार्ग**—**आर्यसत्यें** पहा.

**आत्मा**—आपण, देह आणि चित्त, अंतःकरणें.

**आयतनें**—डोळा, कान, नाक, जीभ, त्वचा आणि मन हीं सहा.

**आर्य**—मार्गारूढ, बुद्ध-श्रावक. हे चतुर्विध आहेत; स्रोतापन्न, सकृदागामी, अनागामी आणि अर्हत्. ह्या सर्वांना आर्यजन म्हणतात; इतरांना पृथग्जन. **संयोजन** शब्द पहा.

**आर्य-सत्यें**—दुःख, दुःख-समुदय, दुःख-निरोध आणि दुःख-निरोध-गामिनी प्रतिपदा हीं चार आर्य-सत्यें होत. बुद्धधर्माचा हा मूलाधार जन्म, जरा, व्याधि, मरण, अप्रियाचा योग, प्रियाचा वियोग, अनिष्टाची प्राप्ति आणि इष्टाची अप्राप्ति हें दुःख होय. पुनःपुन्हां उत्पन्न होणारी व सर्वत्र

आसक्ति उत्पन्न करणारी तृष्णा हा दुःखसमुदय अर्थात् दुःखमूळ होय. वैराग्य अर्थात् अशेष वैराग्यानें तृष्णा निःशेष करणें हा दुःखनिरोध होय. आणि सम्यक् दृष्टि, सम्यक् संकल्प, सम्यक् वाचा, सम्यक् कर्म, सम्यक् आजीव, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृति आणि सम्यक् समाधि हा आर्य आष्टांगिक मार्ग दुःखनिरोधगामिनी प्रतिपदा अर्थात् दुःखनिरोध करण्याचा खरा उपाय होय.

**आस्रव**—मल, दोष क्लेश. ( शब्दार्थ – प्रवाह, ओघ अर्थात् बाह्य आणि नीच प्रवृत्ति). हे चतुर्विध आहेत. (१) काम – ऐहिक भोग्यवस्तूची स्पृहा, (२) भव – पारलौकिक वासना, (३) दृष्टि – दुराग्रह, पंथाभिमान आणि (४) अविद्या – अयथार्थ ज्ञान. ह्यांना च ओघ असें हि नांव आहे.

**उपादान**—दृढमूल तृष्णा.

**उपाधि**—स्कंध, काम, क्लेश आणि कर्म.

**ऊर्ध्वस्रोत**—अनागामी आर्य. **संयोजन** शब्द पहा.

**ओघ**—आस्रव, पूर; वाहून नेणाऱ्या, बुडविणाऱ्या तृष्णा.

**कामगुण**—पंचेन्द्रियांचे विषय.

**कायगता स्मृति**—कायेच्या अमंगलतेचें स्मरण, अशुभ-भावना. आपल्या देहांत मलमूत्रादि घाण पाहून त्याविषयीं विरक्त होण्याचा अभ्यास.

**कुशल**—दहा अकुशल कर्मांपासून निवृत्त होण्यास दहा कुशल कर्म म्हणतात. ज्यांपासून निवृत्त व्हायचें तीं दहा अकुशल कर्में:–१ प्राणघात, २ अदत्तादान, ३ व्यभिचार, ४ असत्य भाषण, ५ चहाडी, ६ कठोर भाषण, ७ व्यर्थ बडबड, ८ परद्रव्यासक्ति, ९ क्रोध आणि १० नास्तिकता म्हणजे शीलपालनांत अर्थ नाहीं इत्यादि धर्मबाह्य विचार. ह्यांपैकीं पहिलीं तीन कायिक, मधलीं चार वाचिक, आणि शेवटचीं तीन मानसिक पापें होत. ह्यांना च दश अकुशल-कर्मपथ म्हणतात.

**क्षण**—संधि, योग. मनुष्यत्व हा क्षण होय. कारण तेथें निर्वाण मिळविणें शक्य आहे. पशुत्व हा अक्षण होय. कारण तेथें निर्वाण मिळविणें संभवनीय नाहीं.

**ग्रंथि**—ग्रंथि चतुर्विध आहेत :—(१) अभिध्या – परद्रव्यासक्ति. (२) व्यापाद – परद्वेष. (३) शीलव्रतपरामर्श – व्रतोपवासांनीं मोक्ष मिळतो अशी समजूत. (४) इदंसत्याभिनिवेश – मी म्हणतों तेंच खरें असा दुराग्रह.

**जाति**—प्राय: जन्म असा अर्थ होतो; क्वचित् जात.

**तृष्णा**—ही त्रिविध आहे: (१) कामतृष्णा – ऐहिक भोगेच्छा (२) भवतृष्णा – पारलौकिक भोगेच्छा (३) विभवतृष्णा – नाहींसें होण्याची इच्छा.

**धर्म**—बुद्धधर्माचा हा पारिभाषिक शब्द आहे. ह्याचा अर्थ आहे कार्य-कारण-भाव. धत्त इति धर्मः कारणम् । ध्रियत इति धर्मः कार्यं च । धर्म शब्द अशा दुहेरी प्रकारें व्युत्पादिला जातो. अर्थात् धर्म म्हणजे नामरूपात्मक पदार्थमात्र. लौकिक अर्थानीं हि तो आलेला आहे.

**नामरूप**—पंचस्कंधात्मक; स्कंध शब्द पहा.

**निर्वाण**—परम पद, सर्वोत्तम जीवन.

**प्रज्ञा**—ज्ञानशक्ति, निर्वाणप्रापक बुद्धि.

**प्रमाद**—भुलणें, विषय-ध्यान, मार्ग-भ्रंश.

**प्रातिमोक्ष**—भिक्षूंनीं आचरावयाच्या नियमांचा संग्रह.

**प्रीति**—स्वार्थामुळें पुत्रमित्रादिकांविषयीं वाटणारी जी मायाममता तिचें नांव प्रेम वा स्नेह. प्रीति ह्याहून वेगळी आहे ती निरपेक्ष असते. निष्काम भावांतून उत्पन्न होणारा प्रमोद हें तिचें स्वरूप आहे.

**भव**—दृष्टादृष्ट लोकांत जन्मणें, संसार, प्रपंच.

**भावना**-एखाद्या वस्तूचें वारंवार चिंतन करणें.

**मान**—अभिमान, (Complex). हा त्रिविध आहे: (१) मी श्रेष्ठ आहें, (२) मी बरोबरीचा आहें आणि (३) मी हीन आहें.

**मार**—ब्रह्मचर्याचा वैरी, प्रमादाचा जनक, काम.

**मिथ्यादृष्टि**—दानधर्म सब झूट आहे– व्यर्थ आहे, न सत्कर्मांचें फळ चांगलें होतें, न असत्कर्मांचें वाईट, इत्यादि नास्तिक विचार.

**मिथ्यासंकल्प**—हा त्रिविध आहे: (१) **कामसंकल्प** – काम विचार (२) **व्यापादसंकल्प** – दुसऱ्याचें अहित, हानि, चिंतणें. आणि

(३) **विहिंसासंकल्प**–बुद्धया नव्हे तर चापल्यानें आपल्याला अथवा दुसऱ्याला पीडा देणें. उपद्रव करणें.

**विज्ञान** सामान्य अर्थ चित्त, चित्तक्रिया. विशेष अर्थ वेदना-संज्ञा-संस्कारादि-रहित चित्तक्रिया.

**वितर्क**--मिथ्यासंकल्प.

**विवेक**--विविक्त स्थान, एकान्त.

**वीर्य**--मनोबल, सत्कर्माविषयीं मानसिक उत्साह.

**शयनासन**--भिक्षूच्या मुक्कामाचें कोणतें हि स्थळ.

**शील**--आचार.

**शुभदृष्टि**—**अशुभ-दृष्टि** पहा.

**शैक्ष**--शिक्षणास पात्र स्रोतापन्न, सकृदागामी आणि अनागामी हे शिक्षेस म्हणजे शिक्षणास योग्य होत. ह्यांची साधारण संज्ञा शैक्ष.

**संयोजन**--ह्याचा मूळ अर्थ बंधन संसारचक्राला जखडून ठेवतें म्हणून बंधन. हीं संयोजनें दहा आहेत : **१ सत्कायदृष्टि**–आत्मा वेगळा पदार्थ आहे आणि तो नित्य आहे अशी मति. **२ विचिकित्सा**–बुद्ध, धर्म आणि संघ ह्यांविषयीं अविश्वास. **३ शीलव्रतपरामर्श** -स्नानादि व्रतांनीं च मुक्ति मिळते असा विश्वास. **४ कामराग**–कामवासना **५ व्यापाद** वा **प्रतिघ**–क्रोध. **६ रूपराग**–ब्रह्मलोकींची भोगेच्छा. **७ अरूपराग**–रूपातीत लोकींची भोगेच्छा. **८ मान** अहंकार. **९ औद्धत्य**–भ्रांतचित्तता. **१० अविद्या.** ह्यांतील पहिलीं पांच अवरभागी आणि शेवटलीं पांच ऊर्ध्वभागी संयोजनें म्हटलीं जातात. पहिलीं तीन संयोजनें नष्ट केलीं असतां साधक **स्रोतापन्न** अर्थात् धर्ममार्गारूढ म्हणजे बुद्धधर्माचा अधिकारी होतो. पुढील दान म्हणजे ४ व ५ हीं संयोजनें **क्षीण** केल्यानें तो **सकृदागामी** होतो अर्थात् मोक्षासाठीं संसारांत त्याला फिरून एकदां च जन्म घ्यावा लागतो हीं पहिलीं पांच अवरभागी संयोजनें **संपूर्ण नाश पावलीं**, म्हणजे साधक **अनागामी** होतो अर्थात् निर्वाणासाठीं त्याला ह्या संसारांत फिरून यावें

लागत नाहीं. आणि ह्या दहा हि संयोजनांचा क्षय झाला म्हणजे साधक अर्हत् अर्थात् जीवन्मुक्त होतो.

**संस्कार**--**स्कंध** पहा.

**समाधि**—चित्तशान्ति. समाधि चतुर्ध्यानात्मक आहे. चतुर्थ ध्यान ही च खरी समाधि असून पूर्वींचीं ध्यानें तिच्या पायऱ्या होत. चतुर्थ ध्यानांत अर्थात् उत्तम समाधींत एकाग्रता आणि उपेक्षा हीं दोन च अंगें असतात.

**संबोध्यंगें**—ज्ञानाचीं अंगें. हीं सात आहेत. १ **स्मृति**, २ **धर्म-प्रविचय**–मनोवृत्तींचें पृथक्करण करण्याचें सामर्थ्य अथवा प्रज्ञा, ३ **वीर्य**, ४ **प्रीति**–सत्कर्मापासून मिळणारा प्रमोद, आनंद, ५ **प्रश्रब्धि**–चित्तशान्ति, चित्तसुख, ६ **समाधि**–चित्तैकाग्रता, ७ **उपेक्षा**–चित्ताची मध्यमावस्था. ह्यांच्या भावनेनें काम, क्रोध, आळस, भ्रांतता, आणि संशय हीं जीं चित्ताचीं पांच आवरणें त्यांचा निरास होतो.

**स्कंध**—हे पांच आहेत: १ **रूपस्कंध**—ह्यांत पृथ्वी, आप, तेज आणि वायु ह्या चार महाभूतांचा समावेश होतो २ **वेदनास्कंध**–सुखवेदना, दुःखवेदना आणि उपेक्षावेदना, असा त्रिविध. ३ **संज्ञास्कंध**–घर, घोडा, निद्रा, स्वप्न इत्यादि मूर्त आणि अमूर्त पदार्थांना वेगवेगळीं नांवें देणारी शक्ति म्हणजे संज्ञास्कंध ४ **संस्कारस्कंध**–हा त्रिविध आहे;–(अ) कुशल संस्कार–दया, प्रेम इत्यादि. (आ) अकुशलसंस्कार–हिंसा, द्वेष इत्यादि. (इ) अव्याकृत संस्कार–एखाद्या वस्तूची आवड अथवा एखादें कार्य करण्याची शक्ति. ५ **विज्ञानस्कंध**–चक्षुर्विज्ञान, श्रोत्रविज्ञान, घ्राणविज्ञान, जिह्वाविज्ञान, कायविज्ञान, (स्पर्शविज्ञान) आणि मनोविज्ञान हीं षड्विध विज्ञानें हा विज्ञानस्कंध होय.

**स्रोतापत्ति**--स्रोतापन्न होणें. **संयोजन** शब्द पहा.

# उपमा आणि दृष्टांत

**अंक श्लोक दर्शवितात.**


अग्नि ३१
आभास्वर सुर २००
आयस मळ २४०
आरी ४०१
इंद्रकील ९५
कळक १६४
कांसे १३४
कुमुद २८५
कूटस्थ २८
क्रौंच १५५
क्षमा (पृथ्वी) ९५
गुराखी १९
घट ३९
घर १३
घोडे ९४
चाक १
चाप १५६
छाया २
जलजीव ३४
जलबिंदुनिपात १२१
जांबूनदनिष्क २३०
झाड ७
तुंबिनीफळें १४९
तुलाहस्त २६८
दर्भ ३११
दूध ७१
द्वीप २३८
धन २६
धूळ १२५
धूर्त २५२
नक्षत्रपथ २०८
नाग (हत्ती) ३२०
निधिवाचक ७६
पद्म ३३६
पर्वत ८
पळी ६४
पर्यंतनगरी ३१५
पल्वल ९१
प्लवंग ३३४
पुष्प ४४
पूर ४७
प्राकार ३९
फेस ४६
बलिवर्द १५२
बाणकार ३३
बाहुला ४१
बुडबुडा १७०
बोरू ३३७
भूस २५२
भ्रमर ४९
मधु ६९
माळी ८०
मालुलता १६२
मृगतृष्णा ४६
यूथिका ३७०
रथ १५१
रसना ६५
राई ४०१
लोहगोळ ३७१
वज्र १६१
वणिक् १२३
वराह ३२५
वाळा ३३५
विधु १७३
विहंग ९१
शर ३०४
शीघ्राश्व ३०
शैल ८१
सरोवर ८२
ससा ३४२
सुतार ८०
सोनार २३९
स्तनंधय २८४
स्थलपद्म ५८
हंस ९१
हिमवंत ३०४
हुताग्नि ३९२
हृद ९५

# त्रिपिटक ग्रंथ

त्रिपिटक हा पालिभाषेंतील मुख्य ग्रंथ होय. हा महाभारत ग्रंथाच्या तिप्पटीनें मोठा आहे. म्हणजे याची ग्रंथसंख्या सरासरी तीन लक्ष आहे. सुत्तपिटक, विनयपिटक, आणि अभिधम्मपिटक असे याचे मुख्य तीन भेद आहेत. त्यांचे पोटभेद खालीं दिल्या प्रमाणें:—

## सुत्तपिटक

१. दीघनिकाय २ मज्झिमनिकाय ३ संयुत्तनिकाय ४ अंगुत्तरनिकाय ५ खुद्दकनिकाय.

सुत्तपिटकाचे हे पांच मुख्य भाग यांपैकीं खुद्दकनिकायाचे पुनः १५ पोट विभाग आहेत, ते हे :—

१. खुद्दकपाठ २. धम्मपद ३ उदान ४. इतिवुत्तक ५ सुत्तनिपात ६. विमानवुत्थु ७. पेतवत्थु ८. थेरगाथा ९. थेरीगाथा १०. जातक ११. निद्देस १२. पटिसंभिदामग्ग १३. अपदान १४. वुद्धवंश १५. चरियापिटक.

विनयपिटकाचे पांच भाग आहेत, ते हे :—

१. पाराजिका २. पाचित्तियादि ३. महावग्ग ४. चुल्लवग्ग ५. परिवारपाठ.

अभिधम्मपिटकांत सात प्रकरणें आहेत, तीं हीं—

१. धम्मसंगणि २. विभंग ३ धातुकथा ४. पुग्गलपञ्ञत्ति ५. कथा-वत्थु ६. यमक ७. पट्ठान.

या त्रिपिटक ग्रंथावर सिंहल भाषेंत टीका लिहिल्या होत्या. त्यांना अट्ठकथा (अर्थकथा) असें म्हणत. इसवी सनाच्या पांचव्या शतकाच्या आरंभीं वुद्धघोषाचार्यानें या अट्ठकथांचें पालिभाषेंत रूपांतर केलें. दीघनिकायादि चार निकायांच्या अट्ठकथांच्या आरंभीं प्रस्तावनेंत खालील गाथा आढळतात :—

सीहलदीपं पन आभथाथ वसिना महामहिन्देन ।
ठपिता सीहलभासायं दीपवासिनमत्थाय ।।
अपमेत्वान ततोहं सीहलभासं मनोरमं भासं ।
तन्तिनयानुच्छविकं आरोपेन्तो विगतदोसं ।।

(ही अट्ठकथा) महामहिन्दानें सिंहलद्वीपास आणली, आणि (या) द्वीपवासी जनांच्या हितासाठीं सिंहलभाषेंत लिहून ठेविली. ती सिंहलभाषेंतून काढून मनोरम आणि शास्त्रास अनुकूल अशा निर्दोष पालिभाषेंत ठेवतों. ह्या अट्ठकथांचीं नांवें येणें प्रमाणें:--

१. दीघनिकाय अट्ठकथा – सुमंगलविलासिनी.
२. मज्झिमनिकाय अट्ठकथा – पपंचसूदनी.
३. संयुत्तनिकाय अट्ठकथा – सारत्थप्पकासिनी.
४. अंगुत्तरनिकाय अट्ठकथा – मनोरथपूरणी.
५. विनय अट्ठकथा – समंतपासादिका.
६. धम्मसंगणि अट्ठकथा – अट्ठसालिनी.
७ विभंग अट्ठकथा – संमोहविनोदनी
८. धातुकथा, पुग्गलपञ्ञत्ति, कथावत्थु, यमक व पठ्ठान या पांच प्रकरणांची अट्ठकथा - पंचप्पकरण अट्ठकथा.

खुद्दकनिकायांतील प्रकरणांवर निरनिराळ्या आचार्यांनीं अट्ठकथा लिहिल्या आहेत.

सुत्तपिटकांत विशेषत: बुद्ध आणि बुद्धाचे प्रमुख शिष्य यांच्या उपदेशाचा संग्रह केला आहे; विनयपिटकांत भिक्षूंनीं पाळण्याच्या नियमांचा संग्रह केला आहे, आणि अभिधम्मपिटकांत बौद्ध तत्त्वज्ञानाचा विस्तारानें विचार केला आहे.

# चार आर्य सत्यें आणि अष्टांगिक मार्ग

चतुन्नं अरियसच्चानं यथाभूतं अदस्सना ।
संसरितं दीघमद्धानं तासु तास्वेव जातिसु ॥
तानि एतानि दिट्ठानि भवनेत्ति समूहता ।
उच्छिन्नमूलं दुक्खस्स नत्थि दानि पुनब्भवो ॥

चार आर्य सत्यांचें यथाभूत ज्ञान न झाल्यामुळें दीर्घ काळपर्यंत त्या त्या योनींत जन्मलों. परंतु आतां या सत्यांचें ज्ञान झालें; व त्यामुळें तृष्णेचा नाश झाला. दुःखाचें मूळ समूळ नष्ट झालें. आतां आणखी पुनर्जन्म राहिला नाहीं. (महापरिनिब्बाण सुत्त)

त्रिपिटकांत चार आर्य सत्यांचा उल्लेख अनेक ठिकाणीं आलेला आहे. हीं चार आर्य सत्यें बौद्धधर्माचा पाया आहेत असें म्हटलें असतां चालेल. बुद्ध भगवंतानें प्रथमतः वाराणसींत पंचवर्गीय भिक्षूंना या चार आर्य सत्यांचाच उपदेश केला. या उपदेशाची अनेक सुत्तांतून विस्तृत व्याख्या केली आहे. अट्ठकथाकारांनींहि यावर विस्तारानें टिका लिहिली आहे. या आर्य सत्यांचा वाचक-वर्गास विशेष बोध व्हावा म्हणून इतर सुत्तांतील वर्णनाच्या आधारें थोडा विस्तार करीत आहों.

**दुःख**— दुःख हें पहिलें आर्य सत्य. या जगांत दुःख आहे हें मनुष्यानें प्रथमतः जाणलें पाहिजे ज्याला दुःख काय आहे हें ठाऊक नाहीं, त्याची बुद्धि धर्माकडे वळणें कठीण. या प्रपंचांत दुःख आहे असें वाटल्या-वरूनच सर्व पंथांच्या लोकांना परधर्माविषयीं प्रयत्न करण्याची वुद्धि होते. दुःख कोणतें ? जन्म दुःखकारक म्हणजे मूल जन्मतांच दुःख बरोबर घेऊन येतें. म्हतारपणहि दुःखकारक; मरतेवेळींहि प्राण्याला दुःख होतें या आयुष्यामध्यें शोकाचे अनेक प्रसंग येतात. तेहि दुःखकारक; अप्रियांचा योग किंवा प्रियांचा वियोग झाला, तरी तो दुःखकारक होतो. एखाद्या

वस्तूची इच्छा करून ती न मिळाली म्हणजे त्यापासूनहि दुःख होतें. संक्षेपानें सांगावयाचें म्हटलें म्हणजे पांच उपादान स्कंध (वासनायुक्त स्कंध) हे दुःख-कारक आहेत. याप्रमाणें धार्मिक मनुष्यानें दुःखसत्याचें ज्ञान संपादिलें पाहिजे.

**दुःखसमुदयः**—या सगळ्या दुःखाचें कारण काय? कोणी म्हणतात, दुःख हा आत्म्याचा धर्म आहे; कोणी म्हणतात दुःख जगताच्या कर्त्यानें, किंवा आपणाहून भिन्न अशा कोणत्यातरी व्यक्तीनें उत्पन्न केलें असावें. परंतु बुद्ध भगवान् म्हणतो, दुःख हा आत्म्याचा धर्म नव्हे किंवा तें दुसऱ्या कोणीं तरी उत्पन्न केलें आहे असेंहि नव्हे, तर तें कार्यकारणनियमानें उत्पन्न झालें आहे. तृष्णा आहे, म्हणून दुःख आहे. तृष्णा नाहीं तर दुःखहि नाहीं. तृष्णा म्हणजे अतृप्ति. ती तीन प्रकारची. कामतृष्णा, भवतृष्णा आणि विभवतृष्णा. कामतृष्णा म्हणजे चैनीच्या पदार्थांची तृष्णा. या तृष्णेपासून जगाच्या दुःखांत मोठी भर पडली आहे. "कामतृष्णेनें क्षत्रिय क्षत्रियांबरोबर भांडतात, ब्राह्मण ब्राह्मणांबरोबर भांडतात, आणि आप्त आप्तांबरोबर भांडतात. या चैनीसाठींच हीं सारीं भांडणें होतात" बरें भांडण करून एखाद्यानें चैनीच्या पदार्थांचा मोठा वांटा मिळविला, तरी त्यापासून त्याला सुख होत नाहीं.

अबला नं बलीयन्ति महन्ते नं परिस्सया।
ततो नं दुःखमन्वेति भिन्नं नावमिवोदकं॥

दुर्बल लोक त्याचा मत्सर करितात. कामक्रोधादि आभ्यंतर, व अग्नि चोर इत्यादि बाह्य शत्रु त्याला तुडवितात; आणि त्यामुळें फुटक्या होडींत पाणी शिरते त्याप्रमाणें दुःख त्याच्या अंतःकरणांत शिरतें.

भवतृष्णा म्हणजे जीविततृष्णा. इजमुळेंहि जगाच्या दुःखांत मोठी भर पडली आहे. शंभर वर्षें आयुष्य प्राप्त झालें असतांहि मनुष्याची तृप्ति होत नाहीं. मेल्यावरहि सुख मिळावें, आत्मा अमर व्हावा, अशी त्याची इच्छा असते. तीस अनुसरून तो व्रतांचें आणि उपवासांचें आचरण करतो, यज्ञयाग करून प्राण्याला दुःख देण्यास तयार होतो व येणेंकरून आपल्या आणि इतर प्राण्यांच्या दुःखांत भर घालतो.

विभवतृष्णा म्हणजे विनाशतृष्णा जगांतून नाहींसें होऊन जाण्याची तृष्णा. या तृष्णेला बळि पडलेले लोक आपल्याहि फायद्याकडे पाहत नाहींत, आणि दुसऱ्याच्याहि फायद्याकडे पाहत नाहींत. एवढ्यातेवढ्यासाठीं आत्महत्या करण्यास ते तयार असतात. आपण मेलों म्हणजे सारें जग संपलें असें त्यांचें म्हणणें असतें. ज्यांना आपल्या जीविताची पर्वा नाहीं त्यांना दुसऱ्याच्या जीविताची कोठून असणार? दुसऱ्या प्राण्यास कितीहि उपद्रव झाला, तरी त्यापासून अशा लोकांच्या अंत:करणांत दयेचा उदय होणें शक्य नाहीं. त्यांचें जीवित नीरस झालेलें असतें. त्यांना धार्मिक सुखाची गोडी मुळींच माहीत नसते. एकंदरींत अशा निर्दयपणें आणि नीरसपणें इतरांचे आणि आपलें दु:ख ते वाढवीत असतात.

**दुःखनिरोध :**— दु:खनिरोध म्हणजे दु:खाचें आकलन दु:खाचा नाश तृष्णानाशानेंच करतां येतो वर सांगितलेल्या तिन्ही तृष्णांचा नाश केला, तरच दु:खाचा नाश होणार आहे इतर उपाय निरुपयोगी आहेत. कामवासनेची तृप्ति करण्याच्या प्रयत्नानें दु:खाचा अंत होणार नाहीं; व्रत, उपास, यज्ञ, त्याग इत्यादिकांचें आचरण करून स्वर्गवासाची प्राप्ति करून घेतली, तरी दु:खाचा अंत होणार नाहीं, किंवा आपण जगांतून नाहीसे झालो तरी दु:खाचा अंत होणार नाहीं.

**दु:खनिरोधगामिनी प्रतिपत् (मार्ग):**–तृष्णानाशानें दु:खनाश होतो' हें समजलें. पण तृष्णानाशाला कांहीं उपाय आहे कीं नाही? अंगांत शिरलेल्या शल्यापासून वेदना होतात, हें समजलें, परंतु तें शल्य सुरक्षितपणें काढण्याला जर उपाय माहीत नाहीं, तर नुसतें एवढें समजण्यापासून काय फायदा? म्हणून दु:खाचा निरोध करण्याला उपाय या चवथ्या आर्य सत्यांत सांगितला आहे. हा उपाय म्हटला म्हणजे आर्य अष्टांगिक मार्ग होय.

**१ सम्यक् दृष्टि :**—दु:खाचें ज्ञान, दु:खसमुदयाचें ज्ञान, दु:ख-निरोधाचें ज्ञान आणि दु:खनिरोधगामी मार्गाचें ज्ञान, याला सम्यक् दृष्टि असें म्हणतात. जग अनित्य म्हणजे बदलणारें आहे, प्रपंच दु:खमय आहे, आणि आत्मा म्हणून अविनाशी आणि अविकारी असा पदार्थ नसून कर्मा-नुसार बदलणारा आहे, अशा यथार्थ ज्ञानाला सम्यक् दृष्टि असें म्हटलें

असतां चालेल. कारण अशा ज्ञानानें च चार आर्य सत्यांचें ज्ञान होणें शक्य आहे.

**२ सम्यक् संकल्प:**—नैष्कर्म्य-संकल्प म्हणजे एकांतवाससुखाची आवड, अव्यापादसंकल्प म्हणजे प्राणिमात्रावर शुद्ध प्रेम, आणि अविहिंसा-संकल्प म्हणजे दुसऱ्यास किंवा आपणास त्रास होऊं नये अशी इच्छा. या तीन संकल्पांना सम्यक् संकल्प म्हणतात.

**३ सम्यक् वाचा :**– खोटें न बोलणें, चहाडी न करणें, कठोर शब्द न उच्चारणें, आणि वृथा भाषण न करणें यांना सम्यक् वाचा म्हणतात.

**४ सम्यक् कर्मान्त (कर्म):** – प्राणघात न करणें, चोरी न करणें व परदारागमन न करणें, यांना सम्यक् कर्मान्त म्हणतात.

**५ सम्यक् आजीव:**—वाईट मार्गानें आपली उपजीविका न करितां सन्मार्गानेंच ती करणें, यालाच सम्यक् आजीव म्हणतात

**६ सम्यक् व्यायाम:**— जे वाईट विचार मनांत आले नसतील त्यांना उत्पन्न होण्यास सवड न देण्याविषयीं प्रयत्न, जे वाईट विचार मनांत उद्भवले असतील त्यांचा नाश करण्याचा प्रयत्न, जे सुविचार मनांत उद्भवले नसतील ते उत्पन्न करण्याचा प्रयत्न व जे सुविचार मनांत उद्भवले असतील ते वाढवून त्यांना पूर्णतेला नेण्याचा प्रयत्न, या चार मानसिक प्रयत्नांना सम्यक् व्यायाम म्हणतात.

**७ सम्यक् स्मृति :**– शरीर अपवित्र पदार्थांचें बनले आहे हा विवेक जागृत ठेवणें, शरीरांतील सुखदु:खादि वेदनांचें वारंवार अवलोकन करणें, स्वचित्ताचें अवलोकन करणें, आणि कार्यकारण-परंपरा इत्यादि तात्त्विक गोष्टींचें चिंतन करणें या चार प्रकारांनीं चित्ताला जागृत ठेवणें, याला सम्यक् स्मृति म्हणतात.

**८ सम्यक् समाधि :**—सगळ्या कामवासनांचा निरोध करून व इतर दुष्ट मनोवृत्तींचा निरोध करून योगी वितर्क आणि विचार यांनीं युक्त आणि विवेकापासून उत्पन्न झालेल्या प्रीतीनें आणि सुखानें युक्त असें प्रथम ध्यान संपादन करितो. वितर्क आणि विचार हे शांत झाल्यावर जी

चित्ताची प्रसन्नता, जी चित्ताची एकाग्रता, तिनें युक्त, वितर्क-विचार-विरहित समाधीपासून उत्पन्न झालेल्या प्रीतीनें आणि सुखानें युक्त असें द्वितीय ध्यान संपादन करितो; प्रीतीच्या त्यागानें तो उपेक्षायुक्त होतो, व जागृत (स्मृतिमान्) होत्साता समाधिसुखाचा अनुभव घेतो, त्याला आर्यजन उपेक्षायुक्त, स्मृतिमान् आणि सुखी असें म्हणतात. अशा प्रकारचें तो तृतीय ध्यान संपादन करितो. सौमनस्य आणि दौर्मनस्य यांचा पूर्वीं च नाश झाल्यावर सुख आणि दु:ख यांचा निरोध करून तो सुखदु:खविरहित व उपेक्षा आणि जागृति (स्मृति) यांनीं परिशुद्ध असें चतुर्थ ध्यान संपादन करतो. याप्रमाणें चार ध्यानें संपादन करणें याला सम्यक् समाधि असें म्हणतात.

बुद्ध भगवंतानें या आर्य आष्टांगिक मार्गाला मध्यम मार्ग असें म्हटलें आहे. त्याचें प्रत्येक अंग दोन अंतांच्या मध्यें आहे. उदाहरणार्थ, चैनी लोकांची दृष्टि म्हटली म्हणजे खावें प्यावें, मजा मारावी. हा दृष्टीचा एक अंत. तापसी लोकांची दृष्टि म्हटली म्हणजे व्रतांनीं शुद्धि, तपानें शुद्धि, देहदंडनानें शुद्धि करावी. हा दृष्टीचा दुसरा अंत. पहिला अंत चैनीचा आणि दुसरा अंत देहदंडनाचा. यांच्या मधला मार्ग म्हटला म्हणजे चार आर्यसत्यांचें यथार्थ ज्ञान. चैनी लोक म्हणतात, वाटेल ते संकल्प संकल्पावे. तापसी म्हणतात, संकल्पाचा समूळ नाश करावा. या दोन अंतांच्या मधला मार्ग म्हटला म्हणजे सम्यक् संकल्प. या प्रमाणें बाकी अंगांचीहि मध्यवर्तिता जाणावी.

# पंचस्कंध

रूप, वेदना, संज्ञा. संस्कार व विज्ञान या पांच पदार्थांना पंचस्कंध असें म्हणतात.

पृथ्वी, आप, तेज, वायु या चार महाभूतांना आणि त्यांजपासून उत्पन्न झालेल्या पदार्थांना रूपस्कंध असें म्हणतात.

सुखकारक वेदना, दुःखकारक वेदना आणि उपेक्षा-वेदना या तीन प्रकारच्या वेदनांना वेदनास्कंध म्हणतात.

घर, झाड, गांव, स्त्री, पुरुष इत्यादिविषयक कल्पनांना संज्ञास्कंध म्हणतात. घर, झाड इत्यादि पदार्थ परमार्थत. वर सांगितलेल्या चार महाभूतांचे च बनलेले आहेत. म्हणून ते परस्परांपासून भिन्न नाहींत. असें असतां संज्ञास्कंधाच्या योगें त्यांचा निराळेपणा आमच्या लक्षांत येतो. ही जी पदार्थांना निरनिराळीं नांवें देण्याची मनाची शक्ति तिलाच संज्ञास्कंध असें म्हणतात

संस्कार म्हणजे मानसिक संस्कार. यांचे कुशल अकुशल आणि अव्याकृत असे तीन प्रकार आहेत. दुसऱ्यास मदत करण्याची इच्छा, प्रेम, जागृति इत्यादि संस्कार कुशल जाणावे. लोभ, द्वेष, माया, मत्सर, आळस इत्यादि संस्कार अकुशल जाणावे. अकुशलहि नव्हेत आणि कुशलहि नव्हेत अशा संस्कारांना अव्याकृत म्हणतात. उदाहरणार्थ, कांहीं पदार्थांची आवड असणें कांहींची आवड नसणें इत्यादि संस्कार पूर्वकर्मांचे फलभूत असल्यामुळें अकुशल किंवा कुशल यांत त्यांची गणना होत नाहीं. त्यांना अव्याकृत असेंच म्हटलें पाहिजे.

विज्ञान म्हणजे जाणणें. संक्षेपानें सांगावयाचें म्हटलें म्हणजे विज्ञानें सहा आहेत चक्षुर्विज्ञान, श्रोत्रविज्ञान, घ्राणविज्ञान, जिह्वाविज्ञान, कायविज्ञान व मनोविज्ञान. या सहा विज्ञानांच्या समुदायाला विज्ञानस्कंध असें म्हणतात विज्ञानाला बौद्ध ग्रंथांत चित्त म्हणतात. चित्ताला कधीं कधीं मन हा शब्द लावितात. बौद्धांच्या मतें मन हें अमूर्त आहे. तें अणु-प्रमाण नाहीं म्हणून तर्कसंग्रहादि न्यायग्रंथांत सांगितलेलें मन व बौद्ध ग्रंथांत सांगितलेलें मन हीं एक नव्हेत, हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

हे पांच स्कंध वासनायुक्त असले म्हणजे त्यांना उपादानस्कंध असें म्हणतात. यांच्यायोगें पुनर्जन्म होतो. या जन्मीं कुशलाकुशल कर्म केलें म्हणजे त्याच्या जोरावर दुसऱ्या जन्मीं या पांच उपादानस्कंधांचा प्रादुर्भाव होतो. जेव्हां वासनेचा समूळ उच्छेद होतो. तेव्हां या स्कंधांना उपादान-स्कंध न म्हणतां नुसते स्कंध म्हणतात. कारण त्यांच्या योगें पुनर्जन्म होण्याचा संभव नसतो. अर्हत्पद प्राप्त झाल्यावर वासनेचा समूळ उच्छेद होतो. अर्हत्पदाप्रत पावलेल्या व्यक्तीचे पंचस्कंध त्याच्या मरणापर्यंत राहतात. अकुशल संस्कार मात्र अर्हत्पद मिळाल्याबरोबर सर्वथैव नष्ट होतात. मरणसमयीं अर्हतांच्या पंचस्कंधांचा निर्वाणांत लय होतो अर्थात् त्यांजपासून नूतन पंचस्कंध उदय पावत नाहींत.

परिशिष्ट–४

# अर्हत्-पद

१ सत्कायदृष्टि ( आत्मा हा भिन्न पदार्थ असून तो नित्य आहे अशी दृष्टि ) २ विचिकित्सा (बुद्ध, धर्म आणि संघ यांजविषयीं शंका किंवा अविश्वास) ३ शीलव्रतपरामर्श ( स्नानादिव्रतांनींच मुक्ति मिळेल असा विश्वास) ४ कामराग (कामवासना) ५ प्रतिघ (क्रोध) ६ रूपराग (ब्रह्मलोकादि-प्राप्तीची इच्छा) ७ अरूपराग ( अरूपदेवलोकप्राप्तीची इच्छा) ८ मान (अहंकार) ९ औद्धत्य (भ्रांतचित्तता) आणि १० अविद्या या दहा पदार्थांना संयोजनें ( बंधनें ) म्हणतात आर्य अष्टांगिक मार्गाच्या अभ्यासानें या दहा संयोजनांचा नाश झाला म्हणजे अर्हत्-पद प्राप्त होतें. अर्ह-त्पद प्राप्त झालें म्हणजे निर्वाणाचा पूर्णपणें साक्षात्कार होतो. स्रोतापन्न, सकृदागामी, अनागामी आणि अर्हत् असे निर्वाण-मार्गांत समाविष्ट झालेल्या व्यक्तींचे चार भेद आहेत. पहिल्या तीन संयोजनांचा क्षय झाला म्हणजे मनुष्य स्रोतापन्न ( स्रोतआपन्न ) होतो. स्रोतापन्न असतांना जर त्याला मृत्यु आला, तर तो देवलोकीं व मनुष्यलोकीं फार झालें तर सात खेपा जन्म घेतो. सातव्या जन्मीं त्याला मोक्ष

मिळाला च पाहिजे. पहिल्या तीन संयोजनांचा नाश करून काम, राग, द्वेष आणि मोह हे दुर्बळ झाले म्हणजे मनुष्य सकृदागामी होतो. अशा स्थितींत त्याचा मृत्यु झाला तर, तो एक वेळच इहलोकीं जन्म घेतो व मोक्ष मिळवितो. पहिल्या पांच संयोजनांचा नाश झाला म्हणजे मनुष्य अनागामी होतो. अनागामीला मरण आलें असतां तो इहलोकीं जन्म घेत नाहीं. ब्रह्मलोकांत त्याचा जन्म होतो व तो तेथूनच मोक्ष मिळवितो. सर्व संयोजनांच्या नाशानें मनुष्य अर्हत् होतो. अर्हताला पुनर्जन्म नाहीं. जीवन्मुक्त म्हणतात तो तोच. बुद्ध आणि अर्हत् यांमध्यें थोडासा फरक आहे बुद्धाला निर्वाणाचा साक्षात्कार स्व-प्रयत्नानें होतो. परंतु अर्हताला तो दुसऱ्याचा उपदेश श्रवण करून होतो. एवढाच काय तो फरक. बाकी दोघांनाहि निर्वाणाचा साक्षात्कार याच जन्मीं घडतो.

**परिशिष्ट—५**

# निर्वाण

निर्वाणासंबंधानें पाश्चात्त्य पंडितांचे अनेक तर्क आहेत. कोणी म्हणतो, निर्वाण अभावमात्र ( Annihilation ) दुसरें कांहीं नाहीं. दुसरा कोणी म्हणतो, हें कांहीं ठीक नाहीं. बौद्धांची एवढी मोठी संख्या आहे; ते सारे अभावालाच भजतील हें संभवनीय नाहीं. बुद्ध भगवान् अक्रियावादी आहे असा आरोप त्यांचे विरोधी त्याजवर त्याच्या हयातींतच आणीत असत. यासंबंधीं एकदां वज्जींचा सेनापति सिंह यानें त्यास प्रश्न विचारला असतां तो म्हणाला : "सिंहा हा आरोप एका अर्थीं खरा आहे. सर्व पाप-विचारांची (अकुशल संस्कारांची) अक्रिया मला पंसत आहे. त्यांची अक्रिया करण्याविषयीं मी उपदेश करितों, म्हणून मला अक्रियावादी म्हटलें असतां चालेल. उलट पक्षीं मी क्रियावादी ( Realist ) आहें, असेंहि कोणी म्हणू शकेल. कारण पुण्यविचारांची (कुशल संस्कारांची) क्रिया मला पंसत आहे. त्यांची क्रिया करावी, त्यांना पूर्णत्वाला न्यावें, असा मी उपदेश करितों; म्हणून मला क्रियावादी म्हटलें तरी हरकत नाहीं."—महावग्ग; अंगुत्तरनिकाय. या संवादावरून बुद्धानें अभावमात्र प्राप्त करून घेण्याचा उपदेश केला नाहीं, हें स्पष्ट होत आहे.

e900

जम्बुखादक नांवाच्या परिव्राजकानें सारिपुत्राला निर्वाण हें काय आहे, असा प्रश्न केला. तेव्हां सारिपुत्र म्हणाला : “यो खो आवुसो रागक्खयो दोसक्खयो मोहक्खयो इदं वुच्चति निब्बाण. लोभ द्वेष आणि मोह यांचा जो क्षय त्याला निर्वाण म्हणतात.” याचा अर्थ असा कीं, लोभ द्वेष आणि मोह हे तीन मनाचे अकुशल धर्म (संस्कार) नष्ट झाले म्हणजे निर्वाणाचा साक्षात्कार होतो. लांकडाचा गाभा कोणता ? असा जर प्रश्न केला तर त्याला ‘वरची साल काढा, नंतर मऊ भाग तासून टाका, म्हणजे जो बाकी राहील तोच गाभा, हेंच उत्तर देणें योग्य होईल. सारिपुत्रानें जंबुखादकाला अशाच प्रकारचें उत्तर दिलें आहे. अनेक नांवांनीं निर्वाणाचा उल्लेख केला आहे परंतु त्याचें विस्तृत वर्णन कोठेंच आढळत नाहीं. जसें एखाद्या गांवाचें वर्णन देतां येईल तसें तें निर्वाणाचें देतां येणें शक्य नाहीं. ज्यांच्या अंतःकरणांतून लोभ, द्वेष, मोह समूळ नष्ट झाले, म्हणजे ज्यांच्या वासनेचा क्षय झाला, अशा महर्षीलाच निर्वाणाचा साक्षात्कार होतो. तें काय आहे हें तेच जाणूं शकतात.

पदमच्चुतमच्चन्तं असंखतमनुत्तरं ।
निब्बानमिति भासन्ति वानमुत्ता महेसयो ॥

ज्यांच्या वासनेचा क्षय झाला आहे असे महर्षि निर्वाण हें अच्युतपद आहे, त्याला अंत नाहीं, तें अत्यंत परिशुद्ध (असंस्कृत) आहे आणि तें लोकोत्तर आहे, असें म्हणतात. (अभिधम्मत्थसंगह.)

अर्हत्पद प्राप्त झाल्याबरोबर निर्वाणाचा साक्षात्कार होतो. तथापि सर्व दुःखांचा निःशेषत नाश होत नाहीं. लोभ-द्वेष-मोह जन्य मानसिक पीडा तेव्हांच नाहींशी होते; परंतु शारीरिक दुःख आयुष्य संपेपर्यंत रहातें. बुद्धाला छत्तिसाव्या वर्षींच निर्वाणपदाचा साक्षात्कार झाला होता. त्यावेळीं त्याचे लोभद्वेषादिजन्य मानसिक दुःख नष्ट झालें. परंतु शीतोष्णरोगादिजन्य शारीरिक दुःख पूर्णपणें नष्ट झालें नाहीं. देहावसानीं तेंहि दुःख नष्ट झालें. अर्हतांच्या मरणाला परिनिर्वाण म्हणतात. कारण मरणानें त्यांच्या शारीरिक दुःखाचाहि अंत होतो. परिनिर्वाणानंतर अर्हत् कोणत्या स्थितींत असतो, याचें वर्णन कोठें आढळत नाहीं. ती स्थिति अनिर्वचनीयच आहे. बुद्ध भगवंताच्या परिनिर्वाणाला महापरिनिर्वाण म्हणतात.

संग्रहालय, ठाणे. स्थळ

REFBK-0009100

REFBK-0009100

# अन्य प्रकाशन

| | | मूल्य |
|---|---|---|
| १. | वस्त्रपूर्णा ( मराठी, हिंदी ) | २—०—० |
| २. | हिमालयाची हांक | २—०—० |
| ३. | आश्रम—संगीत | १—०—० |
| ४. | रामरक्षा—स्तोत्र : एक अध्ययन | ०—८—० |
| ५. | समर्थांचा प्रसाद | ०—४—० |
| ६. | गीता | ०—४—० |
| ७. | बुद्ध—गीता | ०—८—० |
| ८. | येशूची शिकवण | १—०—० |
| ९. | पैगंबराचीं वचनें | १—०—० |

## आगामी

१. उद्धव—गीता
अर्थात् एकादश स्कंध समश्लोकी

२. वेद—वाणी

३. देव—वाणी

४. शंकर—भारती